UNIVERSAL LIBRARY
OU_192261
UNIVERSAL LIBRARY

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणें २. पुष्प १७ वें.

वात्सल्याची

# प्रसाद-दीक्षा

( एका आश्रमवासी सेविकेस आलेलीं महात्माजींचीं पत्रें )

संपादक
आचार्य काका कालेलकर

१९३८ ]                [ १ रुपया

प्रकाशकः—गोविंद वामन कुलकर्णी,
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला
३७३ शनिवार, पुणें २.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

मुद्रक—कृ. ह. सहस्रबुद्धे,
श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

# प्रार्थना

गांधीजींनीं आश्रमांतील एका सेविकेला गुजरातींत लिहिलेल्या पत्रांचें हें मराठी भाषांतर आहे. पत्रें अगदीं खासगी स्वरूपाचीं आहेत. हीं छापलीं जातील अशी गांधीजींना कल्पनादेखील नव्हती. पण गांधीजींच्या जीवनांत गुप्त असें कांहींच नाहीं. त्यांनीं आपल्या आत्मकथेमध्यें कोणतीच गोष्ट उघडी करावयाची बाकी ठेविली नाहीं. पण गांधीजी ज्यांना ज्यांना पत्रें लिहितात, त्या सर्वांना त्या पत्रांच्या द्वारां आपल्या गोष्टी उघड व्हाव्या हें पसंत पडत नसतें. पितृवात्सल्यानें भरलेलीं अशीं पत्रें मिळविण्याचें सद्भाग्य ज्या सेविकेला लाभलें तिला या पत्रांतून स्वतःचे गुणदोष प्रकट झाल्याचा क्षोभ नाहीं. गांधीजींकडून एवढा गुण तिनें सहज घेतला आहे खरा; फक्त स्वतःच्या स्वाभाविक नम्रतेला संतोष देण्यासाठीं तिनें आपलें नांव येथें प्रकट केलें नाहीं. हीं पत्रें वाचून ही सेविका कोण आहे हें वाचकांना उमगतां यावयाचें नाहीं अशी जर तिची कल्पना असेल तर ती चुकीची आहे असें म्हणावें लागेल. येथें प्रसिद्ध केलेलीं पत्रें वेंचक आहेत. लोकांना उपयोगी किंवा आकर्षक नसेल असा भाग येथें गाळला आहे. शिष्टसंप्रदायाला अनुसरून बरींच नांवें येथें गाळलीं आहेत, तरी पण चाणाक्ष वाचकाला या पत्रांत उल्लेखिलेली व्यक्ति कोण हें शोधून काढावयास पुरेसा पुरावा या पत्रांत भरलेला आहे.

खासगी पत्रांत विविध प्रकारच्या गंभीर प्रश्नांची थोडक्यांत चर्चा असली तरी ते कांहीं लघु–निबंध नव्हेत. एका अधिकारी व्यक्तीनें आत्मीय भावानें स्वजनांना लिहिलेलीं पत्रें समाजाला कितीही बोधप्रद असली तरी त्यांचा खासगीपणा त्यांत कमी नसतो. पत्रें लिहिणारे आणि तीं वाचणारे यांचेमध्यें जी विशिष्ट समान भूमिका असते, त्या भूमिकेवर उभें राहून झालेला पत्रव्यवहार अतिशय आपलेपणाचा, उत्कट आणि विश्रब्ध असतो. या पवित्र वातावरणाचें दर्शन करण्याची संधि त्यांनीं इतर वाचकांना

करून दिली यांत त्यांचे उपकार वाटण्यापेक्षां त्यांनीं आपल्यावर टाकलेल्या जबाबदारीचें भानच वाचकांना अधिक घेरतें. एखाद्या सद्‌गृहस्थानें आपल्यावर विश्वास टाकून सन्मान्य पाहुणा म्हणून आपणांस घरीं बोलाविलें असतां त्याच्या त्या आदराला आणि विश्वासाला पात्र होण्याची जबाबदारी पाहुण्याला दाखवावीच लागते; या दृष्टीनें आतिथ्य ही एक प्रकारची दीक्षाच होऊन बसते.

महाराष्ट्रांतील वाचक आपली ही जबाबदारी ओळखोत अशी नम्र प्रार्थना आहे.

खरेखुरें पत्रमय वाङ्मय हा सामाजिक जीवनांतील एक अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज असतो. याकडे साहित्यदृष्टीनें न पहातां जबाबदार सामाजिक दृष्टीनें पाहिलें पाहिजे, व यांच्या वाचनानें केवळ साहित्य-रसिकता तृप्त न करितां आपापलें जीवन शुद्ध, संस्कारी आणि समृद्ध करण्याचा प्रत्येकानें प्रयत्न करावा एवढेंच येथें सुचवावयाचें आहे.

मूळ गुजराती पत्रांचें मराठी भाषांतर योग्य रीतीनें करून दिल्याबद्दल वाचक श्री. भाऊ धर्माधिकारी यांचेही मनापासून आभार मानतीलच.

पुणें ८-६-३८. **काका कालेलकर.**

*

# प्रसाद्-दीक्षा

## विषयसूचि


| | विषय | पत्रांक |
|---|---|---|
| १ | अक्षरज्ञान | २१ |
| २ | अनासक्ति | ७३, ७५ |
| ३ | अन्तर्नाद | ४३, ६६ |
| ४ | अन्तःशुद्धि | ७९ |
| ५ | अन्धानुकरण | १७ |
| ६ | अरविंदबाबू | ७९ |
| ७ | अवनतीचें कारण | ४८ |
| ८ | असतो मा सद्गमय | ८६ |
| ९ | असंतोष | ३१ |
| १० | अहंकार | २५, ४४, ४८, ६१ |
| ११ | अहिंसा | १९, ३३, ४२, ७३ |
| | —आणि लष्कर | ७७ |
| | —आणि स्वराज्य | ८२ |
| १२ | आततायीची हत्या | ८२ |
| १३ | आत्मा | १८ |
| १४ | आध्यात्मिक आढावा | ३२ |
| १५ | आंधळे सत्यार्थी | २४ |
| १६ | आश्रम | १७, १८, २०, २३, २७, ३२, ४२, ५०, ५२, ५५ |
| | —चा पैसा | ४९ |
| | —चें बलिदान | ७१ |
| | —आणि मांसाहार | ३७ |
| | — ,, मी | २१, २९, ५५, ५७ |
| | —आणि डॉक्टर | ५६ |
| | — ,, धर्मशाळा | ५५ |
| | — ,, विद्वान् | २१ |
| | — ,, शिक्षण | ३४, ३५ |
| १७ | ईश्वरार्पणभाव | ९५ |
| १८ | ईश्वराचें स्वरूप | ७९ |
| १९ | उपयोगिता | ३९ |
| २० | उपवास | ६, ८ |
| २१ | एनिमा | ६ |
| २२ | कडक नियम | ५२ |
| २३ | कर्तव्यकर्म | १ |
| २४ | ‘कर्मन की गत’ | ७६ |
| २५ | कला | ४३ |
| २६ | ‘कलेसाठीं कला’ | २९ |
| २७ | कल्चर | १२ |
| २८ | काडीमोड | २४ |
| २९ | कांतणें | ४२ |
| ३० | कांदा | ७८ |
| ३१ | कार्यतन्मयता | ३५ |
| ३२ | केळीं | ४४ |
| ३३ | क्रान्ति | १४ |
| ३४ | क्रोधविष | ५४ |
| ३५ | खरा शिपाई | ७ |
| ३६ | खेड्यांतील कार्याचें धोरण | ७०, ७१ |

| विषय | पत्रांक |
|---|---|
| ३७ खेड्याची सेवा | ८८ |
| ३८ गरजा | ३० |
| ३९ गाईचें दूध | ८८ |
| ४० गायन–नृत्य | ७७ |
| ४१ गुप्त विचार | ५३ |
| ४२ गेलें महायुद्ध | ४१ |
| ४३ चित्रकला | १७ |
| ४४ चीन–जपान | २४, २७ |
| ४५ जितराष्ट्र | २५ |
| ४६ झोंप | ८ |
| ४७ तत्त्व आणि व्यवहार | ५१ |
| ४८ तृष्णा | १ |
| ४ दुसऱ्याची निंदा | ७३ |
| ५० दैव | ४६ |
| ५१ द्वेष | १९, ३३ |
| ५२ धंदा व सेवा | ७३ |
| ५३ धर्म परिवर्तन | २८, ३० |
| ५४ नम्रता | ४४, ४५, ५९ |
| ५५ नामजप | ४३ |
| ५६ निद्रावस्था | ४ |
| ५७ नीला नागिणी | ६४ |
| ५८ पति आणि पत्नी | ३७ |
| ५९ परदेशांतील प्रचारकार्य | ८३ |
| ६० पॅसिव्ह व्यायाम | ३२, ३४ |
| ६१ पिंड आणि ब्रह्मांड | ३ |
| ६२ पूर्णता | ३८ |
| ६३ पूर्ण सत्याग्रही | ७७ |
| ६४ प्रार्थना | ७, १०, २१, ३२, ३४, ४१, ७६, ८६ |
| मौन– | ३४ |
| ६५ प्रियतम श्लोक (गीतेंतील) | १३ |
| ६६ प्रिविलेज् | २१ |
| ६७ प्रौढ स्त्रिया आणि सेवाकार्य | २६, २८ |
| ६८ फसवणूक | २१, ५४ |
| ६९ फोडावर इलाज | ७६ |
| ७० बळी तो कान पिळी | ३९ |
| ७१ ब्रह्मचर्य | ८४, ८५, ८८ |
| ७२ " चा अभिमान | ६० |
| ७३ ब्रह्मज्ञान | ३३ |
| ७४ भगिनीभाव | ४६ |
| ७५ भावना–प्रकटीकरण | ५० |
| ७६ भूगोल | ११ |
| ७७ मतांतर | २० |
| ७८ महारोगी | ८३ |
| ७९ माझ्या भूमिकांचें पृथक्करण | २० |
| ८० माझा राग | ७३ |
| ८१ मानाची भूक | ४४ |
| ८२ मायाबंध (पाश) | २५, ३१ |
| ८३ मायावाद | ४८ |
| ८४ मुलांना मार | ८, ९ |
| ८५ मुलींशीं मोकळेपणा | ४५ |
| ८६ मूर्तिपूजा | १, ५ |
| ८७ मृत्यु | ४८ |

| क्रमांक | विषय | पत्रांक |
|---|---|---|
| ८८ | रशिया | ८१ |
| ८९ | रोग्याची स्वपरीक्षा | ४० |
| ९० | लक्ष्मी–मानलेली मुलगी | ५५ |
| ९१ | लाठी–शिक्षण | ७८ |
| ९२ | लोकमत | ४५ |
| ९३ | लोकाचार | ६६ |
| ९४ | वनस्पति–विज्ञान | ११,१४ |
| ९५ | वर्णधर्म | ८६ |
| ९६ | वाढदिवस | १६,३८ |
| ९७ | विद्यापीठ | १८,२० |
| ९८ | विद्याभ्यास | ४३ |
| ९९ | विरोधक | ४४ |
| १०० | विरोधाभास | १९ |
| १०१ | विश्वस्त धनिक | ८०,८१,८२ |
| १०२ | विहिरींची स्वच्छता | ७७ |
| १०३ | वेश्या | ४६ |
| १०४ | व्यक्ति प्रेम | ३४ |
| १०५ | ,, पूजा | ४२,४४ |
| १०६ | शरीर पर्श व प्रेम | ९० |
| १०७ | शिष्य–शिक्षक | ६३ |
| १०८ | शून्यवत् होणें | २९,६१ |
| १०९ | शेतकऱ्यांचें आर्थिक हित | ७५ |
| ११० | शेतजमिनीचे तुकडे | ७५ |
| १११ | श्रद्धा | ३० |
| ११२ | संस्थानें | ७८ |
| ११३ | संकर-विवाह | २४ |
| ११४ | समता | २५ |
| ११५ | समाधि | १ |
| ११६ | सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् | २२ |
| ११७ | सत्याग्रह | १६ |
| ११८ | ‘सर्जनहार’ | १० |
| ११९ | सहजप्राप्त सेवा | १ |
| १२० | सहशिक्षण | २४ |
| १२१ | साकार–निराकार | ३५ |
| १२२ | साधेपणा | ६६ |
| १२३ | सुधारक | ६४ |
| १२४ | सोबती | ५४ |
| १२५ | सौंदर्यस्तुति | २४ |
| १२६ | स्त्री-पुरुष भेद | ३७ |
| १२७ | स्त्री-पुरुष–व्यवहाराविषयीं मुलांचें कुतूहल | ३७ |
| १२८ | स्त्रियांचें ब्रह्मचर्य | ४८, ५५, ५८ |
| १२९ | स्त्रियांचा मासिक–धर्म | ३५, ३७, ६२ |
| १३० | स्वप्न | २६ |
| | –दोष | ७४ |
| १३१ | हिंदुधर्म | २८ |
| १३२ | हिंदुमुस्लीम ऐक्य | ७७ |
| १३३ | ज्ञान, उपासना, कर्म | ३० |
| १३४ | ज्ञानी आणि भक्त | १२ |
| १३५ | Hero | १४ |
| १३६ | ‘Judge not others …’ | ३९, ४२ |
| १३७ | प्रेमाचा स्वभाव | २७ |

# शुद्धिपत्र

( अगदीं ठळक चुका दुरुस्त केल्या आहेत )

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २७ | २५ | आकाराच्या | आकाशाच्या |
| २८ | ११ | बुद्धिभ्रंश | बुद्धिभेद |
| ३० | २ | असतो | असेल |
| ३३ | १९ | मिशानें | मिषानें |
| ५९ | ११ | काम | कामें |
| ६४ | २८ | तरवांना | रोपांना |
| ७१ | २७ | का | ना |
| ७६ | ७ | नाहींस | नाहीं |
| ८० | २८ | जसजसा | जसजशा |
| ८७ | २७ | ‘ नसली ’ याचेपुढें | ‘ म्हणून ’ वाचावें |
| ९४ | २० | नासूत | ना सूत |
| १२१ | २२ | मोजपाम | मोजमाप |
| १२६ | १२ | लिहिलंच | लिहविलंच |

# प्रसाद-दीक्षा

## ( महात्माजींचीं एका सेविकेला पत्रें )

### पत्र...१

चि.—

खडावा तुला हव्या असतील तर अवश्य ठेवून घे. पण हे लाकडाचे तुकडे घेऊन तूं काय करणार ? तुझं शरीर त्यानं दोन इंच वाढत असेल तर राखून ठेव बापडी. मी तर या वृत्तीला मूर्तिपूजा म्हणून नापसंत करीन. माझ्या वडिलांचा फोटो मी माझ्याजवळ ठेवीत असें. दक्षिण आफ्रिकेंत माझ्या ऑफिसमध्यें, दिवाणखान्यांत आणि माझ्या निजण्याच्या खोलींत हा फोटो मी ठेवीत असें. माझ्याजवळ एक छडा होता. त्याला लॉकेट असे. त्यांत वडिलाचा आणि माझ्या वडील बंधूंचा फोटो असे. आज तें सारं सोडून दिलं आहे. ह्याचा अर्थ असा नव्हे, कीं मी त्यांना आतां कमी पूज्य मानतों. आज तर ते माझ्या हृदयांत अधिकच कोरलेले आहेत— त्यांच्या गुणांचं स्मरण करून त्यांचं अनुकरण करण्याचा मी प्रयत्न करीत असतों. आणि अशी भक्ति असंख्य देवांचीसुद्धां मी करूं शकतों. पण त्यांच्या मूर्तीच जर जवळ बाळगूं लागलों तर माझ्याजवळ जागाच मुळीं रहावयाची नाहीं. आणि त्यांच्या खडावा वगैरे ठेवूं लागलों तर मग आणखी नवीन जमीनीची मालकी मला स्वीकारावी लागेल. म्हणून माझी अनुभवी सल्ला तुला अशी आहे कीं, माझीं जेवढीं योग्य पावलं पडत असतील त्या पावलांवरून तूं चालावं, हें खडावा बाळगण्यापेक्षां हजारपट अधिक आहे. आणि तें पाहून कोणी त्याची नक्कल केली तरी त्यांत कांहीं बिघडत नाहीं. पण तुझ्याजवळ खडावा बघून त्याचं जर कोणी अंधानुकरण करूं लागला तर तो खड्ड्यांतच पडेल कीं नाहीं ? एवढें समजून मग यथेच्छसि तथा कुरु.

कर्तव्यकर्म जो समजून घेतो आणि त्याचं आचरण करतो त्याची तृष्णा नाहींशीच झालेली असते. ज्याची तृष्णा मेली नाहीं त्याला कर्तव्यकर्माचं भानच रहात नाहीं. तृष्णेचा डोंगर एवढा आहे कीं, त्याला कोणी ओलांडूंच शकत नाहीं. त्याला जमीनदोस्त केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. तृष्णा सोडणं म्हणजे कर्तव्याचं भान होणं. मला माहीत आहे कीं मला काशीला जायचं आहे. तिकडे जाण्याचा रस्ताही मला टाऊक आहे. पण मला कोणती तृष्णा त्या मार्गा-पासून—कर्तव्यापासून—परावृत्त करूं शकेल ? माझी तृष्णाच काशीच्या मार्गानं जायचं ही आहे आणि ती पुरी झाली. मग राहिलं काय ? सहजप्राप्त सेवा तुझ्यापुढं आहे. जर तूं ती एकनिष्ठेनं करीत राहिलीस तर त्यांत तुला पूर्ण संतोष मिळालाच पाहिजे. त्याच्या अनुषंगानं जी संगति मिळेल, जें वाचन मिळेल तें ग्राह्य. त्याशिवाय दुसऱ्याचा विचारसुद्धां मनांत येतां कामा नये. हेंच माझ्या दृष्टीनं योगः कर्मसु कौशलम्, समत्व, समाधि. पण हें सारं जर तुला केवळ ब्रह्मज्ञान वाटलं आणि तुझ्या आत्म्याला वाचनादीची जरूर असेल तर ती इच्छा तूं खुशाल तृप्त करून घे.

कामाचा बोजा कमी कर आणि थोडी विश्रांति घेत जा. हें कसं करावं हें ※ ※ आणि तूं मिळून ठरवा. ※ ※ दीर्घदर्शी आहेत, धैर्यवान् आहेत आणि साधुचरित आहेत. ते तुला अवश्य मदत करतील. माझ्या-सारखा कांहीं अंशीं दिशा सुचवूं शकतो खरा. बाकी तुझ्या आणि आपल्या सगळ्यांच्या शांतीचा खरा आधार स्वतःवरच आहे.........
......पंडितजींचं संगीत ऐकल्यानंतर तुझ्यासारखीला दुसरं संगीत आवडणार नाहीं हें मला समजतं; पण तूं स्वतःच भजन कां चालवीत नाहींस ? तुला संगीत येतं तर खरं !

ता २।१०।३०
यरवडा मंदिर

**बापूचे आशीर्वाद.**

—※—

## पत्र...२

चि.—

तुझं पत्र मिळालं. मला लांबलचक उत्तर लिहिलंस याची कांहीं हरकत नाहीं. कामांत गुंतलेल्या बापानं एकच ओळ लिहिली तरी मुलां-मुलींनीं संतोष मानावा. पण त्यांनीं मात्र आपलं हृदय पूर्णपणें मोकळं करावं.

माझ्या जाळ्यांत जे कोणी येतील त्यांना मी अडकवून ठेवूं इच्छितों ही गोष्ट अगदीं खरी. एकाद्याच्या जाळ्यांत फसल्यानं आपला सत्यानाश होण्याचा संभव असतो. माझ्या जाळ्यांत फसलेल्या एकाचाही सत्यानाश झाल्याचं मला माहीत नाहीं. म्हणून मी माझा धंदा चालू ठेविला आहे.

ता. १९।९।२९ बापूचे आशीर्वाद.
आग्रा

---

## पत्र...३

चि.—

तुला लिहिण्याचा मला त्रास वाटत नाहीं. तुझं निदान खरं आहे. हिंदुस्थानचे प्रश्न सोडविण्यामध्यें मला जितकी गोडी वाटते त्याहूनही अधिक गोडी आश्रमाचे प्रश्न सोडविण्यांत आणि त्यांतल्या त्यांत भगिनींचे प्रश्न सोडविण्यांत वाटते. कारण मोठे प्रश्न सोडविण्याची किल्ली त्यांतच आहे. जें पिंडीं तें ब्रह्मांडीं. ब्रह्मांड समजून घ्यायचं झालं तर चुकायला होईल. पिंड आपल्या हातांतच असतो.

बालवर्गाची व्यवस्था चांगली होऊं लागली आहे असं वाटतं... कच्चीं कारलीं खाण्याची शिफारस मीं इरादापूर्वक केली आहे....

भावना सरळ मार्गानं जाऊं शकते. तिला त्या मार्गानं नेणं हा परम अर्थ. पुरुषार्थ शब्द एकांगी आहे. दुसरा एखादा तटस्थ शब्द तुला सुचतो?

ता. २८।१।३० बापूचे आशीर्वाद.
यरवडा मंदिर

---

## पत्र....४

चि.—

निर्दोष निद्रा येण्यासाठीं जागृतावस्थेंत निर्दोष आचारविचार असले पाहिजेत. निद्रावस्था ही जागृतावस्थेंतील स्थिति तपासण्याचा आरसा आहे. भावना आड मार्गाला जाऊं लागल्या तर त्यांना अटकावण्याची शक्ति आपणा सर्वांमध्यें असतेच. तो उत्कृष्ट अर्थ आहे. अशा प्रयत्नांत पराभवाला स्थानच नाहीं.

आज दीड महिना झाला, आकाशांत ढग असतात; पण पाऊसमान फारच कमी. अमदाबादकडील सामान्य पावसापेक्षां फार कमी असं मात्र म्हणतां येत नाहीं. कैद्यांना मी पत्रं लिहूं नयेत असा संकेत आहे. * * ना पत्र लिहितेवेळीं माझे आशीर्वाद लिहून ही गोष्ट सुचवावी.

ता. २।८।३०
यरवडा मंदिर

बापूचे आशीर्वाद.

—*—

## पत्र....५

चि.—

मूर्तिपूजेचे मी दोन अर्थ करतों. एका मूर्तिपूजेनं मनुष्य मूर्तींचं ध्यान करतां करतां गुणांत लीन होऊन जातो—ही पूजा इष्ट. दुसरीमध्यें गुणांचा विचार न करतां मूर्तीलाच मूळ वस्तु मानतो, ही बुतपरस्ती—ही अनिष्ट आहे.

ता. १८।१०।३०
यरवडा मंदिर

बापूचे आशीर्वाद.

—*—

## पत्र....६

चि.—

तुझं पत्र मिळालं......मी माझ्या उपचारालाच चिकटून राहात आहें. डॉक्टरनीं सांगितलेला उपचार खुशाल मागाहून कर. पण कमींत कमी सात दिवसांचा उपवास अगोदर करून टाक. उपवासाची आपल्याला भीति असूंच नये. सात दिवसांच्या उपवासांत तुझीं पुष्कळशीं कामं तुला करतां येतील. आयुष्यांत पहिल्या प्रथम पुष्कळ दिवसांचा उपवास मीं

केला त्यावेळीं एक दिवससुद्धां विश्रांति घेतली नाहीं आणि हरकतहि कसलीच आली नाहीं. तो उपवास सात दिवसांचा होता. शरीरांत त्यावेळीं थोडीबहुत चरबीहि होती. ज्याच्या शरीरांत चरबीचा संग्रह नसेल त्यालाच उपवासांत पडून रहावं लागतं. दोन दिवसांनंतर तर तुला ज्यास्ती शक्ति वाटूं लागेल. प्रथम दोन दिवस खोटी भूक लागल्यासारखं वाटेल खरं; पण मागाहून भूकही लागत नाहीं व शेवटीं रक्त सुधारतं तेव्हाच भूक लागते. त्या दरम्यान एनिमा (पिचकारी) घेऊन पोट साफ ठेवावं. एनिमा (पिचकारी) घेतल्यानंतर अर्धसर्वांगासन केल्यानं पाणी वरच्या आंतड्यांनासुद्धां मिळतं. पण त्याची तुला माहिती नसेल तर सोडून दे. उपवास चालू असतांना पाण्यांत मीठ आणि सोडा टाकून तें पुष्कळ प्यावं. प्रत्येक आठ औंसांत पांच ग्रेन मीठ आणि दहा ग्रेन सोडा असे आठ पेले सहज घेतां येतील. उन्हांत बसावं......कोणताही संकोच न बाळगतां इतकं करावंस अशी माझी इच्छा आहे. वाटल्यास डॉक्टरना कळव. तेदेखील हा उपचार पसंत करतील. पुष्कळ डॉक्टरांना आतां उपवासाचा चमत्कार पटूं लागला आहे.

ता. १५।११।३०. **बापूचे आशीर्वाद.**

—※—

## पत्र...७

चि.—

जे निर्णय मी करतों त्यांचीं सर्व कारणं माझ्या नेहेमींच लक्ष्यांत राहतात असें नाहीं. तूं खरी शिपाई ठरलीस—तिथं राहण्यानं शिपाईगिरी होत नाहीं असं तुला वाटत असेल तर ती चूक आहे. सारे शिपाई आघाडीलाच असतील असं नाहीं. पुष्कळ शिपाई राखीव ठेवण्यांत येतात. शिवाय केंद्रस्थानाच्या ठिकाणीं चांगल्या जबाबदार माणसांची जरूरी असते. जोखमेची भीति सोडून देणं अवश्यक आहे. संकट आलं तर त्याला तोंड देणं अवश्यक आहे. पण जो मनुष्य विनाकारण संकटाकडे धांव घेतो, तो शिपाई नव्हे—मूर्ख आहे......खरी शिपाईगिरी ईश्वर जसं ठेवील तसं राहण्यांत आहे. त्यांत अनासक्ति आहे. हेंच व्यवहाराच्या भाषेंत

बोलायचं तर ह्याचा अर्थ हा झाला कीं ज्या सेनापतीच्या हाताखालीं आपण विचारपूर्वक स्वेच्छेनें गेलों तो सांगेल तसं आपण करावं—हा धडा तूं पचवला आहेस.

...गीतापारायणाविषयींचा तुझा अभिप्राय समजला. काकासाहेबांशीं पोट भरून भांडून घे. पण तुझ्या विरोधाच्या मुळाशीं प्रार्थनेविषयींच तुझी अरुचि किंवा अश्रद्धा असावी असं वाटतं. तुझं चालेल तर तूं केवळ रामनामाच्या धुनेवरच भागवशील. माझी सल्ला अशी आहे कीं प्रार्थनेच्या संपूर्ण विधीविषयीं श्रद्धा बाळग. साधल्यास अर्थावर ध्यान धर. तसं न करतां आलं तर ते शुद्ध संस्कारी आहेत, ते ऐकण्यांत देखील हितच आहे अशी श्रद्धा बाळगून नम्रतापूर्वक ऐक. याचा अर्थ असा करूं नकोस कीं, मला कोणीकडून तरी सात दिवसांच्या गीतापारायणावर आणायचें आहे. ज्या प्रार्थनेच्या मुळाशीं कित्येक लोकांची अनन्यश्रद्धापूर्वक केलेली पंधरा वर्षांची तपश्चर्या आहे त्या प्रार्थनेंत कांहीं तरी असलेंच पाहिजे. एवढंच तुझ्या मनावर ठसविण्यासाठीं हें लिहिलं आहे.

ता. २४।११।३०  
यरवडा मंदिर

**बापूचे आशीर्वाद.**

—※—

## पत्र...८

चि.—

तुझं पत्र वाचून मला फार आनंद झाला. आज तुझे उपवास सुटून दोन दिवस झाले. हें पत्र तुझ्या हातीं येईल तेव्हां तर तुझे उपवास विसरलेही गेले असतील आणि नव्या तारुण्याचा अनुभव घेत असशील. असा अनुभव आला नाहीं तर तो उपवास अपुरा असं मी म्हणेन. परिणाम मला सविस्तर लिहिला असशीलच. तुझा अनुभव दुसऱ्यांच्या उपयोगीं पडला पाहिजे. उपवास कसा सोडावा हें तुला ठाऊक आहेच. उपवासानंतर भूक फार लागते; पण त्याप्रमाणं पोट भरूं नये. दूध दहीं हळूं हळूं वाढवीत जावं. सटरफटर वस्तु खाऊं नयेत. रसाळ फळं खावींत, त्यांत कंजूषपणा करूं नकोस. शरीर निरोगी झालं पाहिजे. उपवास चालू असतां काम बरोबर करतां आलं याचं मला आश्चर्य वाटत

नाहीं. पुष्कळांना तसं करतांना मीं पाहिलं आहे. माझा स्वतःचा अनुभव मजजवळ आहेच. ज्याच्या शरीरांत पुष्कळ रोग आहे त्याला तर उपवासांत अधिक शक्ति जाणवते. तेज अधिक तर येतंच.

तुझ्याविरुद्ध * * * ची तक्रार आहे. तूं मुलांना मारतेस; काठी-चाही प्रयोग करतेस. असं होत असेल तर ती संवय काढून टाक. मुलांना कधींही मारूं नये. क्रॉस्बीनं लिहिलेलं 'टॉल्स्टॉय-शिक्षक' हें पुस्तक आपल्या संग्रहांत आहे तें चाळून पहा. मारानं मुलं सुधारत नाहींत ही आतां सिद्ध झालेली गोष्ट आहे. ज्याला मारून मारून शिकविण्याची संवय पडली आहे, त्याला हें कठीण वाटतं हें मला माहीत आहे. पण हें एखाद्या बंदूकवाल्या शिपायाच्या अनुभवासारखं झालं. त्याला असंच वाटतं कीं, गोळीशिवाय जगांत कांहीं काम व्हायचंच नाहीं. तें होतं हें सिद्ध करण्यासाठीं तर आपण आहोंत. तसंच मुलांचं समजावं.........
.........पुरती झोंप घ्यावी. आहारापेक्षां माणसाला झोंपेची अधिक आवश्यकता आहे. आहाराच्या उपवासांत फायदा होतो पण झोंपेचा उपवास शरीराला झिजवून टाकतो. मेंदूला भ्रमिष्टासारखं करतो आणि मनुष्याला अस्वस्थ करून सोडतो. म्हणून झोंपेविषयीं बेपर्वा राहूं नकोस—रात्रीचे नऊ ते चारपर्यंत जर गाढ झोंप घेतां आली तर मग माझी कांहीं तक्रार नाहीं.

ता. ३०।११।३०. **बापूचे आशीर्वाद.**

---

## पत्र....९

चि.—

तुझं पत्र मिळालं. मुलांच्या शिक्षेसंबंधीं समजलं. तुझा युक्तिवाद जुना आहे. तें 'दूषित वर्तुळ' आहे. तुला मार मिळाला म्हणून तूं सुधारलीस, म्हणून तूं मार दिला पाहिजेस! मुलं मोठीं झालीं म्हणजे हेंच शिकतील. बरोबर हाच युक्तिवाद करून लोक हिंसावाद मान्य करतात. या खोट्या अनुभवाच्या पलीकडे जाणं हें आपलं काम आहे. त्यासाठीं धीर पाहिजे हें मला कबूल आहे. हा धीर अंगीं आणण्यासाठीं आपण एकत्र झालों आहोंत. मुलांना शिकवायचंच किंवा त्यांना शिस्त लावायचीच

हें ध्येय नाहीं. त्यांना चारित्र्यवान् बनविणं हें ध्येय आहे. आणि त्यासाठींच शिक्षण, शिस्त वगैरे सर्व कांहीं आहे. चारित्र्य घडवितांना शिस्तीकडे दुर्लक्ष झालं, शिक्षण बाजूला राहिलं तर राहूं दे तिकडं. तुझं म्हणणं मला समजतं. तुझ्या ताडनांत द्वेष नाहीं हेंहि मला समजतं. तरी त्या ताडनांत रोष आणि अधीरेपणा तर आहेतच—तुला एक सूचना करतों. मुलांची सभा कर. जे असं म्हणतील कीं 'आम्ही दंगा केला किंवा आज्ञाभंग केला तर आम्हांला मारा आणि तें असं असं मारा' त्यांना मारावं नि ते सांगतील तसं मारावं; जे नको म्हणतील त्यांना मारूं नये. असं केल्यानं तुला दिसून येईल कीं मारण्याची जरूरच नाहीं. या विषयाची चर्चा कर. उतावळेपणानं किंवा निराशेनं सोडून देऊं नकोस. तुझ्या बुद्धीला मी सांगितलेलं पटत नाहीं तोंवर तूं तुझ्या मार्गानं जा. मला माहीत आहे की तूं सत्याची पूजा करणारी आहेस. तेव्हां शेवटीं तुला सत्य सांपडेलच.

ता. १४।१२।३०   **बापूचे आशीर्वाद.**

—*—

## पत्र....१०

चि.—

...तूंच मुलगी आहेस असं कल्पून प्रार्थनेसंबंधींच्या तुझ्या प्रश्नाला उत्तर देतों. जसे आपल्याला उत्पन्न करणारे आपले आईबाप असतात, तसेच त्यांना उत्पन्न करणारे त्यांचे—असं थेट वरवर जातां जातां ज्या निर्माणकर्त्याची कल्पना आपल्याला करतां येईल तो ईश्वर. आणि म्हणूनच त्याचं दुसरं नांव 'सर्जनहार' असं पडलं आहे. आणि ज्याप्रमाणं आपल्या आईबापांना पुष्कळवेळां आपल्या इच्छा वगैरे न सांगतां कळतात त्याचप्रमाणें ईश्वराविषयीं आपण समजावं. आणि जर आईबापांमध्यें एवढं जाणण्याची शक्ति असते तर सर्व प्राणिमात्रांच्या निर्माणकर्त्यामध्यें आपलं अंतःकरण जाणण्याची खूप खूप शक्ति असली पाहिजे. म्हणून ईश्वराला आपण 'अंतर्यामी' म्हणूनहि ओळखतों. त्याला प्रत्यक्ष पाहतां आलं पाहिजे अशी कांहीं आवश्यकता नाहीं. आपल्या पुष्कळ नातेवाईकांना आपण पाहिलेलं नसतं.

कोणाचे आईबाप परदेशाला गेलेले असले किंवा मेलेले असले तरी ते आहेत किंवा होते असं दुसऱ्यांवर श्रद्धा ठेवून आपण मानतों. तसंच ईश्वराविपयीं संतजनांची आपल्याशीं साक्ष आहे, तिच्यावर विश्वास ठेवून आपण समजावं कीं अंतर्यामी आहेच. आणि जर तो आहे तर त्याचं भजन करणं, त्याची प्रार्थना करणं हें तर सहज समजण्याजोगं आहे. आपण सद्गुणी असलों तर आईवडिलांना आपण सकाळीं उठतांच आणि रात्रीं निजतांना साष्टांग नमस्कार करतों, तसंच ईश्वराविपयीं केलं पाहिजे. आणि जशी आपण आपली इच्छा आईवडिलांना सांगतों तशीच ईश्वराला सांगितली पाहिजे. आज इतकं पुरे ना ?...

यांतील जर कांहीं लागलं नाहीं तर तसं लिहिण्यांत संकोच करूं नकोस.

ता. २२।१२।३० **बापूचे आशीर्वाद.**

---

टीपः-मुलांमुलींना प्रार्थनेंत गोडी वाटेल असें एखादें पत्ररूपी प्रवचन पाठवा अशी विनंति केल्यावरून हें पत्र लिहिलें गेलें आहे.

——*——

## पत्र...११

चि.—

मन रिकामं असतं तेव्हां मी मुलांचा विचार करतों. डिसेंबरची २३ तारीख सर्वांत लहान कां ? हें मुलांना माहीत नसेल. हें समजावून देतांना भूगोल खगोलाचं थोडंसं ज्ञान सहज देतां येईल. तें तुला करतां येणार नाहीं काय ? लहान दिवसासंबंधीं समजावून देतांना मोठ्या आणि सारख्या दिवसासंबंधींही माहिती दे. त्याचबरोबर ऋतूंच्या फेरफाराविषयीं. खिस्तमस हें काय आहे हेंसुद्धां सांग. अशा तऱ्हेच्या प्रस्तुत (प्रासंगिक) वस्तूंमध्यें दोघांनाही गोडी वाटली पाहिजे—याचप्रमाणें देशी पद्धति पाढ्यांची आणि तोंडच्या हिशेबाची आहे. तीसुद्धां मुलांना खेळतां खेळतां शिकवितां येण्याजोगी आहे. असा विचार करतां करतां सामान्य रीत्या वनस्पतिशास्त्र लक्ष्यांत येत. मी त्यांत ढ आहे. तुला त्यांत कदाचित् कांहीं गम्य असेल, नसेल तर तूं त्याविषयीं सामान्य ज्ञान

मिळवून घेऊन मुलांना द्यावं आणि मलाही टपालामार्फत द्यावं—शिकत जावं नी शिकवीत जावं. याचा तुझ्या डोक्याला बोजा वाटतां कामा नये. मुलांचं आणि माझं मात्र काम होऊन जाईल—जर तूं असं कांहीं केलंस तर. मुलांना दिलं पाहिजे तें आपण देत नाहीं असं मला सारखं वाटतं आहे. सहज प्रयत्नानं देतां येईल तें तरी देऊं या.

ता. ११।१।३१ **बापूचे आशीर्वाद.**

—*—

## पत्र....१२

चि.—

तुझं पत्र मिळालं. माझ्या मतीप्रमाणं विवेकानंदांचं आणि * * * * चं म्हणणं एकपक्षी आहे. जो जसं बोलतो, तसं त्याच्या हृदयाला वाटलं पाहिजे. सुरदास, तुलसीदास इ. भक्तांनीं स्वतःला शठ, कामी इत्यादि विशेषणांनीं संबोधिलं आहे. ती औपचारीक भाषा नव्हती, ते अंतरींचे उद्गार होते. खरी गोष्ट अशी आहे कीं आपल्यामध्यें दोन्ही भावना भरल्या आहेत. अमूर्च्छ स्थितींत आपण स्वतः ब्रह्मरूप भासतों. मूर्च्छितावस्थेंत त्या दयावंतापुढें आपण दीनासारखे असतों. ज्याला आपण दीन आहों असं वाटत नाहीं, तर पूर्ण ब्रह्म आहों असं वाटतं, तो करुणायाचक भजन गाणार नाहीं—असा मनुष्य कोट्यवधींत एकसुद्धां मिळायचा नाहीं. आपल्या अल्पतेचं दर्शन करणं हा महान् होण्याचा मंत्र आहे. वेगळा पडलेला समुद्रबिंदु स्वतःला समुद्र म्हणवीत म्हणवीत सुकून जाईल. तो स्वतःचं बिंदुत्व कबूल करील तर समुद्राकडे जाण्याचा प्रयत्न करीत करीत त्यांत विलीन होऊन समुद्र बनेल.

कल्चर म्हणजे संस्कारिता, एज्युकेशन म्हणजे साहित्यज्ञान. साहित्यज्ञान हें साधन आहे. संस्कारिता हें साध्य आहे. साहित्यज्ञाना-शिवायसुद्धां संस्कारिता येते—ज्याप्रमाणें एकादं मूल शुद्ध संस्कारी घरांत वाढलं असेल तर त्याच्यांत संस्कार आपोआपच उत्पन्न होतात त्याप्रमाणें. आजचं शिक्षण आणि संस्कारिता यांच्यामध्यें या देशांत तरी निदान कांहींसुद्धां मेळ नाहीं. अशा तऱ्हेचं शिक्षण असूनही शिक-

लेल्या लोकांतसुद्धां अजून थोडीशी संस्कारिता टिकली आहे. यावरून दिसतं कीं आपल्या संस्कारितेचीं मुळं फार खोल गेलीं आहेत.

ता. ५।१।३१ बापूचे आशीर्वाद.

—*—

## पत्र....१३

चि.—

तुझं पत्र मिळालं. माझ्या प्रियतम श्लोकाविषयीं एकवेळां मला सांगतां आलं होतं–'मात्रास्पर्शास्तु कौंतेय' इत्यादि. आज निश्चयपूर्वक मी सांगूं शकत नाहीं. ज्यावेळीं जशी मनोवृत्ति त्याप्रमाणं श्लोक प्रिय वाटतो. असल्या प्रयत्नांत आतां मला गोडी वाटत नाहीं. मला सारी गीता प्रिय वाटते. ती माताच आहे. मातेचं कोणतं अंग तुला आवडतं असं जर एखाद्या मुलाला विचारलं तर त्यांत ज्याप्रमाणं कांहीं तथ्य नाहीं तसंच माझ्यासंबंधीं समजावं.

येथें दोनतीन दिवस थंडी पडून गेली. आतां तितकी वाटत नाहीं. कदाचित् चारी बाजूंनीं भिंती आहेत म्हणून असेल. आमच्या दोघांच्या निजण्याचं तर उघड्यावर आकाशाखालींच आहे.

रोलांविषयीं प्रार्थना झाली हें चांगलंच झालं. माझ्याशीं असलेला त्यांचा संबंध बाजूस ठेविला तरी त्यांची निर्मलता फार आकर्षक वाटते.

ता. ११।१।३१ बापूचे आशीर्वाद.

—*—

## पत्र...१४

चि.—

माझी हिंमत कशी आहे ? किंवा हिंदुस्थानच्या भाषांवरील माझं प्रेम कसं आहे ? किती अशुद्ध कां असेना पण तें मराठीच म्हटलें जाईल ना ? पण तुला मात्र मराठींत लिहायला अजून अवकाश आहे...

वनस्पतीसंबंधीं घरगुती ज्ञान तुला *** कडून घेतां येईल. आपल्या मुलांना आश्रमांत उगवणारीं झाडंझुडपं इत्यादि ओळखतां आलं पाहिजे;

आणि तीं कशीं उगवतात, त्यांचं वय काय, केव्हां फळ देतात यांचं ज्ञान त्यांना असलं पाहिजे ना ? मला स्वतःला मात्र तें ज्ञान नाहीं.

संक्रांतीच्या दिवशीं येथें अर्ध्या दिवसाची सुटी जर नसती तर मला तिची बातमीही लागली नसती. तुझे तिळगुळ पोंचले. सध्यां आपली संक्रांति तर रोजच असते असं म्हणतां येईल.

Hero म्हणजे पूजनीय व्यक्ति, देवता. राजकारणांत गोखले हे मला या स्थानीं आहेत. सामान्यतः माझ्या समस्त जीवनावर जे छाप पाडूं शकले आहेत असे टॉल्स्टॉय, रस्किन, थोरो आणि रायचंदभाई हे होत. थोरोला सोडून देणं कदाचित् ज्यास्ती बरं..........

जगामध्यें होणाऱ्या क्रान्त्यांचं कारण महापुरुष असलेले दिसतात. खरं पाहतां त्यांचं कारण स्वतः लोकच असतात. क्रान्ति अकस्मात् होत नसते. ज्याप्रमाणं ग्रह नियमित रीत्या फिरतात तसंच क्रांतिचं आहे. मात्र आपल्याला ते नियम आणि तीं कारणं समजत नाहींत. म्हणून एकाएकी फरक झाल्यासारखं वाटतं एवढंच.

ता. १७।१।३१ बापूचे आशीर्वाद.

—*—

## पत्र....१५

चि.—

तुझीं दोन पत्रं मिळालीं. कडू औषध जर मी पाजलं नाहीं तर दुसरा कोण पाजणार ? तें पिण्यांतच आरोग्यरक्षण आहे. शरीरापेक्षां मनाच्या आरोग्याची पुष्कळच आवश्यकता आहे.

ता. ६।७।३१
बोरसद

बापूचे आशीर्वाद.

—*—

## पत्र....१६

चि.—

तुझं पत्र मिळालं. तुला कितवं वर्ष लागलं हें तूं लिहिलं नाहींस. मला तें ठाऊक असायला पाहिजे होतं हें मी कबूल करतों. पण अशा बाबतींत मी मठ्ठ आहे. 'दीर्घायु हो' असं म्हणण्याऐवजीं मी म्हणेन "लौकर निर्विकार, निर्दोष होऊन आदर्श सेविका बन." तुझा प्रयत्न आहेच. तो सफळ होवो.

तुझ्या पत्रांत तूं दोन्ही रंग भरले आहेस. त्यांत मोकळेपणा आहे तो मला आवडतो. पण त्यांत रोष आहे आणि अभिमानही आहे. पण मी पृथक्करण करीत बसत नाहीं. ... ... ... ... जर तुझ्या टिपणवहींत तूं लिहीत नसशील तर आजपासून हें लिहीः— रोज कोणावर राग काढला (मग तें मूल असो कीं मोठीं माणसं असोत), कोणाला मारलं, कोणाला टाकून बोललें—एवढं माझ्यासाठीं लिहिलंस तरी पुरें आहे. बाकी तूं जाणे नी * * * जाणे. मी तुझ्या कामांत ढवळाढवळ करूं इच्छित नाहीं. तें माझ्या क्षेत्राबाहेरचं आहे. मला तें समजणारहि नाहीं. मला न्याय करतां येणार नाहीं. माझ्यापाशीं तसं साधनहि नाहीं. मी आपला पिता माता होऊन बसलों आहे. म्हणून माझं सांगणं एकपक्षीच होईल. शिवाय सत्याग्रही न्याय मागत नाहीं. न्याय म्हणजे 'जैसे को वैसा.' सत्याग्रह म्हणजे 'शठं प्रत्यपि सत्यम्', हिंसेविरुद्ध अहिंसा, क्रोधाविरुद्ध अक्रोध, अप्रेमाविरुद्ध प्रेम. यांत न्याय जोखण्याला स्थान कुठें आहे?

ता. २६।७।३२ बापूचे आशीर्वाद.
बारडोली

—*—

## पत्र....१७

चि.—

तुझं पत्र मिळालं. तुला पाहिजे तें सारं देतां येईल कीं नाहीं, मला माहित नाहीं.*

......रोम येथील चित्रकला पाहतांना गोडी तर पुष्कळच अनुभवली; पण दोन तास पाहून अभिप्राय काय देणार? माझी शक्ति किती? अनुभव केवढा? मला त्यांतलं कांहीं कांहीं तर खूप आवडलं. तिथं मला दोन-तीन महिने राह्यला जर मिळालं तर चित्रं आणि पुतळे रोज निरखून पाहीन आणि हळूंहळूं त्यांचा अभ्यास करीन. जीझसचा वधस्तंभावरचा पुतळा पाहिला, जास्तींत जास्त माझं मन त्याच्याकडेच आकर्षित झालं, हें मी मागें लिहिलंच आहे. पण तिकडील कला हिंदुस्थानच्यापेक्षां उच्च प्रतीची आहे असं मात्र मला वाटलं नाहीं. दोन्ही कला वेगवेगळ्या प्रकारानं विकसल्या आहेत. हिंदी कलेंत कल्पना भरलेली आहे, युरोपच्या कलेंत निसर्गाचं अनुकरण आहे. त्यामुळं पश्चिमेकडची कला समजून घेण्याच्या दृष्टीनं कदाचित् सोपी असेल. पण समजल्यानंतर ती आपल्याला पृथ्वीलाच चिकटून ठेवणारी असेल तर हिंदुस्तानची जसजशी समजत जाईल तसतशी आपल्याला उंच उंच घेऊन जाणारी असेल. हें सारं आपलं तुझ्यासारखीला सांगण्यापुरतंच समजावं. या विचारांची मला कांहींच किंमत नाहीं. हिंदुस्तानाविषयींचा माझ्या अंतरांत दडलेला पक्षपात हें लिहायला लावीत असेल किंवा माझं अज्ञान मला कल्पनेच्या घोड्यावर बसवीत असेल. पण असल्या घोड्यावर चढेल तो शेवटीं पडायचाच कीं नाहीं? असं असलं तरी तुला यांतून कांहीं मिळत असेल तर घे. अशा गोष्टींच्या तूं पार गेली असशील तर हें फेंकून दे. आपल्यापेक्षां कमी ज्ञान असणाऱ्या मुलांना आईबाप जसे रामायण महाभारतांतल्या गोष्टी, येतील तशा सांगतात आणि आपल्या मुलांची समजूत घालतात, तसंच माझ्या बाबतींत समज. यांच्यांतून

---

* टीपः—युरोपच्या प्रवासांतील स्थळवर्णनें देण्यास विनंति केली होती, तिला उद्देशून.

इतकं मात्र तुला दिसेल कीं कलेंत मला रस वाटतो खरा पण अशा कितीक रसांचा मी त्याग केला आहे—मला करावा लागला आहे. सत्याच्या शोधांत जे रस मिळाले ते मी पोट भरून प्यालों आणि आणखी मिळाले तर प्यायला तयार आहे. सत्याच्या पुजाऱ्याला प्रवृत्ती सहजप्राप्त असतात. त्यामुळें तो स्वभावतःच (गीतेच्या) तिसऱ्या अध्यायाला अनुसरणारा असतो. तिसरा अध्याय वाचण्यापूर्वींच मी कर्मयोगाची साधना करूं लागलों होतों असें मी मानतों. पण हें विषयांतर झालें.

आश्रमासंबंधीं बरं विचारलंस. आश्रमांत उद्योग प्रधान आहे. कारण शारीरिक उद्यम करणं हा मनुष्याचा धर्म आहे. जो उद्यम करीत नाहीं तो चोरीचं धान्य खातो. शिवाय आश्रमाचा उद्योग जितका स्वतःकरितां आहे तितकाच परमार्थ साधण्याकरितां आहे. चरख्याला मध्यबिंदु बनविला आहे; कारण हिंदुस्थानच्या कोट्यवधि लोकांकरितां सर्वसाधारण मदतगार धंदा शेतीव्यतिरिक्त हाच म्हणतां येईल. त्यांत धर्म आणि अर्थ दोन्ही बरोबर संभाळले जातात. आश्रमाचं अस्तित्व केवळ देशसेवेसाठींच नाहीं, तर देशसेवेच्या द्वारा जगत्सेवा साधण्यासाठीं आहे. आणि जगत्-सेवाद्वारा मोक्ष मिळविण्यासाठीं, ईश्वराचें दर्शन करण्यासाठीं आहे.

येईल त्या प्रत्येकाला आश्रमांत दाखल करून घेतां येणार नाहीं. आश्रम हा पंगूभवन नाहीं, अनाथालयहि नाहीं. तो सेवक आणि सेविका यांच्याकरितां—साधकांकरितां—आहे. म्हणून जे शरीरानें काम करतां येण्या-जोगे नसतील त्यांच्यासाठीं तो नाहीं. तथापि जे सेवाभावानं ओले झालेले असतील त्यांचं शरीर पंगू असलं तरी त्यांना आपण घेऊं खरे. असे फक्त थोडेच घेतां येतील. पण आश्रमांत जे आश्रमवासी म्हणून दाखल झाले असतील ते दाखल झाल्यानंतर पंगू झाले तर त्यांना आपण नाहीं काढून टाकणार. बाह्य दृष्टीनें पाहातां आश्रमाच्या पुष्कळ कृतींत विरोधाभास खुशाल दिसो; पण अंतर—दृष्टीनें तपासतां तो आभास उडून जाईल. एवढ्यानं समजलं नाहीं तर पुन्हां विचार. दुसऱ्या कांहीं शंका असल्या तर त्याहि मोकळे-पणानं माझ्यापुढं ठेव.

विलायतेंत फोटोकरितां थोड्याच वेळां उभा राहिलों होतों. त्यांत व्रतभंग झाला नाहीं असं मला वाटतं.

माझ्या सहवासांत असलेल्या सर्वांनीं माझ्यासारखंच झालं पाहिजे असं मुळीच नाहीं. तें इष्टहि नाहीं. तें म्हणजे नक्कल केल्यासारखं झालं. माझ्यांत जेवढं चांगलं असेल त्यांतूनहि जें पचेल तितकंच घेण्यांत सार आहे. बाकी सरदार[१] चहा पितात त्यांना कोण अडवूं शकणार? आणि चहा त्यांना औषधासारखा उपयोगी पडत असला तर? माझ्याबरोबर राहाणारे म्हणजे माझे सोबती कांहीं मांसाहारीहि आहेत; त्यांचं काय? ज्यांना चहा अनुकूल नाहीं किंवा ज्यांनीं चहाची उत्पत्ति वगैरेसंबंधींचा विचार करून चहा न घेण्याचं ठरविलं आहे त्यांनीं नये घेऊं. बा[२] माझ्या सहवासांत असून-सुद्धां चहा पिते, कॉफीहि घेते. तिला मी प्रेमपूर्वक तयार करूनसुद्धां प्यायला देईन. तें कां? तुझ्या प्रश्नांत केवळ विनोद आहे हें मी जाणतों; पण तरीसुद्धां अशा प्रकारच्या बाबतींत आपणांमध्यें थोडी भ्रामक समजूत असते आणि थोडी असहिष्णुता असते. ती काढून टाकणें अवश्य आहे. तुझ्यामध्यें हा दोष आहे कीं नाहीं मला माहित नाहीं; पण माझे यासंबंधींचे विचार तूं जाणून घ्यावे हें बरं......

२५।१।३२ **बापूचे आशीर्वाद.**
यरवडा मंदीर

---

## पत्र...१८

चि.—

तुझं पत्र मिळालं. पुस्तकांची पेटी मी आणलेली ती तेथें पोंचली काय? विद्यापीठांत कोणी राहतें कां? पुस्तकांचा नीट संभाळ ठेवला आहे कीं सारं अव्यवस्थित होत चाललं आहे? मासिकं सुद्धां पुष्कळशीं संभाळून ठेवण्यालायक असतात. खरं म्हणजे असं कीं पुस्तकं संभाळायला एक मनुष्य सगळा वेळ काम देण्याजोगा असा असला पाहिजे आणि त्याच्या हाताखालीं आणखी दोघे; नाहीं तर एवढी मोठी लायब्ररी आपण होऊंच देतां कामा नाहीं. हें काम विद्यापीठाचंच समजलं पाहिजे. आपला तो विषय नव्हे. नव्हे म्हणूनच तर विद्यापीठ काढलं. नाहीं तर आश्रमालाच

---

१ सरदार वल्लभभाई त्यावेळीं महात्माजींबरोबर यरवड्यांत होते. २ कस्तुरबा.

विद्यापीठ बनविलं असतं. आश्रमाचं तें क्षेत्रच नव्हे. आश्रमाचं काम मुख्यत्वें आंतरिक आहे. विद्यापीठाचं मुख्यत्वें बाह्य आहे —असलं पाहिजे. दोघांचा उद्देश एकच आहे; पण प्रवृत्ती स्वतंत्र आहेत. म्हणून आश्रमांत फक्त आवश्यक तेवढींच पुस्तकं ठेवावीं. लागतील तीं वाचण्यापुरतीं विद्यापीठांतून आणावीं. बाकी हें आतां पुनः कामाला लागूं तेव्हां. आज तर सारं पुरांत वाहून चाललं आहे आणि तें ठीकच आहे. पूर ओसरल्यावर विस्तृत आणि कांचेसारखं स्वच्छ पाणीच राहातं ना ?

नागपंचमीच्या उत्सवाची मला आठवण आहे. मी त्यावेळेला जें उत्तर दिलं होतं तें आज कायमच आहे. डोकीं फुटण्याला मी फटाके उडण्याची उपमा दिली होती ना ? आणि जो आत्म्याचे गुण जाणतो तो तर अक्षरशः हें मानील. आत्मा जर मरतच नाहीं तर मग त्याचं घर किंवा कपडे फाटले तुटले, कुजले जळाले तरी त्यांत काय बिघडलं ? शिवाय तो तर सदोदित पूर्ण आहे; म्हणून त्याला नव्या घरादाराची कमतरता नाहीं. जाणीव झाली तर त्याला त्याची जरूरच नाहीं. पण हें सारं स्वतः समजून घ्यायचं आहे; म्हणून जोंवर आपलीं डोकीं फुटतात तोंवर ते फटाकेच आहेत असं समजावं. पण आत्म्याला कसलं आलं आहे आपलं आणि परकं, असा प्रश्न काढूं नकोस. शरीर आहे तोंवर थोड्याबहुत अंशानं आपलं आणि परकं हें असणार, असं समजून चालल्याखेरीज गत्यंतर नाहीं. स्वतः मरत जावं तसतसा आपला आणि परका हा भेद तुटत जाईल. जो परका वाटतो त्याला मारीत जाऊं तसतसा भेद वाढत जाईल. ही गोष्ट जसजशी समजत जाईल तसतशी तरुणांप्रमाणेंच मुलेंही ठिकाणावर येतील. त्यासाठीं धीर धरण्याची जरूर आहे. यासंबंधीं मुलांना लिहिलेलं पत्र पहा.

ता. ३०।१।३२ बापूचे आशीर्वाद.

—*—

## पत्र....१९

चि.—

तुझं पत्र पोचलं.

सरदारांनीं खरोखरीच चहा सोडून दिला आहे. सकाळचा तर सोडूनच दिला होता हें मला माहीत होतं, पण दहा वाजतां पीत असत. आतां तोहि सोडला आहे असं सोडल्यानंतर मला समजलं. मी एकहि शब्द बोललों नाहीं, त्यांनीं आपल्या इच्छेनंच सोडून दिला...

...विरोधाभासाचं असं आहे. माझ्या किंवा आश्रमाच्या जीवनांत जेथें विरोधाचा आभास वाटतो तेथें मेळ दाखवितां येईल. हिंवाळ्यांत पांघरणाऱ्या आणि उन्हाळ्यांत उघडं शरीर ठेवणाऱ्याच्या जीवनांत विरोधाचा आभास उघडच दिसतो. तो एकाच नियमाला वश होऊन नेसतो किंवा पांघरतो. विरोधाच्या अशा पुष्कळ आभासाचा मेळ बसवितां येईल. इतर विरोध ते तर विरोधच आहेत. त्याचं कारण आश्रमाची किंवा माझी दुर्बलता. या विरोधाची दोषांतच गणना केली पाहिजे आणि ते दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. कोणते विरोध विरोध म्हणून दोष म्हणतां येतील आणि कोणते निव्वळ आभास आहेत हें नोंद करायला लागावं तेव्हां समजायचं. तुला जे विरोध वाटले असतील त्यांविषयीं विचारावसं वाटलं तर विचार.

द्वेषाला कारण असल्याशिवाय कोणी द्वेष करीत नाहीं; म्हणून आपल्याला एखाद्यानं द्वेषाचं कारण पुरवलं तरी त्याचा द्वेष न करतां त्याच्यावर प्रेम करावं. त्याची कींव करून सेवा करणं हीच अहिंसा. प्रेमी माणसावर प्रेम करण्यांत अहिंसा नाहीं; तो व्यवहार आहे. अहिंसेला दान म्हणतां येईल. प्रेमाच्या बदला प्रेम करणें हें कर्ज फेडण्यासारखं आहे.

ता. ५।२।३२ बापूचे आशीर्वाद.

यरवडा मंदिर

—*—

## पत्र...२०

चि.—

तुझं पत्र मिळालं. पत्र उशीरां मिळेल तेव्हां त्यावरचा शिक्का पाहून मला तारीख पाठवावी.

किसनला किती शिक्षा झाली ? कुठं ठेवली आहे ?

... ... ... ...

...आश्रमाचा शिक्षणाशीं कांहींच संबंध नाहीं असं तूं माझ्या कोणत्या वाक्यांतून काढलंस ? माझ्या मनांत जें आहे तें हें आहे: अक्षरज्ञानाला—बाहेरच्या शिक्षणाला—आश्रमांत गौणपद आहे. म्हणूनच तो विद्यापीठ होऊं शकला नाहीं. पण बाहेरच्या शिक्षणाची उपयुक्तता—आवश्यकता—आहेच; म्हणून विद्यापीठ जन्माला आलं. दोन्ही एकमेकांच्या पूर्तीसाठीं आहेत. अशी क्षेत्रमर्यादा असल्यामुळं आश्रमांतील पुस्तक-संग्रहाला मर्यादा असली पाहिजे. विद्यापीठाला मर्यादा नसणारच. त्याची मर्यादा आंतरिक प्रयोगाच्या बाबतींत बांधलेली आहे. आश्रमाचं नांव मोठं झालं. त्याच्यासंबंधीं कित्येक अतिरेकाच्या समजुती पसरल्या; त्यामुळं त्याला भेट म्हणून अनेक प्रकारचीं आणि अनेक भाषांतील पुस्तकं येतात. तीं सारीं ठेवण्याची जागा विद्यापीठच होऊं शकेल. आश्रमांत मात्र जो अभ्यास आपण करीत असतों त्याला लागूं असणारींच पुस्तकं असलीं पाहिजेत. तीं कोणतीं हें तूं आणि दुसरे सहज सांगूं शकाल. निर्णय करतांना अडचणी येतील तेव्हां मला विचारावं. पण माझ्या मतें अडचण वाटण्याचं कारणच नाहीं. इतक्या वर्षांच्या आश्रमाच्या अस्तित्वानंतर आपल्याला सामान्यपणें कोणतीं पुस्तकं लागतात हें तत्काळ सांगतां येईल. त्या व्यतिरिक्त आपल्याला आणखी गरज वाटली तर विद्यापीठांतील ग्रंथ-भांडाराचा आश्रय घेतां येईल. दोन्ही संस्था अलग अलग आहेत असं समजण्याचं कांहीं कारण नाहीं. दोन्हींचीं क्षेत्रें स्वतंत्र आहेत; पण दोन्हींत साम्य पुष्कळ आहे आणि तें वाढत जात आहे.

कोणाविषयींहि माझं मन बांधलं गेलं असलं तरी त्याच्याविरुद्ध कांहीं ऐकूं नये किंवा पाहूं नये असं मी जाणून बुजून तर मुळींच करीत नाहीं. ऐकतों नेहमीं, पण त्यामुळं विचार नेहमीं बदलले जात नाहींत.

अवलोकनानंतर बनलेलं मन चट्दिशीं बदलणं हा मी दोष मानतों. कधींहि मन बदलायचं नाहीं हा हट्ट झाला, म्हणून तोहि दोषच. मन बदलायला कांहींतरी सबळ कारण पाहिजे. पुष्कळ वेळां तर मला प्रत्यक्ष पुराव्याची जरूर भासते. हा स्वभाव मी कायम ठेवला आहे आणि त्यामुळें मी पुष्कळ भयांतून वांचलों आहे. माझा इतरांबरोबरचा सहवास निर्मळ राहिला आहे. म्हणून तुला जें कांहीं विचारायचं असेल तें मोकळेपणानं विचार. अशी सवड फिरून नाहीं मिळायची.

तुझं पृथक्करण बरोबर आहे. 'यंग इंडिया'चा लेखक मी ही एक व्यक्ति, आश्रमांत सर्वांच्या परिचयांत येणारा मी ही दुसरी व्यक्ति 'यंग इंडियां'त मी पांडव (सद्गुणी) बनून बसतों, आश्रमांत मी जसा आहे तसा दिसल्यावांचून कसा राहीन? शिवाय मी पडलों सत्याचा पुजारी (उपासक); तेव्हां जाणून बुजून दोष झांकण्याचा यत्किंचित्ही प्रयत्न माझ्या हातून होणार नाहीं. त्यामुळें माझ्यामध्यें असलेले कौरव (दुष्ट गुण) सगळी-कडून बाहेर पडणारच. माझ्यामध्यें देवासुर संग्राम एकसारखा चाललाच आहे असं तूं म्हणालीसच ना? पण कौरवांची हार होत आहे असं मला वाटतं. पण त्याविषयीं आज निश्चयपूर्वक कांहीं नाहीं सांगतां येणार. सोलन* म्हणतो त्याप्रमाणं हें मृत्यूनंतरच सांगतां येईल. लक्षाधीशांचे एका क्षणांत भिक्षाधीश झालेले मी पाहिले आहेत. त्यामुळें कसल्याहि प्रकारचा गर्व वाटत नाहीं. गर्व करून तरी काय फायदा?

ता. १३।२।३२ **बापूचे आशीर्वाद.**
यरवडा मंदिर

---

*सोलन हा एक ग्रीक तत्त्ववेत्ता होऊन गेला. त्याचे कायदे प्रसिद्ध आहेत. तो म्हणे 'कोणाही मनुष्याविषयीं, त्याच्या मरणाअगोदर तुमचा अभिप्राय नक्की करूं नका.'

—*—

## पत्र....२१

चि.—

तुझं पत्र चांगलं आहे. मोकळेपणानं लिहिलंस हें ठीकच झालं. तूं जी टीका केली आहेस तिचं उत्तर हें आहे. मला त्या त्या व्यक्तींचा जबाब ऐकला पाहिजे तरच मला त्या त्या उदाहरणाविषयीं कांहीं सांगतां येईल. पण सामान्यपणें एवढं मला सांगतां येईल कीं जेथें जेथें मोकळीक दिली गेली आहे तेथें तेथें 'प्रिविलेज'चा विचार केलेला नाहीं तर अवश्यकता पाहिली आहे. जे मोकळीक घेतात ते आळसामुळें नव्हे तर त्यांचं शरीर म्हणा किंवा स्वभाव म्हणा, मोकळीक मागतें म्हणून, अशी माझ्यावर छाप पडली आहे. आपण कोणाचे न्यायाधीश होऊं शकत नाहीं. त्यांच्या प्रयत्नांची आपल्याला माहितीहि असणार नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं त्यांच्यांत अपूर्णता नाहीं. अपूर्णता नसती तर आश्रमांत कशाला आले असते ? ते ढोंगी नाहींत. मी करतों तें साऱ्यांनीं केलंच पाहिजे किंवा साऱ्यांना करतां येईल असं समजण्यांत महादोष आहे. जें ओझें भीम उचलतो तें मी उचलायला लागलों तर त्याच क्षणीं मला 'राम' म्हणावा लागेल; आणि भीम जर माझ्या पंगूपणाचा हेवा करील तर तें चुकीचंच म्हटलं पाहिजे.

मला लोक फसवितात असा पुष्कळांनीं आरोप केला आहे. कोणी फसवीत नाहीं असं नाहीं; पण पुष्कळसे नाहींच फसवीत. मला असा अनुभव आला आहे कीं पुष्कळजण माझ्यासमक्ष जें वर्तन ठेवूं शकतात तें नंतर तसंच राखूं शकत नाहींत. या कारणामुळें कित्येक माझा त्यागही करतात. असं पुष्कळ वेळां होतं, म्हणूनच माझ्यावर आकर्षण–शक्तीचं आरोपण केलं जातं.

पण एवढ्यानं तुझं किंवा इतरांचं समाधान व्हायचा संभव कमीच. हें मी माझा बचाव करावा म्हणून लिहिलं नाहीं. मी फक्त माझी मनोदशा दर्शविली आहे. पण चांगली गोष्ट ही आहे—आणि ती मी अनेक वर्षांपासून मानली आहे कीं, आश्रमाचा कमीपणा हा माझ्या कमीपणाचं प्रतिबिंब आहे. मी पुष्कळांना सांगितलं आहे, कीं माझी ओळख मला भेटून व्हायची नाहीं. मला भेटल्यानं मी चांगलाही दिसेन, माझ्यांत नसतील ते गुणहि

लोक माझ्यावर लादतील; कारण मी सत्याचा पुजारी आहे, म्हणून ती पूजा दुसऱ्याचे डोळे क्षणभर दिपवील. पण मला ओळखण्यासाठीं माझ्या गैरहजेरींत आश्रम पाहिला पाहिजे. त्यांत दिसणारे सगळे दोष हे माझ्या दोषांचं प्रतिबिंब आहे असं समजण्यांत यत्किंचित् देखील चूक होणार नाहीं—मजवर अन्याय होणार नाहीं. जो समुदाय आश्रमांत गोळा झाला आहे त्याला मी ओढून आणलं आहे असंच म्हटलं पाहिजे, आणि तीं माणसं आश्रमांत राहूनसुद्धां दोष काढून टाकूं शकलीं नसतील किंवा एकंदरीनं दोष वाढले असतील तर त्यांत त्यांचा दोष नाहीं, माझा आहे. यांत माझ्या साधनेंतलि उणीव आहे. या उणीवाही मी पहात नाहीं किंवा मला त्या समजत नाहींत असंहि नाहीं. मात्र मी इतकंच सांगूं शकतों कीं ज्या उणीवा आहेत त्या प्रयत्न करूनहि राहिल्या आहेत. आणि मी प्रयत्नशील आहे या कारणानं एकंदरीनं आश्रमाचं पतन झालेलं नाहीं अशी मला प्रतीति आहे. ज्या तीन ठिकाणीं आश्रम काढले त्या तीन्ही ठिकाणीं त्यांचे तात्कालिक हेतु सफल झालेले आढळून आले आहेत, हें मला स्वतःला आश्वासनच आहे. पण या आश्वासनानंसुद्धां मी मला किंवा दुसऱ्या कोणाला फसवीन असं नाहीं. मला तर जायचं आहे खूप दूर, वाटेंत डोंगर–दऱ्या आडव्या आहेत. तरी यात्रा पुरी केलीच पाहिजे आणि सत्याच्या शोधांत निष्फळतेला अवकाशच नाहीं या जाणिवेनं मी निश्चित आहे.

आश्रम विद्वान् समाजाला आकर्षूं शकला नाहीं हें खरंच आहे. कारण मी मला विद्वान् समजत नाहीं. शिवाय जे मूठभर विद्वान् आश्रमाकडे खेंचले गेले आहेत ते विद्वत्ता वाढविण्याकरितां नव्हे तर दुसरंच कांहीं घ्यायला—वाढविण्याला—गोळा झाले आहेत. ते सारे सत्यशोधक आहेत आणि सत्याचा शोध तर अशिक्षितांनीं करावा, मुलांनीं करावा, म्हाताऱ्यांनीं करावा, स्त्रियांनीं करावा, पुरुषांनीं करावा. अक्षरज्ञान कित्येक वेळां हिरण्मय पात्राचं काम करतं आणि सत्याचं मुख झांकून टाकतं.

असं म्हणून अक्षरज्ञानाची मी कांहीं निंदा करीत नाहीं; तर त्याला त्याचं योग्य स्थान देत आहे. अनेक साधनांपैकीं तेंहि एक साधन आहे.

आश्रमांत प्रार्थना मुख्यत्वें संस्कृत पसंत केली आहे; कारण आश्रमांत समुदाय मुख्यत्वें हिंदूंचा आला. दुसऱ्या प्रार्थनांचा द्रोह नाहीं,

केव्हां केव्हां आपण त्या करतोंच कीं नाहीं ? पुष्कळ हिंदूंच्या ऐवजीं जर पुष्कळ मुसलमान आले तर कुराने शरीफ रोज पढलं जाईल आणि त्यांत मीही भाग घेईन. यांत तुला कांहीं उत्तर मिळतं का ? समाधान होतं का ? नसेल तर पुनः पुनः विचार. मी थकणार नाहीं. तुझं समाधान व्हावं हीच इच्छा. तूं थकूं नकोस.

ता. १९।२।३२
यरवडा मंदिर

बापूचे आशीर्वाद.

---

## पत्र....२२

चि.—

तुझं पत्र मिळालं. तूं माझ्याकडून हृदयाला हलवून सोडणारीं सूत्ररूप वचनं मागते आहेस. माझ्यापाशीं जर तिजोरी असती तर ती उघडून त्यांतून दर आठवड्याला मी तुला कांहीं ना कांहीं पाठवीत गेलों असतों. पण माझ्यापाशीं तसं कांहींच नाहीं. जीं वचनं निघतात तीं आपोआप निघतात. आणि तशीं निघतात तींच खरीं, कारण तीं जिवंत वचनं म्हणायचीं. दुसरीं वचनं कृत्रिम, तीं सुरेख वाटलीं तरी त्यांचा परिणाम टिकून रहात नाहीं असं मला वाटतं. माझ्याकडून कृत्रिम असं कांहीं होऊंच शकत नाहीं. विलायतेंत अभ्यासकाळीं दोन वेळां असा प्रयत्न केला व दोन्ही वेळां तो फसला. त्यानंतर तसा प्रयत्न केलाच नाहीं.

आणि जसं वचनांविषयीं तसंच माझ्याविषयीं जे जे अनुभव तूं लिहिले आहेस त्याविषयींहि समज. मीराबाईविषयीं आपण बोललों होतों त्याचं मला स्मरण आहे. त्यावेळीं जसं मला सुचलं असेल तसं मी उत्तर दिलं असेल. त्या उत्तराची छाप तुझ्यावर चांगली पडली नाहीं हें मी समजूं शकतों. तेवढी माझी अहिंसेमधील उणीव. मी त्या वेळेला जसं मला वाटलं तसंच सांगितलं असेल, पण त्यांत तुला दंश दिसला असण्याचा संभव आहे. 'सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात्' हें केवळ व्यवहारवचन नसून हा सिद्धांत आहे. 'प्रियम्'चा अर्थ अहिंसक असा आहे. मी जें तुला आवेशांत सांगितलं असेल तेंच जर मीं तुला नम्रतापूर्वक सांगितलं असतं तर

जी कटु छाप राहून गेली ती राहिली नसती. अहिंसक सत्याच्या बाबतींत मात्र असं होतं कीं त्यावेळेस तें कडू वाटतं, पण परिणामीं तें अमृतमयच वाटलं पाहिजे. ही अहिंसेची अनिवार्य कसोटी आहे. मी हें लिहीत आहे तें मला स्वतःला आलेल्या कटु अनुभवांवरून लिहीत आहें. मीराबाईविषयीं तर तुला मी तिची बाजू घेऊन पुष्कळ भारपूर्वक सांगितलं असेल; पण तिला मी जितकं रडवलं आहे तितकं कोणाच स्त्री-पुरुषांना रडविलेलं नाहीं. आणि त्याचं कारण माझी कठोरता, अधीरपणा आणि मोह. मीराबाईनें केलेला त्याग मी अवर्णनीय समजतों आणि म्हणून तिनं पूर्ण व्हावं अशी माझी इच्छा. त्यांत थोडी कां उणीव दिसली कीं त्या मोहामुळें उतावळेपणानं तिला कांहीं रागावून बोललों कीं परिणाम अश्रुधारा. या अनुभवांतून मला माझ्यांत भरलेली हिंसा पारखतां आली. आणि त्यामुळें माझीं गतस्मरणं आठवून मी मला स्वतःला सुधारण्याचा प्रयत्न करूं लागलों आहे. त्यामुळें तुझीं पत्रं मला बरीं वाटतात. तुला उत्तर म्हणून मी कांहीं देऊं शकेन कीं नाहीं माहीत नाहीं, पण मला मात्र लाभ होत आहे. या वस्तूची-माझ्या कठोरतेची-जाणीव मला विलायतेंत झाली. माझ्या सेवेंत मुख्यत्वें मीराच होती. तिथंसुद्धां तिला रडविण्यांत मी बाकी ठेवली नव्हती. पण त्यांत मला शिक्षण मिळालं. कुठल्याहि बाबतींत माझी मूढावस्था ईश्वरानं फार वेळ टिकूंच दिलेली नाहीं. राजकारणांतसुद्धां जेव्हां जेव्हां मी चुकलों आहे तेव्हां तेव्हां ईश्वरानं मला लागलीच सुधारलं आहे. तुझीं पत्रं अशा जागृतीला सहाय्यरूपच आहेत.

पण आतां तुला माझं मागचं पत्र जास्त चांगलं समजेल. अपूर्णामधून पूर्णाची अपेक्षा कशी करतां येईल? एका आंधळ्यानं आंधळ्यांचा संघ गोळा केला आहे. पण आंधळा आपला आंधळेपणा जाणतो आहे; त्याचं औषधही त्याला ठाऊक आहे. म्हणून आंधळ्यांना संगतीला ठेवूनसुद्धां त्याला विश्वास आहे कीं तो त्यांना विहिरींत पाडणार नाहीं, स्वतःही पडणार नाहीं. तो आपल्याबरोबर काठी घेऊन चालला आहे. काठीनं पुढचा रस्ता चांचपीत तो जात आहे आणि पाऊल टाकीत आहे; त्यामुळें एकंदरीनं आतांपर्यंत सारं कुशलच झालं आहे. काठीचा उपयोग करीत

असतांनासुद्धां जेव्हां जेव्हां थोडासा रस्ता चुकला आहे तेथें ताबडतोब चूक कळून आली आहे आणि मागें फिरून सोबत्यांनाहि आपल्यामागें फिरविलं आहे. माझा आंधळेपणा चालू आहे तोंवर तुझ्यासारख्या प्रेमी माणसांनासुद्धां टीका करण्याला कारणं मिळत राहातील. आंधळेपणा जाईल तेव्हां टीकेचीं कारणं अशक्य होतील. त्या दरम्यान आपण सारे आंधळे सत्यार्थी असल्यामुळें हत्तीला जसा पाहूं तसा वर्णूं. आपलीं सर्वांचीं वर्णनं भिन्न असलीं तरी तितक्या तितक्या अंशांनीं तीं अगदीं सत्यच असतील. आणि शेवटीं आपण सर्वांनीं हत्तीलाच स्पर्श केला असेल. जेव्हां आपले डोळे उघडतील तेव्हां आपण सगळे मिळून नाचूं आणि ओरडूं कीं ‘ अरे, आपण कसे आंधळे ? हा तर हत्ती, ज्याच्याविषयीं आपण त्या गीतेंत वाचलं होतं–आपले डोळे लवकर उघडले असते तर किती बरं झालं असतं ! ’ पण उशीरां उघडले म्हणून चिंता कसली ? ईश्वराच्या इथं वेळेला मापच नाहीं किंवा वेगळं माप आहे. तेव्हां ज्ञानांत अज्ञान लुप्त होऊन जाईल.

तुला माझ्यांत जें जें कांहीं वेडंवाकडं दिसलं असेल त्याचीं उत्तरं आतां यांतून काढून घेशील ना ? याचा अर्थ असा नव्हे कीं आतां तूं आपले प्रश्न माझ्यापुढें ठेवूं नयेस. ठेवीत जा आणि मी त्यांचीं उत्तरं देत जाईन.

**बापूचे आशीर्वाद.**

ता. २५।२।३२
यरवडा मंदिर

—*—

## पत्र....२३

चि.—

तूं यज्ञ पूर्ण करण्याला विसरलीस यांतच मला वाटतं रामानं तुझा मद उतरविला. ही चूक जेवढी मोठी तूं मानतेस तेवढी मी मानीत नाहीं. तूं मोठी समजतेस तें बरोबरच आहे. मद उतरविला एवढ्यासाठीं म्हणतों कीं चुकीचे पुतळे असे जे आपण ते एखाद्या कामांत एकसुद्धां जर चूक न करूं तर आपल्यांत गर्व (मग तो वाटेल तितका सूक्ष्म असो) उत्पन्न होण्याचा संभव असतो. नारदाच्या बाबतींत जसं रामचंद्रांनीं कीं शिवानं (?) केलं तसं रामानं तुझ्या बाबतींत केलंसं दिसतं. दोन्ही कामं झालीं. गर्व उतरला नी आतां चूक होणार नाहीं.

तुझ्या पत्रांत जीं शद्वचित्रं आहेत त्यांवर आज कांहीं लिहिण्याजोगं नाहीं. तूं कठोर आहेस असं मी म्हणत नाहीं. तुझी टीका माझ्या उपयोगाचीच आहे. सर्वांमध्यें गुणदोप भरलेले आहेत. तूं जर गुण कमी पहात असशील तर जास्ती पहाण्याचा अभ्यास कर.

माझ्या पत्रानं विचारांत पडण्याचं *** ला कांहीं कारण नव्हतं. *** यज्ञ करीतच आहे. दुसऱ्या शारीरिक कामासाठीं त्याला मी वेळच ठेवलेला नाहीं, त्याला तो काय करणार ? यांतसुद्धां माझ्या रचनाशक्तीची अपूर्णता आहे. आश्रम सुरूं केला तेव्हांच सुव्यवस्था करूं शकलों असतों, तर आज कांहींजणांचा केवळ देखरेख करण्यामध्यें वगैरे वेळ जातो तसा गेला नसता. चाललं तें चाललं. अजून फेरफार होऊं शकेल असं मला वाटतं. पण तो कसा करावा हें त्यांना सुचत नाहीं आणि माझ्यापेक्षां अशा बाबतींत आश्रम–नियमांना अनुसरून अधिक विचार करून अंमल करायला लावणारा किंवा लावणारी कोणी आपल्याला अजून मिळालेलं नाहीं. मिळत नाहीं तोंवर आहे तें सहन करावं–पुष्कळ अपूर्णता आहे हें लक्षांत ठेवावं. कारण माझं मत आहेच कीं आश्रमांत सगळेजण शारीरिक काम यथाभाग करूं शकतील आणि सुव्यवस्था राखतां येईल असं करणं शक्य आहे. हा विश्वास बाळगून आपण चालूं, केव्हां तरी किल्ली हातीं लागेल.

ता. ७।३।३२ **बापूचे आशीर्वाद.**

यरवडा मंदिर

—*—

## पत्र....२४

चि.—

तुझं पत्र मिळालं. आतां मला डाव्याच हातानं लिहावं लागेल, तेव्हां फार मोठीं पत्रं नाहीं लिहितां येणार. डावा हात उजव्या हाताच्या गतीनं चालायचा नाहीं. महादेवाची मदत आतां मिळेल खरी, पण ती जेलच्या बाबतींत नवा प्रयोगच म्हणायचा. पाहूं कुठवर मी लिहून घेऊं शकेन तें. फक्त प्रेमाचीं पत्रं लिहून घ्यायला जमेल कीं नाहीं हें पहायचं आहे. कामाचींच असतील तेवढीं लिहून घेईन.

तुझ्या पत्रानं मी मुळींच त्रासलों नव्हतों. आपणां सर्वांना एक तर नित्य वाढलं पाहिजे किंवा कमी झालं पाहिजे. स्थिर असं कांहींच नाहीं.

दोषाचं खापर मी माझ्यावरच घेतों यांत भलतीच नम्रता किंवा अतिशयता मुळींच नाहीं. याचा अर्थ असा नाहीं कीं दुसरे दोषमुक्त होतात. पण जो मुख्य आहे तो जसा चांगल्याचं यश घेतो तसंच वाईटाच्या अपयशाचा धनीहि त्यानं बनलंच पाहिजे.

संकरविवाहाची आवश्यकता अमुक मर्यादेपर्यंत मी मान्य करितों.

जर पुरुषाला काडीमोड करण्याचा अधिकार असेल तर स्त्रीला तो असला पाहिजे. पण सामान्यतः मी या प्रथेच्या विरुद्ध आहे. प्रेमाची गांठ अविभाज्य असावी.

स्त्री-पुरुषांचं शिक्षण वेगळंहि असावं आणि एकत्रहि असावं. विषयावर तें अवलंबून आहे. वकिलीचं शिक्षण एकत्र घ्यावं. यासंबंधीं सर्व देशांच्याकरितां सर्व परिस्थितींत लागू पडणारा एक नियम मला नाहीं घालून देतां येणार. हा विषय सोपा नाहीं. कोठेंहि निश्चयपूर्वक परिणाम कोणी दाखवूं शकलेला नाहीं. हा सारा प्रश्न प्रयोगाच्या क्षेत्रांत आहे.

सौंदर्याची स्तुति झालीच पाहिजे, पण ती मूक बरी; आणि ‘ तेन त्यक्तेन भुंजीथाः ’ आकाराच्या सौंदर्याच्या दर्शनानं जो हर्ष पावणार नाहीं त्याला कांहींच आवडायचं नाहीं असं म्हणतां येईल, पण जे हर्षवेडे होऊन नक्षत्रमंडळाला पोंचण्यासाठीं जिना बांधायला लागतील ते मूर्च्छित आहेत.........

...जपान चीनच्या बाबतींत आपली सहानुभूति चीनकडेच झुकणार. पण खरी स्थिति मी कोणा तरी मुलाच्या पत्रांत दाखविली आहे तीच वाटते.

ता. १३।३।३२ बापूचे आशीर्वाद.
यरवडा मंदिर

—*—

## पत्र....२५

चि.—

डाव्या हातानं लिहिण्याचा आग्रह धरला कीं लिहिण्याची प्रवृत्ति आपोआपच कमी होते. अजून ती संवय पडली नाहीं म्हणून. विलायतेहून जे कागद वगैरे आणले आहेत ते आपण वापरायचे आहेत. त्यामुळें बुद्धिभ्रंश होण्याचा संभव असेल तर तसेच ठेवावेत. मागाहून वापरतां येतील......

......यज्ञाविषयींचा अभिमान ( आग्रह ) आवश्यक आहे. अभिमान ( गर्व ) म्हणजे मी कसली, माझा यज्ञ चुकायचाच नाहीं. हा अभिमान त्याज्य आहे.

मला माया बांधणारच नाहीं असं अधिकारपूर्वक मी सांगूं लागेन तरच * मेघजीविषयीं मला जबाब द्यावा लागेल ना ! तिच्या ( मायेच्या ) पाशांमधून सुटण्याचा प्रयत्न करीत असतांनासुद्धां कोमलता आणि सेवाभाव आपण सोडूं नये. कोणी मेलं तर काय होईल हा विचार मूर्खपणाचा आहे, मायेचा नाहीं. मरायचं सगळ्यांनाच आहे हें एकदां जाणल्यानंतर त्याचा विचार कशाला ? आणि दुसरं म्हणजे आपण स्वेच्छेनं नटवराच्या हातांतील बाहुली झाल्यानंतर मग वाटाघाट कशाला ? त्याला जसं नाचवायचं असेल तसं तो नाचवील. मूळ गोष्ट नाचण्याचीच ना ? ज्याला सदोदित नाचायला मिळेल त्याला दुसरं काय पाहिजे ?...

...तुझ्या दोषांची चर्चा मी करावी अशी मागणी करून तूं स्तुति मागते आहेस काय ? मला तुझे दोष दाखवायचेच नाहींत. एकाहून

---

* देवी येऊन वारलेला आश्रमांतील एक लहान बालक.

अधिक वेळां मी ते तुला दाखविले नाहींत काय ? त्यांत किती सुधारणा केल्यास तें सांग म्हणजे मग जास्त विचार करूं.

ईश्वराच्या भक्तांत कांहीं प्रमाणांतच समता असते. पूर्ण समता ज्याच्यांत प्रगटते तो परमेश्वर, पण तो तर एकच आहे. तेव्हां पूर्णतम मनुष्यांतसुद्धां समता अपूर्णच असणार ! म्हणून मतभिन्नता आणि विरोध. त्यांत दुःख मानण्याचं कारण नाहीं. जगत्=विषमतेचा परिणाम. आपला धर्म समतेचा अंश रोज कमावण्याचा असावा. असं करतांना विषमता असह्य वाटण्याऐवजीं सह्य व कांहीं अंशीं सुंदरहि वाटेल.

इतर देशांहून हिंदुस्थानांत सगळं चांगलं आहे असं मानण्याचं कारण नाहीं. शिवाय चढती उतरती हा विश्वाचा नियमच आहे. एकंदरीनं हिंदुस्थानांत पुष्कळ चांगलं आहे म्हणून हिंदुस्थान हा जितराष्ट्र झाला–जिंकणारा नाहीं झाला. याचा गर्भित अर्थ असा कीं गुलामापेक्षां जुलूम करणाऱ्याची स्थिति अधिक वाईट असते.

आपल्याकडे खगोलविद्येची आणि अप्टन सिंक्लेरचीं कोणतीं पुस्तकं आहेत ?

ता. २१।३।३२ बापूचे आशीर्वाद.

यरवडा मंदिर

—*—

## पत्र.... २६

चि.—

तुझ्या मनांत येतील ते प्रश्न विचारीत जा. पुनः अशी संधि कदाचित् येणार नाहीं. तुला माहीत नाहीं मी एका ओळींतहि उत्तर देऊं शकतों आणि पानच्या पान चितारूं शकतों. जास्ती लिहिण्याजोगं नसलं तर थोडक्यांत संपवीन. तरी उत्तर अपुरं असायचं नाहीं. माझ्या उजव्या हातावर तुझ्या जिभेचा परिणाम झाला असं समजणं म्हणजे कावळा डहाळीवर बसला आणि डहाळी तुटली म्हणून कावळ्याच्या भारानं डहाळी पडली असं समजण्यासारखं आहे.

मला स्वप्नं पडतात खरीं; पण मनाचं तिकडं क्वचितच लक्ष असतं. स्वप्नं पडतात त्यावर मी कांहीं जोर देत नसतों.

आपल्या पुस्तकालयांत कार्लाइल आणि रस्किनच्या पुस्तकांचा पुरा सेट असतो. असला तर त्याची यादी पाठीव.

सगळ्या पुस्तकांच्या याद्या आपल्याजवळ किती आहेत? एकाहून जास्त असतील तर एक मला पाठीव.

प्रौढ स्त्रियांविषयीं मी तुला कधीं लिहिलेलं नाहीं. आज लिहावंसं वाटतं. आश्रमांतील भगिनी कोणत्याहि सामाजिक हेतूनं एकत्र जमत असलेल्या दिसत नाहींत. म्हणजेच संघ मोडला आहे. याविषयीं *** ना आणि * * ला लिहिलंच आहे; पण त्याचा कांहीं परिणाम झालेला दिसत नाहीं. मिळून काम करण्याची, जबाबदारी अंगावर घेण्याची शक्ति स्त्रियांत आली पाहिजे. तुला हिम्मत आणि आत्मविश्वास वाटत असेल तर तूं हें काम हातीं घे. जर हातीं घ्यायचं असेल तर 'हरणार नाहीं' असा निश्चय करून घे. आपल्याजवळ सारी अनुकूलता झाली म्हणजेच काम करावं हें कांहीं केलं म्हणायचं नाहीं. वाटेल त्या लाकडाच्या ठोकळ्यांतून सुतार आकृति घडवितो, वाटेल त्या दगडांतून पाथरवट मूर्ति तयार करतो. तसंच वाटेल तसल्या माणसांच्या संगतीला राहायला आणि त्यांच्याकडून काम करून घ्यायला आपल्याला आलं तरच माणुसकी म्हणायची. मला तर वाटतं कीं आपल्याला हेंच या जगांत शिकायचं आहे; व त्यासाठीं आपल्यांत सागराची उदारता असली पाहिजे. एखाद्याला भेटल्याबरोबर त्याचे दोषच पाहायला लागलों तर काम बिघडायचंच. दोष तर आपल्यांत आणि आपल्यासमोरच्या माणसांत आहेतच. तरीसुद्धां त्याच्याशीं आपल्याला मिसळायचं आहे असा निश्चय असेल तरच काम पार पडेल. हें फार कठीण काम आहे हें मला माहीत आहे. पुष्कळ वर्षांपासून माझा तर हा धंदाच आहे, पण मी पार पडलों आहें असें नाहीं सांगूं शकणार. थोडीशी सफलता मिळालीशी वाटते म्हणून तर इतरांना पुढं नेण्याची हिम्मत किंवा धृष्टता (धाडस) करतों.

आतां तुला योग्य वाटेल तसं कर. हें पत्र भगिनींच्या पुढं ठेवायचं असेल तर ठेवूं शकतेस.

ता. २८।३।३२ **बापूचे आशीर्वाद.**

यरवडा मंदिर

—*—

## पत्र....२७

चि.

तुझं पत्र मिळालं. तलवार, जंबिया इ. चे प्रयोग आपण आश्रमांत कां करावे ? ही गोष्ट * * * च्या पत्रांत चर्चिली आहे; तेव्हां इथं त्याविषयीं नाहीं लिहीत. तूं स्वत: तें शिकत आहेस म्हणून तुला असा प्रश्न उत्पन्न झाला कीं नाहीं हें विचारण्यापुरतंच इथं हें लिहिलं आहे.

तूं आश्रमाला प्रमाणपत्र देत आहेस तें मी देणार नाहीं. खरं असेल तर मात्र हें प्रमाणपत्र मला आवडेल खरं. आश्रम जो प्रश्न हातीं घेतो त्याच्यामागें वेडा होतो ही छाप तुझ्यावर पडली असेल कदाचित्. ती बरोबर नाहीं. आश्रमाचीं व्रतंच आपण पुरीं कुठं अंमलांत आणतों आहोंत ? आश्रमांत हिंदी, उर्दु, तामिल, तेलुगु, संस्कृत शिकवायचं होतं. त्या बाबतींत फारच शिथिल प्रयत्न झाला आहे. कांतण्याची कला कुठें आपण शिकलों आहोंत ? उत्तम बारीक सूत आपण कुठं काढतों आहोंत ? अशा पुष्कळच गोष्टी मी दाखवूं शकेन. माझ्या शंकेच्या समर्थनार्थ एवढं पुरे आहे. लाठी इ.च्या मागें सगळे लागूं शकतात; हें म्हणजे मिठाईच्या मागें सगळे लागतात असं सांगण्यासारखंच झालं. अशा वस्तू जगांत आहेत कीं ज्यांच्यामागें लागण्यांत परिश्रम लागत नाहींत. आपण पशुकुटुंबाचेहि असल्यामुळें हा गुण आपल्यांत स्वाभाविक आहे. तो कांहीं कमवावा लागत नाहीं. तो कमाविणं योग्य आहे कीं नाहीं हा प्रश्न आहे. पशुजातीचे सर्व गुण त्याज्य आहेत असं तर नाहींच.

हल्लीं रसोड्यांत ( भोजनगृहांत ) कितीजण जेवतात ? पावरोटी अजून होते का ? होत असेल तर कोण करतें ? चांगली होत असेल तर कोणी इकडे येईल त्याच्याबरोबर एक दोन पहावयास पाठवाव्या.

दीक्षितांच्या ‘ ज्योतिःशास्त्रा ’चं गुजराती झालं आहे तें माझ्याजवळ आहे. बॉल चं इथं मिळेल. तेव्हां मागवीत नाहीं. अप्टन सिंक्लेरनें पाठविलेलीं पुस्तकं आश्रमाचींच आहेत. तीं दाखल करून घे आणि त्यांतलीं ‘ बोस्टन् ’ आणि ‘ ब्रास टॅक्स ’ हीं पाठीव. बाकीच्या पुस्तकांची यादी पाठीव.

उपनिषदं मला आवडतात. त्यांचा अर्थ लिहिण्याइतकी माझी योग्यता आहे असं मला वाटत नाहीं.

माझी विनोदी प्रकृति तूं ओळखली पाहिजेस. 'स्तुति करून घेण्यासाठीं दोष विचारतेस ?' असं विनोदांतच विचारायचं असतं. त्यांत एवढं सत्य आहेच कीं जें माणूस प्रेमी जनाकडून दोष विचारून घेतं त्याचा परिणाम स्तुति ऐकायला मिळण्यांतच व्हायचा. कारण प्रेम हें दोषावर पडदा टाकतं किंवा दोषांना गुणरूपानं पाहातं. प्रसंगोपात दोष दाखविले हा प्रेमाचा स्वभाव आहे आणि तेंहि संपूर्णता पाहाण्यासाठींच * * * जवळ तुला मी हिस्टेरिकल म्हटलं होतं. त्यांतसुद्धां तुझी स्तुति होती हें * * * नें तुला सांगितलं काय? कारण जर मीं तुला हिस्टेरिकल् समजलों नाहीं तर तूं जास्तीच दोषी ठरली असतीस असा तो संबंध होता. तूं हिस्टेरिकल् आहेसच. तूं वेड्यासारखी होतेस याचा अर्थ काय? ज्या माणसाला भावनेची उसळी येते तें हिस्टेरिकल् आहे हें समजतं ना?

जपानला रशियाविरुद्ध जय अवश्य मिळावयाला पाहिजे होताच; पण म्हणून जपानची नीति अनुकरणीय आहे असं नाहीं. पण आज आपण आपली नीति संभाळली तरी पुष्कळ झालं. जपानची नीति संभाळणारा कोट्यवधि डोळे असणारा सदोदित जागृत असा सत्पुरुष बसलाच आहे.

ता. ३।४।३२. **बापूचे आशीर्वाद.**

---

## पत्र....२८

चि.—

तूं एका धोंड्यानें पुष्कळ पक्षी मारण्याचा लोभ बाळगतेस त्यापेक्षां एका फटक्यासरशीं पुष्कळ बोरें पाडण्याचा लोभ कां बाळगत नाहींस? पक्षी मारण्याचा लोभ निदान तुला तरी त्याज्य असावा.*

भगिनीविषयीं संकटांत पडण्याचं कारण नाहीं. भगिनींची तुझ्याकडून ही सेवा घेण्याची इच्छा असेल तर आणि तुला आत्मविश्वास वाटत असेल तर तूं ती द्यावीस, नाहीं तर ही गोष्ट जणूं पुढें आलीच नाहीं असं समजून विसरून जावी. आत्मविश्वास शिक्षण देण्याच्या बाबतींत नव्हे तर तुझ्या नम्रतेविषयीं; गैरसमज होऊं न देण्याविषयीं, कठिण प्रसंग उभे राहतांच त्यांना पुरून उरण्याविषयीं. पुष्कळ वेळां आपण मानभंग, गैरसमज इ. च्या भीतीनें जबाबदारी घ्यायला बिचकतों. या संकोचाला तूं ओलांडूं शकशील तर जबाबदारी घ्यावी. भगिनी सगळ्या भल्या आहेत असं तूं मानतेस. त्यांचे विचार लिहूं शकेल, कचेरी संभाळील अशा मदतनिसाची त्यांना जरूर आहे. अशिक्षित स्त्रियांत शिक्षित मुलींपेक्षां समज आणि व्यवहारबुद्धि जास्त असूं शकेल. पण त्यांना या बुद्धीचा उपयोग निरक्षरतेमुळें करतां येत नसेल. ही उणीव मुलींच्या द्वारा भरून काढतां येण्याजोगी आहे. ही उणीव तूं भरून काढावीस ही माझी इच्छा......कांहींना कांहीं मिशानें ** बाई सर्व भगिनींना गोळा करीत. त्यांना असा लोभ होता व त्यांनीं बीज पेरलं होतं......त्या बीजाचा वृक्ष पाहण्याची आशा मी ठेवली आहे. सामाजिक कामं तर भगिनी करतातच. पण तीं व्यक्तिरूपानं. माझी इच्छा आहे कीं कांहीं तरी सामाजिक सेवेसाठीं भगिनींनीं संघरूपानं जबाबदार व्हावं. असं करण्यानं संघशक्ति उत्पन्न होईल. ही शक्ति उत्पन्न झाली म्हणजे व्यक्ती येतील व जातील पण संघ टिकून राहील. ही शक्ति ईश्वरानं फक्त मनुष्यालाच दिली आहे. स्त्रियांनीं या देशांत ही शक्ति कमावलेली नाहीं. यांत दोष पुरुषांचा आहे. पण

* इंग्रजी म्हणीचें शब्दशः भाषान्तरच न करितां आपल्या जीवनाला साजेल असें तिचें रूपान्तर करण्याचें येथें सूचन आहे.

असो. आज आपल्याला या भानगडींत पडावयाचं नाहीं. ही शक्ति स्त्रियांमध्यें आलीच पाहिजे असं आपण मानीत असू तर ती कमाविण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. मग याचा आरंभ आतां माझं या संघाला पत्र मिळण्यापुरता नी त्याचं उत्तर देण्यापुरताच कां असेना? हळू हळू (खूप मंदगतीनें असेना का?) त्यांत भर टाकतां येईल. माझं म्हणणं तुला बरोबर समजलं असेल, तुझ्या गळीं तें उतरलं असेल, इतर भगिनींनाहि तें बरोबर वाटत असेल, त्यांत गोडी लावून घ्यायला त्या तयार असतील तर ही गोष्ट हातीं घ्यावी. पण त्यांत अडचणी आढळून आल्या किंवा त्यांत कांहीं रहस्य न आढळलं तर ही गोष्ट सोडून द्यावी.

एका धर्मांतून दुसऱ्या धर्मांत लोकांना घेण्याची प्रथा मला तर मुळींच आवडत नाहीं. दोन वेगवेगळ्या धर्मांच्या स्त्रीपुरुषांमध्यें विवाह होणं असंभवित किंवा अयोग्यच असं मी मानीत नाहीं.

हिंदुधर्माचं मूलभूत तथापि भिन्न तत्त्व गोरक्षण आणि वर्णाश्रम असं मला वाटतं.

कोणत्याहि राष्ट्राला उन्नतीच्या मार्गानं जायचं असेल तर सत्य आणि अहिंसेचा त्यानं आश्रय घेतला पाहिजे.

विद्यापीठकडून प्रसिद्ध झालेला गुजराती जोडणी कोश [ शुद्ध लेखनकोश ] याच्या दुसऱ्या आवृत्तीची माझी प्रत तेथें असलीच पाहिजे. ती मला पाठव.

ता. ८।४।३२ बापूचे आशीर्वाद.
यरवडा मंदिर

—*—

## पत्र....२९

चि.–

तूं खरोखर लिहिण्याच्या स्थितींत नव्हतीस. पत्र नेहमींइतकंच जवळ जवळ आहे; पण त्याला घाटडौल नाहीं. जेव्हां खाण्याची आवश्यकता नसेल तेव्हां खाऊं नये, फिरण्याची नसेल तेव्हां फिरूं नये, तशीच लिहिण्याची आवश्यकता नसेल तेव्हां लिहूं नये किंवा 'थकलें आहे म्हणून लिहीत नाहीं' एवढंच लिहून पुरं करावं.

दिवसाच्या अंतीं आनंद असण्याऐवजीं मनांत चीड असते हें चांगलं लक्षण नव्हे. ही अनासक्ति तर नव्हेच. माझी सल्ला आहे, माझा आग्रह आहे कीं, तूं तुझं जंजाळ तुझा व्याप कमी कर. त्यामुळं तुझं किंवा आश्रमाचं कांहीं नुकसान व्हायचं नाहीं. प्रफुल्लित अंतःकरणानं झालेलं काम वाढीस लागतं.

लेजीममधून उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांवर तूं जें लिहिलं आहेस तें विचार न करतां लिहिलं गेलं आहे अशी आशा आहे, '* आर्ट फॉर आर्ट्‌स् सेक' मनुष्याला कुठं घेऊन जाते हें तुला माहीत नाहीं. तिच्या नांवावर आज पश्चिमेकडे तरुण माणसं थेट नरकांत उतरलीं आहेत. 'आर्ट'ची व्याख्याच कदाचित् लिहिण्याच्या वेळेला तुझ्या लक्षांत नसेल, पण 'माझ्या पत्रांत सारं बेडौल लिहिलं जाईल' असं तूं मला अगोदरच सावध केलं आहेस, तेव्हां मी जास्त कांहीं लिहीत नाहीं.

तुला स्वतःला तूं हिस्टीरिकल दिसणार नाहींस असा संभव आहे. *** देखील तें पाहूं शकली नसेल. शिवाय हिस्टीरिकलचा अर्थदेखील तुम्हा कोणाच्या ध्यानांत आला नसेल. त्या शब्दाचा अर्थ काढण्यासाठीं तूं कधीं शब्दकोशही उघडला नसशील. आपले एम्. ए. वगैरेंना इंग्रजी येतंच असं नाहीं. त्यांतल्या त्यांत अशा खास शब्दांचा अर्थ फार थोड्यांना ठाऊक असतो. हिस्टीरिकलचा तूं एक उत्तम नमुना आहेस. तो दोषच आहे असं समजावयाचं नाहीं; पण हिस्टीरिया शेवटीं काढून टाकायची आवश्यकता

---

* कलेसाठीं कला.

असते. पण या विषयाच्या विवेचनांत तुला खेंचण्याची इच्छा नाहीं. तूं हिस्टीरिकल नाहींस असं खुशाल मानून घे. तूं खरेपणानंच वागूं इच्छितेस यामुळं मी निश्चिंत आहे. न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ।

" आश्रमांत ज्या वस्तूंच्या मागं आम्ही लागतों ती सोडीत नाहीं ही आश्रमाची विशेषता आहे " अशा प्रकारचं तुझं वाक्य होतं. त्याला मी प्रमाणपत्र म्हणेन. त्याला आम्ही आज लायक नसूं कदाचित्; पण शेवटीं लायक होऊं असा आग्रह तरी ठेवूं या. जें आपल्याला करतां आलं नाहीं त्याचा मला शोक नाहीं. मला त्याचं भान आहे म्हणून मी जागृत आहें. जें अपेक्षिलं होतं तें शिकायला वेळ नाहीं. ही तर स्पष्टपणें माझी उणीव आहे. माझी व्यवस्थाशक्ति कमी, शिक्षक-शक्ति कमी, आणि समयप्रमाणाचंहि ज्ञान कमी. असं असूनहि जर संयोगवशात् मी [ आश्रमा ] बाहेर फार वेळ राहिलों नसतों तर पुष्कळसा कार्यक्रम वाटेल तें करून पार पाडला असता. माझा तसा अनुभव आहे. पण होऊन गेलेल्या गोष्टीचा विचार एवढ्यासाठींच करायचा कीं अजून कांहीं सुधारतां येण्याजोगं असेल तर सुधारूं या. जें मला करतां आलं नाहीं तें तुम्ही सगळे विचार करून ठरवून होऊं शकेल तें करा. काय काय करायचं होतं, काय काय राहिलं आहे, त्यांतलं काय शक्य आहे हें सवड काढून तपासा. होईल तें करा. होणारच नाहीं असं वाटेल तर अपरिहार्याला विसरून जा. त्याची चिंता करीत बसण्याचं कारण नाहीं.

शून्यवत् होणं म्हणजे ' मी करीत आहे ' ही वृत्ति सोडणं. यांत निराशावादाला स्थानच नाहीं.

महादेवानं आणि मी सप्ताहांत दुप्पट काम केलं म्हणतां येईल. सरदारांना अजून या वेळेला कांतण्याचा ध्यास लागलेला नाहीं. उपवास आम्ही तिघांनींहि केला.

ता. १८।४।३२ बापूचे आशीर्वाद.
यरवडा मंदिर

—*—

## पत्र...३०

चि.—

मला वाटतें कीं ***ला ओढून फिरायला घेऊन जाऊं नये. तिच्यांत उत्साह नसेल तर ती फिरूं शकणार नाहीं. तिला प्राणायाम शिकविला आणि थोड्या 'पॅसिव एक्सरसाईझिस्' दिल्या तर तूर्त पुरे होईल. 'पॅ. ए.' तुला माहीत आहे.

धर्मांतरासंबंधीं माझं म्हणणं असं नाहीं कीं कधीं बदल होऊंच नये. मात्र एकमेकांना आपला धर्म बदलण्याला प्रवृत्त करूं नये. माझा धर्म तेवढा खरा आणि दुसरा खोटा अशी जी समजूत अशा आमंत्रणाच्या मागें आहे ती मी दूषित मानतों. पण जेथें बलात्कारानं किंवा गैरसमजानं एखाद्यानं आपला धर्म सोडला असेल तेथें तशा मनुष्याला खरं आचरण्याला अर्थात् आपल्या मूळच्या धर्मांत येण्याला हरकत नसावी. इतकंच नव्हे तर तशा माणसांना उत्तेजन देणं योग्य आहे. याला 'धर्मपरिवर्तन' नाहीं म्हणतां येणार. मला माझा धर्म खोटा वाटत असेल तर मी त्याचा त्याग केला पाहिजे. दुसऱ्या धर्मांत जें चांगलं वाटेल तें मीं माझ्या धर्मांत घेऊं शकतों—घेतलं पाहिजे. माझा धर्म अपूर्ण वाटला तर तो पूर्ण करणं हें माझं कर्तव्य आहे. त्यांत दोष दिसला तर तो दूर करणं हेंहि कर्तव्य आहे.

मीराबाईला मी ख्रिस्ती समजतों. आतां तर तीसुद्धां स्वतःला ख्रिस्ती मानते. ख्रिस्ती असूनसुद्धां गीता भावपूर्वक ती वाचते यांत मला विरोध वाटत नाहीं. आपली प्रार्थना अन्यधर्मांचीं माणसंसुद्धां भक्तिपूर्वक गातात.

स्वराज्य मिळाल्यावर मी काय करीन हें खरंच मला माहीत नाहीं. त्यावेळीं मला ईश्वर मार्ग दाखवील. जसा तो आज दाखवीत आहे. श्रद्धाशील माणसं आगाऊ तयारी करून ठेवीत नाहींत. आगाऊ तयारी करते ती श्रद्धा नव्हे किंवा असली तर ती ढिली श्रद्धा आहे.

ज्ञान, उपासना आणि कर्म असे ईश्वरप्राप्तीचे तीन वेगळे मार्ग नाहींत. तर हे तीन्ही मिळून एक मार्ग आहे. त्याचे तीन भाग सोयीसाठीं

करून दाखविले आहेत. पाणी हाइड्रोजन ऑक्सिजन्‌चें बनलें आहे, पण पाणी म्हणजे हाइड्रोजन नव्हे कीं ऑक्सिजन नव्हे. तसं ज्ञान हें प्राप्तिमार्ग नव्हे किंवा भक्तिहि नव्हे. प्राप्तिमार्ग तीन्हींचा मिळून रासायनिक प्रयोग आहे असं साधारणतः म्हणतां येईल. या उपमेंत दोष आहे तरी मला जें सांगायचं आहे तें समजण्यापुरती ती बस आहे.

द्रौपदीची लाज राखली हा पाण्याची दारू बनविण्यासारखा * चमत्कार नाहीं. संकटसमयीं ईश्वर आपल्या भक्ताला मदत करतो हा विश्वास उपयोगी आहे. अशीं उदाहरणं संग्राह्य आहेत. पण अशा मदतीच्या अटीवर कोणी भक्ति करील तर ती निरर्थक आहे.

बळजोरीनं लोकांचीं शरीरं मजबूत करण्याची पद्धति मला नाहीं आवडत. त्यासाठीं बळजोरीची जरूर असूंच नये. शरीर दुबळं असूं देणं कोणाला आवडतं असं ऐकिवांत नाहीं. हा शिक्षणाचा विषय आहे.

गरजा कमी करणं हा आदर्श लोकांपुढं ठेवतां येण्यासारखा आहे. मग त्याचा परिणाम काय व्हायचा असेल तो होवो. यांत तडजोड कुठं येते? तडजोड करण्या न करण्याचा प्रश्नच नाहीं. जे गरीब लोक भुकेनं मरत आहेत त्यांच्या गरजा वाढवाव्याच लागतील. पण ही कांहीं नवीन गोष्ट नाहीं, आज ते प्रयत्न चालू आहेतच.

ता. २२।४।३२ बापूचे आशीर्वाद.
यरवडा मंदिर

—*—

* येशूनें असा चमत्कार केल्याचा उल्लेख बायबलमध्यें आहे.

# पत्र...३१

चि.—

जर तुझ्यावर कामाचं ओझं जास्त पडत असेल तर तें कमी होत नाहीं हें म्हणणं मला पटत नाहीं. या विचारांत मोह आणि दुर्बलता आहे. तुला चीड वाटण्याचं कारण तूं स्वतःच असावीस. कामाचं ओझं त्याचं कारण नाहीं हें मी समजूं शकतों.तसंच असेल तर हळू हळू तूं घडत जाशील, कारण फार काळ तूं स्वतःला फसविणार नाहींस. या बाबतींत मी तुला त्रास देऊं इच्छित नाहीं. तुझ्या नाजूक प्रकृतीला मजबूत बनीव.

आपल्या पुस्तकांत कित्येक उर्दू पुस्तकं आहेत, त्यांपैकीं कित्येक इमामसाहेबांच्या घरीं असण्याचा संभव आहे. तेथेंही तपास कर. तुला जर त्यांचीं नांवं वाचतां न आलीं तर परशुराम वाचवून दाखवितील. त्या पुस्तकांत सीरत्—उन्—नबी असल्यास तें पाठीव. मौ. शिबलीनीं लिहिलं आहे. दुसरं एक डॉ. महंमद अल्लीनीं लिहिलेलं नबीचं [ पैगंबरांचं ] जीवनचरित्र आहे तेंही पाठव. सीरत्चे दोन भाग आहेत.

तेथें चहूं बाजूला मजूर आहेत, हेंच खरं जीवन आहे. आश्रमाची कल्पना ती आहे. होय, हें खरं कीं मजूर सत्यार्थी असले पाहिजेत. तूं नाहींस ? इतर बंधुभगिनी नाहींत ?—सारे यथाशक्ति आहेत असं मी मानतों. ‘ तुम्ही केव्हां येणार ? ’ असं तूं विचारतेस. तूं डोळे वापरशील तर मी तुला तेथेंच दिसल्याशिवाय राहाणार नाहीं. माझा आत्मा तर तेथेंच वास करीत आहे. मग शरीर इथं असो कीं राखेंत मिळो. शरीर तिथं असेल तेव्हां मी तिथं नसेन हें अगदीं संभवनीय आहे. हें सत्य तूं पहा व मायेला विसरून जा.

असंतोष पाहिजेच. पण तो असंतोष स्वतःसंबंधीं. “ आतां काय, आतां मी पूर्ण झालों ” असं समजून मी बसेन त्या दिवसापासून माझी पडती सुरू झाली समजावी. म्हणून मला माझ्या स्वतःविषयीं असंतोष वाटलाच पाहिजे. या असंतोषाचा अर्थ मी माझ्या कर्तव्यकर्मांत बदल करण्याचीच नेहमीं इच्छा करावी असा कदापि नव्हे.

पण हें सर्व युक्तिवादानं समजावून देतां यायचं नाहीं. काळ आपलं काम करीलच. आज जेथें घोर अंधार वाटतो तेथें उद्यां उजेड वाटेल. मला तर या स्थितीचं यथार्थ वर्णन करणारं असं भजन 'प्रेमळ ज्योति' वाटतं. गुजरातींतही अर्थ चांगला उतरला आहे. * इंग्रजी तर अलौकिकच आहे...

...तुझं वजन किती आहे? दूधदहीं मिळून किती घेतेस?

ता. १।५।३२ **बापूचे आशीर्वाद.**
यरवडा मंदिर

—*—

## पत्र....३२

चि.—

आध्यात्मिक आढावा घेण्याची संवय लागली म्हणजे खोटा संकोच दूर होतो आणि आपण जसे असूं तसे जगतापुढं दिसायला लागतों. उघडच आहे कीं ही गोष्ट सत्यशील माणसांनाच लागू पडते. दांभिक माणसांना आपला आढावा फार काळ घेतांच येणार नाहीं—तें अशक्य आहे.

* * * विषयीं तूं लिहितेस तें सर्व खरं आहे. त्यानं शक्तिबाहेर काम घेऊंच नये. कोणीहि घेऊं नये. पण सामान्यतः मनुष्य स्वतःला फसवितो, स्वतःच्या बाबतींत खूप उदार बनतो आणि एवढंसं केलं तरी अमर्याद झालं असं समजूं लागतो. तेव्हां सामान्यपणें एखाद्यानं पुष्कळ काम केलं तर त्याला रोकण्याची मला इच्छा होत नाहीं.......

आढावा घेण्यासंबंधीं मी लिहिलं आहे त्यायोगें कोणी जडवत् बनणार नाहीं. एक माणूस जरी आश्रमांत राहून जडवत् बनला तरी कार्यपद्धतींत दोष आहे असं मी म्हणेन. कार्यपद्धति पूर्ण नाहीं हें मला माहीत आहे. पण आश्रमांत राहाणारं कोणी जड बनलेलं नाहीं आणि जड असे कितिएकजण चेतनामय बनले आहेत; त्यावरून मी अनुमान करतों कीं कार्यपद्धति कांहीं नाहीं तरी निदान एकावन्न टक्के कार्यसाधक असली पाहिजे. आश्रमांत वेगवेगळ्या प्रवृत्तींचे संचालक विशारद बनलेले नाहींत. यांत कोणाचा दोष नाहीं. पण एक तर आश्रमानं नवी प्रवृत्ति

---

* Lead Kindly Light.

हातीं धरली आहे किंवा जुनी प्रवृत्ति नव्या धोरणानं चालविण्याचा संकल्प ठेवला आहे. त्यामुळं विशारद माणसं आपोआप घडलीं जाणार आहेत; आणि त्यामुळं वेळेचा, द्रव्याचा कांहींसा अयोग्य वाटणारा व्यापहि झाला आहे; आणि असं असूनसुद्धां पुष्कळ वेळां आश्रम शोभूं शकलेला नाहीं. पण आश्रम शोभण्यासाठीं नाहीं, सेवेसाठीं आहे. सेवा करीत असतां शोभा आली तर बरंच वाटेल; पण निंदा झाली तरी सेवा केलीच पाहिजे. तात्पर्य काय कीं जसजसे आपण कुशल होत जाऊं तसतसं आपल्या कार्याचं माप वाढेल आणि तरीसुद्धां आपल्याला त्याचा बोजा कमी वाटेल. याचा ताजा दाखला हाः—डाव्या हातानं चक्र फिरवितांना पहिल्या दिवशीं माझे तार[१] फक्त १३ च निघाले, वेळ जास्त गेला, श्रम जास्त वाटले. कुशलतेचं प्रमाण वाढलं, त्याबरोबर थोड्या वेळांत थोड्या श्रमानं दोनशेच्यावर तार काढूं लागलों. आतां मगनरेंटिया[२] घेतला. काल २४ तार काढले आणि वेळ पुष्कळ दिला. आज थोड्या वेळांत ५६ तार काढले. श्रम कमी. जें एक माणसाच्या आणि त्याच्या लहानशा प्रवृत्तीच्या बाबतींत खरं तेंच संस्थेच्या आणि तिच्या महान् प्रवृत्तीच्या बाबतींत खरं. योगः कर्मसु कौशलम्. कर्म म्हणजे सेवाकार्य, यज्ञ. आपल्या साऱ्या अडचणी आपल्या अकुशलतेंत आहेत. कुशलता आली कीं आपल्याला जें आज कष्टदायी वाटतं तेंच आनंददायी वाटूं लागेल. सुव्यवस्थित सात्त्विक असं तंत्र असेल तर कधीं ताण भासतां कामा नये.

ही गोष्ट साधण्यासाठीं तूं आश्रमांत आली आहेस. ती तुला कोणी शिकविणार नाहीं. सर्वांनीं आपणहून ती वातावरणांतून काढून घ्यायची आहे. तुझ्यासारखी जी कोणी काढून घेऊं शकणार नाहीं ती आश्रमांत शेवटपर्यंत टिकणार नाहीं. ज्याला महत्त्वाकांक्षा नाहीं तें मनुष्य टिकेल हें निराळं. आश्रम हा खरोखर स्वतंत्र संस्था असल्यामुळं ज्याची इच्छा आहे त्याला जितकं उंच जायचं असेल तितकं उंच जायला त्यांत अवकाश आहे. तें त्याला कोणी देऊं शकणार नाहीं. तुला अनुकूल असं वातावरण तूंच उत्पन्न केलं पाहिजे. तुझ्या मैत्रिणींना तुला तेथें ओढतां येईल; पण खरं म्हटलं तर तो आपलपोटेपणाच म्हणायचा. तुझ्या बाबतींत तर

१. तार = ४ फूट. २. मगनरेंटिया = दोन चातींचा चरखा.

तिथं जे कोणी असतील तेच तुझे सखे नी सख्या आहेत. तुझ्यांत जें कांहीं असेल तें त्यांच्यांत ओत, त्यांच्यांत असेल तें तूं घे. एकदोघांखेरीज दुसऱ्या कोणाकडूनही तुला घेण्यासारखं कांहीं नाहीं असं तूं मानीत असशील तर तूं मोहकूपांत पडलेली आहेस. मला असं वाटतं कीं ज्याच्याकडून आपल्याला कांहीं घेतां येणार नाहीं असं जगांत कोणी नाहीं.

रामकृष्णांच्याविषयीं तूं लिहिलंस तें खरं असण्याचा संभव आहे. मी स्वतःला कोणत्याही प्रकारें सिद्ध मानीत नाहीं. तेव्हां चुका होतच असतील. पण माझ्या चुका निर्दोष असल्यामुळं अजूनपर्यंत हानिकर झालेल्या दिसत नाहींत. म्हणून मी निश्चितपणें मार्ग कापीत आहें. आणि सोबत्यांनाही त्यांत खेंचीत आहे.

ता. ७।५।३२ **बापूचे आशीर्वाद.**
यरवडा मंदिर

**ताजा कलमः**—प्रार्थनेवर पुष्कळ वेळां हल्ले झाले आहेत. पण सोळा वर्षं ती टिकली आहे. प्रार्थनेंत रोज किती वेळ जातो, त्यांतून किती वाचवितां येईल ? तूं जर प्रार्थनेची आवश्यकता स्वीकारशील तर तिच्यासाठीं खर्च होणाऱ्या वेळाची तूं तक्रार करणार नाहींस. प्रत्येक वस्तूंत दोष पहात येतील, पण सर्व बाजूंनीं विचार करितां ही बरोबर आहे असं वाटतं. प्रार्थनेंत तुला काय काय फेरफार हवेत ते माझ्या माहितीसाठीं कळव. पॅसिव व्यायाम दुर्बळांना मदतगार होतो. उदा. मालीश किंवा अर्ध शीर्षासन, अर्धसर्वांगासन, केवळ हात किंवा पाय हळू हळू वर करणं. यांत आजारी मनुष्य पडून राहातो आणि मानसिक सहकार करीत असतो.

——*——

# पत्र....३३

चि.—

तुझं वजन आणि आहार यांसंबंधीं मीं विचारलं; कारण मला तुझ्या प्रकृतीविषयीं शंका आली. जास्तींत जास्त वजन किती होतं? भाजींत टोमॅटो किंवा पालभाजी मुळींच असत नाहीं? सॅलड लावणार होतां त्याचं काय झालं? सॅलड किंवा मेथी एखाद्या लहानशा वाफ्यांत तुला स्वतःला लावतां येईल. ती थोड्याच दिवसांत उगवून येते. कांहींना कांहीं हिरवी पानं [ खाण्यांत ] असलीं पाहिजेत. कच्चीं असल्यामुळें बेताचींच खाल्लीं जातील. तेव्हां पेरणं सोपं जाईल. टोमॅटो बाराही महिने कां होत नाहींत हें मला माहीत नाहीं. तूं शोधून काढ.

* * * ना लगेच भेटलों व अजूनही त्यांची बातमी काढीतच असतों; कारण कूचमध्यें त्यांच्याशीं चांगली ओळख झाली होती. शिवाय तुझ्यासाठींही त्यांच्या जीवनांत मला गोडी वाटते. कारण तुझ्या जीवनांत वाटते. हें व्यक्तिगत प्रेमविशेषाचं उदाहरण नाहीं, तर अहिंसेचं आहे. अमक्याविषयींच प्रेम व दुसऱ्याविषयीं द्वेष, किंवा दुसऱ्याविषयीं प्रेम वाटतच नसेल तर तो प्रेमविशेष आहे. माझ्यांत तसा प्रेमविशेष नाहीं असं मला वाटतं. तुझ्यासंबंधीं जें करतों तें तुझ्या गरजा लक्षांत घेऊन, तुला माझी अपेक्षा आहे म्हणून आणि मला गरज आहे म्हणून. कारण मी तुझ्याकडून पुष्कळ अपेक्षा ठेवली आहे. यांत तुला व्यवहारबुद्धि दिसली तर मी ती नाकारीत नाहीं. मी याला अहिंसक स्वभाव मानतों.

उर्दू पुस्तकांविषयीं विसरली नसशील.

सगळे एकदमच आश्रमांतून ( तुरुंगांत ) जायला तयार झाले असले तर मला तें बरोबर वाटत नाहीं. पण आतां आश्रमाला इतकीं वर्षं झालीं आहेत कीं मी त्यासंबंधीं चर्चा करूं नये, दुःखहि करूं नये, कुठं तरी कांहीं तरी चुकतं आहे असं समजून प्रसंग येईल तेव्हां सुधारण्याचा प्रयत्न करावा. ज्यांना सहज थांबवितां येईल त्यांना मी थांबवीन. आश्रम एकदम रिकामा होत असेल तर आणि तूं आनंदानं थांबूं शकत असशील तर

थांब आणि काम करणारे परत येतील तेव्हां तूं बाहेर पड. पण खरं म्हणजे तूं आणि * * * ठरवाल तें इथं बसून मला काय कळणार ?

ता. १२।५।३२

आश्रमांत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा प्रश्न जुना आहे. बोर्डिंगा-बरोबर त्याची तुलना करतां येणार नाहीं असं मी समजतों........ मी स्वतः एक नियम घालून देईन. खुद्द मुलांच्या गळीं प्रत्येक गोष्ट उतरली पाहिजे. तीं जितकं सक्तीनं करतील तितकं निरर्थक होईल आणि जुलमाची परंपरा कायम राहील. सुट्टी दिली नाहीं तर तें मुलांना आवडलं पाहिजे.

आश्रमाच्या शाळेंत तूं जें जें केलंस त्याच्या योग्यायोग्यतेविषयीं मला न्यायाधीश बनावयाचें नाहीं. मी तेथें असतों तर अवश्य चिकित्सा केली असती. पण येथें बसल्या बसल्या मला तसें करावयाचें नाहीं. तूं आत्म-निरीक्षण करणारी आहेस. जेथें दोष असेल तेथें शेवटीं तूं सुधारून घेशीलच.

तुला ब्रह्मज्ञान शिकविण्याची मी इच्छा धरली कीं काय तें परमेश्वर जाणे. पण ‘ ब्रह्मज्ञान मी जाणतें ’ असं म्हणून तूं मात्र आपलं अज्ञान उघडं केलं आहेस, आणि जे युक्तिवाद लढविले आहेस त्यांनीं तुझं अज्ञान सिद्ध केलं आहे. बुद्धीच्या योगानं जो ब्रह्म जाणतो तो ब्रह्माला जाणीतच नाहीं. ब्रह्मज्ञान हृदयांत होत असतं. ब्रह्मज्ञान म्हणजे प्रवृत्ति-मात्राचा त्याग असं मुळींच नाहीं. बाहेरून ज्ञानी अज्ञानी सारखेच असतील, पण दोघांच्या प्रवृत्तींचे हेतु उत्तर–दक्षिण इतके विरुद्ध असतील. रामनाम हें कांहीं ब्रह्मज्ञानाला विरोधी नाहीं; दोन्ही एक असूं शकतील. ज्या ब्रह्मज्ञान्याला रामनामाची शिवाशीव वाटते तो अज्ञानकूपांत पडलेला आहे व गोते खात आहे. रामनाम जो केवळ ओठांनीं बडबडतो तो ओठांना सुकवितो आणि वेळेचा खून करतो. ब्रह्मज्ञान आणि माझं शारीरिक अस्तित्व आवडणं या विरोधीच गोष्टी असल्या पाहिजेत असं कांहीं नाहीं. पण जर माझी गैर-हजेरी कर्तव्यपरायणतेला कमी करील तर तें ब्रह्मज्ञान नव्हे, मोह आहे. मला ब्रह्मज्ञान झालं आहे असं सांगणाऱ्याला तें नसण्याचा पुरा संभव आहे. तें मूकज्ञान आहे–स्वयंप्रकाश आहे. सूर्याला आपला प्रकाश तोंडानं सांगावा लागत नाहीं. तो आहे हें आपल्याला दिसतंच. तसंच ब्रह्मज्ञानासंबंधीं.

मी या सरकारला मानीत होतों त्यावेळीं मला असं वाटे कीं, सरकारामुळं या देशाचा शेवटीं लाभच होणार आहे-त्याचा हेतु शुभ आहे; पण या प्रश्नांत जास्त खोल शिरतां येणार नाहीं.

अमेरिकेंत स्त्रीपुरुषव्यवहारासंबंधीं जें साहित्य छापलं जात आहे तें मला पसंत नाहीं. त्याविषयीं मला लिहिण्याची इच्छा आहे खरी.

मुलं प्रश्न करतात तेव्हां त्यांना सरळ उत्तर दिलं पाहिजे. सिनेमासंबंधीं मला माहीत नाहीं. नाटकाला स्थान आहे. ईश्वरप्राप्तीकरितां मला आपली अनासक्तिच बरी वाटते. त्यांत सर्व कांहीं येतं.

ता. १७।५।३२. बापूचे आशीर्वाद.

---

## पत्र....३४

चि.—

येत्या आठवड्यांत तूं मला भेटायला येण्याचा संभव आहे; तरी तुझ्या पत्राचं उत्तर द्यावं हेंच बरं. पुनः काल जें घडलं त्यावरून दिसतं कीं माझी भेट होणं नेहमीं अनिश्चितच समजलं पाहिजे....

...आश्रमांत वाढलेल्या मुली इतक्या दुबळ्या दिसतात हें एक कोडं आहे. मी तें उकलूं शकलेलों नाहीं. माझ्याजवळ त्यासंबंधीं अनुमानं आहेत; पण जोंवर मला त्यासंबंधीं आधार देतां येणार नाहीं तोंवर त्यांची चर्चा निरर्थक आहे. आपल्याकडून होईल तेवढा शोध करावा. या मुली बाहेर जाऊनही चांगल्याच होतात असा नियम नाहीं हें लक्षांत ठेवण्या-सारखं आहे....

...माझ्या वचनांत मला कोठेंहि व्यामिश्रता दिसली नाहीं. असली तर ती नकळत आणि भाषेवर माझा काबू कमी असल्यामुळं. माझीं वचनं तोटकीं असल्यामुळं त्यांत अध्याहार असतातच, पण ते भूमितींत असतात तसे.

ज्या मुलींना इंग्रजी शिकण्याची इच्छा आहे त्यांनीं हिंदी आणि संस्कृत यांकडे लक्ष दिलं असेल आणि गुजराती बरोबर केलं असेल तर इंग्रजी अवश्य शिकावं. शिकविण्याच्या सोयीवरहि अवलंबून आहेच; पण तशी सोय आपल्याजवळ असली पाहिजे.

'पॅसिव व्यायामा'चा माझा अर्थ कदाचित् तुला समजला नसेल. स्वतः करायचा त्याला 'पॅसिव' नाहीं म्हणायचं. हा आजारी माणसांसाठीं आहे. मी आजारी असलों आणि माझ्या आंतड्यांना व्यायाम द्यायचा असेल तर त्यांना कोणी मालीश केलं तर, किंवा माझे पाय मधल्या भागाला [धडाला] काटकोनांत राहातील इतके कोणी उंच केले आणि परत सरळ केले आणि असेच एकसारखे हलविले, मला कांहीं करावं लागलं नाहीं तर त्याला 'पॅसिव व्यायाम' म्हणायचं. तुझी अशी समजूत झाल्यासारखी दिसत नाहीं.

मौन प्रार्थनेंत दोन हेतु होते. मनाला आराम द्यायचा तर होताच पण त्यावांचून मनाला अंतर्मुख करणंसुद्धां कठीण होतं.

[हातीं घेतलेल्या] प्रत्येक कार्यांत बदल करण्याच्या वेळीं धोका आहे असं वाटलं पाहिजे; उतावीळपणा, अशांति नसावी. यांतूनच तटस्थता येईल.

माझ्यांत एकाग्रता असेलच पण मला समाधान देण्याइतकी खास नाहीं. त्यासंबंधीं मी प्रयत्नशील आहे, अधीर नाहीं.

मुलांना सगळ्या प्रार्थनेंत गोडी वाटत नसेल तर त्यांच्यासाठीं कांहीं तरी वेगळी व्यवस्था करावी. जसं प्रभुदासनं केलं होतं. मुलं श्रद्धापूर्वक आणि शांति ठेवून बसूं शकतील तर बरं.

सोळा वर्षें हीच प्रार्थना चालली आहे ही गोष्ट नव्हे वस्तुस्थिति आहे. तितकीं वर्षें सगळे येत असत असं सांगण्याचा उद्देश नाहीं. आश्रम सगळ्या अडचणी आणि टीकामधून याच प्रार्थनेला चिकटून राहिला आहे आणि त्यांतूनच पुष्कळांनीं शांतीचं चिंतन केलं आहे. तिचा त्याग किंवा तिच्यांत फेरफार पुष्कळ सबळ कारण असल्या-शिवाय करूं नये; इतकंच सांगण्याचा हेतु होता. भगिनींची (निराळी) प्रार्थना संध्याकाळीं शोभणार नाहीं. संध्याकाळचा समय वाचन इत्यादींकडे देतां येईल.

तुझ्याविषयीं तूं लिहितेस तें बरोबर आहे. तुझ्या बुद्धीला आणि हृदयाला खरं वाटेल तेंच तूं करावंस. मला उतावळ नाहीं. मी आपला

मला योग्य वाटतं तें सांगून मोकळा होतों. जबरदस्तीनं ती गोष्ट तुला मी पटवणार नाहीं. मी मित्र म्हणूनच उपयोगीं पडूं शकेन. त्यांतही माझा ज्यास्तींत जास्त अधिकार म्हणजे माझ्या दीर्घ अनुभवाचाच असणार. जर त्यांतल्या एकाचंहि प्रतिबिंब तुझ्या हृदयांत पडलं नाहीं तर माझे हजारों अनुभव तुझ्या बाबतींत निरर्थक आहेत. आश्रमाविषयीं माझा एक दावा आहे. येईल त्याला तो पंख देतो, मग त्याला उडायचं असेल तिकडे त्यानं उडावं. स्वेच्छापूर्वक राहिला तरी ठीक, न राहिला तरी आश्रमानं आपला एक धर्म पाळला. असं पुष्कळांच्या बाबतींत झालेलं सिद्ध करून देतां येईल. स्त्रियांच्या बाबतींत जास्ती. अशा मुली आश्रमांत येऊन गेल्या आहेत कीं ज्यांच्यांत कांहींसुद्धां उत्साह नव्हता त्या आज स्वतःला स्वतंत्र समजतात आणि आहेतहि.

व्यक्तिप्रेम तेवढं तिरस्करणीय असं नाहीं, तें विश्वप्रेमाला, प्रभुप्रेमाला विरोधी नसलं पाहिजे. बाविषयीं मला आज प्रेम आहे पण तें प्रभुप्रेमाच्या पोटांत आहे, मी विषयी होतों तेव्हां तें प्रभुप्रेमाला विरोधी होतं म्हणून त्याज्य......

ता. १९।५।३२ **बापूचे आशीर्वाद.**

---

## पत्र....३५

चि.—

तुला मूर्खच म्हटलं पाहिजे. प्रश्न विचारण्यांत मुलांना गोडी वाटत नसतांना त्यांनीं लिहिलं तर तो वेळेचा दुर्व्यय. लिहिण्याखातर कां होईना गोडीनं लिहिलं तर त्यांत अर्थ आहे. मुलांनीं आईबापांच्या पत्राची अपेक्षा ठेवली नाहीं तरी पत्र आलं कीं त्यांना आनंद व्हायचाच. त्यांत स्वार्थाचा लवलेश नसतो......

प्रार्थनेंत साकार मूर्तीचा मीं निषेध केला नाहीं. निराकाराला चढतं स्थान दिलं आहे. कदाचित् असा भेद करणं बरोबर नसेल. कोणाला कांहीं कोणाला कांहीं रुचेल. त्यांत तुलनेला स्थान नसावं. माझ्या दृष्टीनं निराकार विशेष बरं वाटतं. शंकर, रामानुज यांच्यासंबंधींचं [तूं पाठविलेलं]

पृथक्करण मला बरोबर नाहीं वाटलं. परिस्थितीपेक्षां अनुभवाची छाप अधिक असते. सत्याच्या पुजाऱ्यावर परिस्थितीची छाप होतां कामा नये. तिला भेदून तिच्यांतून पार जाणं त्याचं कर्तव्य आहे. परिस्थितीच्या आधारानं बनलेलीं मतं पुष्कळ वेळां चुकीचीं ठरतात असं आपण पाहातों. याचं प्रसिद्ध उदाहरण आत्मा आणि देह यांचं आहे. आत्म्याचा आज देहाशीं निकट संबंध आहे म्हणून देहाहून वेगळा आत्मा चट्दिशीं दिसून येत नाहीं. या परिस्थितीला भेदून ज्यानं 'नेति' (हें नव्हे) हें पहिलं वचन उच्चारलं त्याच्या शक्तीची अजून कोणी बरोबरी करूं शकलेला नाहीं. अशीं अनेक उदाहरणं तुला सहज दिसून येतील. तुकाराम इ. संतांच्या वचनांचा शब्दार्थ करणं मुळींच योग्य नाहीं. त्यांचं एक वचन नुकतंच माझ्या वाचनांत आलं आहे तें तुझ्यासाठीं इथं उतरतों.

केला मातीचा पशुपति, परि मातीसी काय महती ?  
शिवपूजा शिवासि पावे, माती मातीमाजीं सामावे  
केला पाषाणाचा विष्णु, परि पाषाण नव्हे विष्णु  
विष्णुपूजा विष्णुसि अर्पे, पाषाण राहे पाषाणरूपें इ.

यांतून मी हें सार काढतों कीं अशा साधुसंतांच्या भाषेपाठीमागें जी कल्पना असते ती आपण पाहिली पाहिजे. ते साकार भगवंताचं चित्र काढतात पण भजतात मात्र निराकाराला. आपण प्राकृत माणसं हें करूं शकत नाहीं; म्हणून त्यांचं रहस्य समजून न वागलों तर मरणच ओढवलें!

उर्दू वाचतां येणारे कोणी जर इमामसाहेबांच्या घरीं गेले तर पुस्तक ताबडतोब सांपडेल. तेथें मीराबेनचा उर्दू–इंग्रजी शब्दकोश आहे आणि इंग्रजी–उर्दू. ते दोन्ही बरोबरच पाठीव.

...इमामसाहेबांचं घर कधीं कधीं स्वच्छ केलं जातं का? वस्ती नसलेलीं घरं आठवड्या–पंधरवड्याला स्वच्छ झालीं पाहिजेत.

अंगवळणीं पडलं नाहीं तोंपर्यंतच वेळेचा हिशोब लिहून काढणं कठीण वाटणार, पुढं त्यासाठीं मुळींच वेळ जातां कामा नये. सर्व कांहीं ज्ञानपूर्वक [समजून उमजून] झालं तरच तें शोभतं आणि सफल होतं.

दक्षिण आफ्रिकेंतील मुलांचं उदाहरण देतों तें येथील मुलांची निंदा करण्यासाठीं नाहीं. पण प्रोत्साहन देण्यासाठीं, येथील मुलंदेखील काम करण्याजोगीं आहेत. अर्थात् कामं करवून घेणारं कोणी असेल तर. तूं आहेस ना?

कमरेसाठीं तुला ऊन पाण्यांत बसलं पाहिजे. ऊन पाण्यांत पंधरा ते तीस मिनिटं बसावं आणि त्यावेळीं हातानें कमर चोळावी. तसं केल्यानं दुखावा दूर होतो आणि मासिक धर्मावर देखील त्याचा चांगला परिणाम होतो. डॉक्टरचं काय म्हणणं आहे तें लिही. अशा व्याधींचा मुळांतच इलाज झाला पाहिजे.

तुझा कार्यक्रम मीं नीट पाहिला. तो जास्ती आहे. त्यांत छाटाछाट सहज होण्यासारखी आहे. १२–३० ते ५–४० पर्यंत उद्योगवर्ग आहे. म्हणजे पांच तास दहा मिनिटें झालीं. यांतून एक तास कमी केल्यानं आवश्यक फुरसद काढून घेतां येईल. या वेळांत एकांतपणें निजावंसं वाटल्यास निजावं किंवा केवळ आडवं व्हावं. आराम वाटेल असं हवं तें करावं. पण गप्पागोष्टींत किंवा दुसऱ्या भिन्न कामाला तो वेळ देऊं नये. त्या तासाचा त्याच वेळीं उपयोग करावयाचा नसल्यास इतर कामं पुढं ढकलण्याजोगीं असतील तीं ढकलून रात्रीचा वेळ घ्यावा.

जो आपल्या कामांत तन्मय झाला त्याला ओझें किंवा झीज कांहीं वाटत नाहीं. ज्याला कामांत गोडी नाहीं त्याला कमीसुद्धां जास्त वाटतं. जसा कैद्याला एक दिवस वर्षासारखा वाटतो, भोगी मनुष्याला एक वर्ष एक दिवसासारखं वाटतं, तसं.

युरोपचं संगीत पूर्वी ऐकत होतों तेव्हां कंटाळा येत असे. आतांच त्यांत कांहीं समजूं लागलं आहे. आणि गोडीही वाटूं लागली आहे.

"येथें [आश्रमांत] वाचनाचा लोभ ठेवतां येणार नाहीं" हें तुझं, लिहिणं बरोबर नाहीं. फार वाचायला मिळणार नाहीं हें खरं, तें गौण आहे हेंही खरं. तरीसुद्धां आश्रमांत राहाणाऱ्या पुष्कळांनीं वाचन केलं आहे. तुझे निराशेचे शब्द मला नाहीं आवडत. जिथं अपूर्णता वाटेल तिथं पूर्णता आणण्याचा प्रयत्न कर. पण अंतीं अपूर्णताच वाटेल तर–

म्हणजे सर्व जमाखर्च करून शिल्लक काढतांना दोष वाढत असलेले दिसून येतील तर–त्याचा त्याग करणं इष्ट आहे. त्यांत स्वतःला आणि समाजाला न्याय होईल.

तूं लांब पत्रं लिहितेस म्हणून माफी मागण्याची आवश्यकता नाहीं. मला तीं कंटाळवाणीं वाटत नाहींत–कारण तीं पत्रें तुझ्या त्या त्या वेळच्या हृदयाचा आरसा असतात. त्यांतून मी शिकतों.

ता. १७।६।३२ **बापूचे आशीर्वाद.**
बारडोली

—*—

## पत्र....३६

चि.—

तुझं पत्र मला मुळींच मोटं वाटलं नाहीं. कारण मला पाहिजे असलेलं वर्णन तूं दिलं आहेस. सिंहगडावर मी तीन वेळां गेलों आहे. एक वेळां तर लोकमान्य होते त्यावेळीं गेलों होतों. त्यावेळीं आम्ही खूप भेटलोंहि होतों. त्यांचं घर पाहिलं......हरी नारायण आपटे यांना मी भेटलों होतों. त्यांच्या कादंबऱ्या वाचण्याची इच्छा पुष्कळच आहे. पण या क्षणाला नवें कांहीं हातीं घ्यायची हिम्मत होत नाहीं. उर्दू, अर्थशास्त्र, आकाशदर्शन, चरखा व पत्रव्यवहार याच वस्तू कशाबशा पुऱ्या होतात. मधून मधून पुनः कांहीं ना कांहीं किरकोळ वाचायचं असतंच.

सुपरिंटेंडंटसंबंधीं तूं लिहिलस तें बरोबर आहे. मी सगळं पाहूं समजूं शकलों होतों. पण हें सारं सहन केलं पाहिजे. मनुष्य या दृष्टीनं तो वाईट नाहींच. पण अधिकार मोठी वाईट गोष्ट आहे. आणि तोही अधिकार कोणत्या ठिकाणीं? तेव्हां आपण हिशोब असा केला पाहिजे, कीं दुःस्थितींत-सुद्धां थोडीफार माणुसकी राखली जात आहे हें किती चांगलं? कुणाला माहीत आपण त्याच्याजागीं असतों तर किती खालीं उतरलों असतों? तुला आले तसे अनुभव पुष्कळ येत राहतील. सहनशक्ति, उदारता, चिकाटी, विवेक अशांतूनच शिकायचा. सगळं अनुकूल असेल तेव्हां सर्वजण आपल्याला चांगलं म्हणवून घेण्याजोगे वागतातच.

स्त्रीपुरुषांसंबंधीं लिहिण्याची इच्छा होती. पण तूं प्रश्न पाठविलेस तर जास्त बरं.

इंग्रजी अभ्यास बंद करूं नये. नवीन विद्यार्थ्यांना अमुक शिकण्या-पूर्वी तें शिकवायचं नाहीं इतकंच......

तुझं शरीर तांब्यासारखं ( मजबूत ) झालं पाहिजे. मासे खाण्याचा प्रतिबंध मानीत नसलीस तर आणि त्यामुळं शरीर चांगलं राहील असं वाटत असेल तर तुला बाहेर जाऊन खाऊन येतां येईल. इमामसाहेब असंच करीत असत. या विषयाची विशेष चर्चा करायची असली तर कर.

ता. २०।६।३२ **बापूचे आशीर्वाद.**
यरवडा मंदिर

—※—

## पत्र....३७

चि.—

उर्दू पुस्तकांत नदवीच्या नांवाचे दोन भाग आहेत. कांहीं भाग शिबलीच्या ऐवजीं नदवीनं त्याच्यानंतर लिहिले आहेत. कदाचित् पुस्तकावर मौ. सुलेमान नदवी असं लिहिलं असेल.

मच्छीबाबत मी कांहीं तुझ्यासाठीं अपवाद केलेला नाहीं. कॉडलिव्हर ऑईल निषिद्ध आहे तरी तें मी आश्रमांत चालूं दिलें आहे. मांसमच्छीची मांसमच्छीरूपानं आश्रमपरत्वें मर्यादा ठेवली आहे; पण व्यक्तिपरत्वें ठेव-लेली नाहीं—ठेवतां येणार नाहीं, मीं कधीं ठेवली नाहीं. म्हणूनच इमामसाहेब बाहेर जाऊन खाऊं शकत. तुझ्या जागीं समज नारायणदासच असला, त्यानं तर आयुष्यांत मांसहि खाल्लेलं नाहीं. पण त्याला भयंकर आजार झाला, आणि त्याला मांस खाऊन जगण्याची इच्छा झाली तर मी त्याला मांस खायला मुळींच अटकाव करणार नाहीं. माझे विचार त्याला ठाऊक आहेत, धर्महि ठाऊक आहे तरी मरणवेळ ही निराळी वस्तु आहे. त्यावेळीं इच्छा झाली तर त्यांत बाधा न आणण्याचा माझा धर्म

आहे. याच्या उलट एखादं मूल असेल आणि त्याच्या बाबतींत मला ठरवायचं असेल तर मी त्याला मरूं देईन पण मारूं देणार नाहीं. हा प्रसंग 'बा'वर आला होता, हें तुला माहीत आहे? बहुतकरून हा प्रसंग 'आत्मकथें'त आला आहे. तुला माहीत नसेल आणि तिथं कोणी जाणत नसेल तर कळीव म्हणजे मी लिहून पाठवीन. तो आम्हां दोघांना–'बा'ला आणि मला–पुण्यप्रसंग होता. आतां समजलं? मला तुला मच्छी खाण्याचा आग्रह करावयाचा नाहीं. त्यावांचून मरण आलं असतां मरायला तूं तयार असशील तर मी तुला मरूं द्यायला तयार आहे. मच्छी खाऊन कदाचित् जगलीस तरी तेंहि शेवटीं मरण्यासाठींच कीं नाहीं? पण अर्थात् जो मानतो आणि पाळतो त्याचा धर्म आहे. हा धर्म दुधाच्या बाबतींत मी माझ्यावरच कुठं लागू करतों आहे? आणि तरीहि प्राणिमात्राच्या दुधाचा त्याग करणं हा धर्म दिव्यासारखा मला दिसतो आहे. पण असले धर्म दुसऱ्यांना पाळायला लावायचे नसतात, स्वतः पाळायचे असतात. इति.

* * *

स्त्रीपुरुषांच्याविषयीं तूं बरोबर विचारलंस. ज्या ज्या बाबतींत मुलांना कुतूहल वाटेल त्या बाबी आपल्याला माहीत असतील तर त्यांना सांगाव्या, माहीत नसतील तर अज्ञान कबूल करावं, सांगण्यासारख्या नसल्या तर त्यांना थांबवावं आणि इतरांनाहि विचारूं नये म्हणून सांगावं, पण त्यांना कधीं उडवून लावूं नये. आपल्याला वाटतं त्यापेक्षां मुलांना अशा गोष्टी ज्यास्त माहिती असतात आणि माहीत नसतील अशा गोष्टींविषयीं आपण त्यांना ज्ञान दिलं नाहीं तर अयोग्य मार्गानं तें मिळवायला तीं शिकतात. असं असलं तरी देण्याजोगं नसेल तें हा धोका पत्करूनसुद्धां देऊं नये. न देण्याजोगं थोडंच असतं. बीभत्स क्रियेचं ज्ञान त्यांनीं मागितलं तर तें देऊंच नये. मग आपल्या प्रतिबंधाला न जुमानतां तीं खुशाल आड-मार्गानं तें ज्ञान मिळवूं देत.

पक्ष्यांमध्यें होणारी क्रिया मुलांनीं पाहिली आणि त्याविषयीं जाण-ण्याची त्यांना इच्छा झाली तर ती इच्छा मी अवश्य तृप्त करीन आणि त्यामधून ब्रह्मचर्याचा पाठ शिकवीन–पक्षी, पशु आणि मनुष्य यांच्यामधलं

अंतर शिकवीन. जे स्त्री–पुरुष तसंच आचरण करतात ते मनुष्याकार मिळविला असूनसुद्धां त्यामध्यें पशु–पक्ष्याप्रमाणें वागतात. यांत निंदा करीत नाहीं, वस्तुस्थिति सांगतो. पशुपणामधून निघण्यासाठीं मनुष्याचा आकार आणि बुद्धि मिळालीं आहेत.

मासिक धर्माचं संपूर्ण ज्ञान त्या वयाला पोंचलेल्या मुलींना द्यावं. लहान मुलींना तें समजलं आणि त्यांनीं विचारलं तर त्या समजूं शकतील इतकं त्यांना समजावून द्यावं.

मुलं किंवा मुली आपण वाटेल तितका प्रयत्न केला तरी कधीं शेवट पर्यंत मुळींच अबोध राहूं शकणार नाहींत, हें जाणून त्या सर्वांना अमूक वेळीं हें ज्ञान देणं हेंच चांगलं. हें ज्ञान मिळाल्यामुळं ब्रह्मचर्य पालन करतां येत नाहीं अशी ज्याची स्थिति असेल त्याचं तें निर्बळ ब्रह्मचर्य आपल्या कामाचं नाहीं. हें ज्ञान मिळतांच ब्रह्मचर्य अधिक सबळ झालं पाहिजे. माझ्या स्वतःच्या बाबतींत असंच घडलं आहे.

ज्ञान देण्याघेण्यांत पुष्कळ प्रकार आहेत. आपले विकार वाढ-विण्यासाटीं एकजण ज्ञान घेतो, दुसऱ्याला तें अनायासें मिळतं, तिसरा विकाराचं शमन करण्यासाठीं–इतरांना मदत करण्यासाठीं–तें ज्ञान मिळवितो.

हें ज्ञान देण्याची योग्यता असेल तरच आणि त्यानंच तें द्यावं. तुला तें साधलं पाहिजे. आत्मविश्वास असला पाहिजे कीं तूं ज्ञान दिल्यानं मुलींमध्यें मुळींच विकार उत्पन्न होणार नाहींत, विकार शमविण्यासाठीं तें ज्ञान देत आहेस याचं तुला भान असलं पाहिजे. जर तुझ्या बाबतींत विकार उत्पन्न होण्याची शक्यता असली तर तें ज्ञान द्यायच्या वेळीं तुझ्यांत विकार उद्भवूं नयेत इकडे तूं लक्ष दिलं पाहिजेस.

स्त्री–पुरुषांच्या पत्नी व पति या नात्याच्या सांसारिक जीवनाच्या मुळाशीं भोग आहे. त्यांतून हिंदुधर्मानें त्याग उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला आहे, किंवा सगळ्याच धर्मांनीं तसा प्रयत्न केला आहे असं म्हणतां येईल. पति हा ब्रह्मा, विष्णु, महेश्वर आहे तर पत्नीहि तशीच आहे. पत्नी दासी नाहीं, समान हक्क असणारी मित्र आहे, सहचारिणी आहे. दोघे एकमेकांचे गुरू आहेत.

मुलीचा वांटा मुलाच्या इतकाच असला पाहिजे. कोणीही जी संपत्ति मिळवील तिच्यांत पतिपत्नी दोघे सारखे हक्कदार आहेत. पति हा पत्नीच्या मदतीनेंच कमावितो. मग पत्नी फक्त स्वयंपाक कां करीत असेना ! ती दासी नव्हे–भागीदारीण आहे.

पत्नीच्या बाबतींत पति जर अन्यायानं वागत असेल तर त्याच्यापासून वेगळं होण्याचा तिला अधिकार आहे.

मुलांच्यावर दोघांचा सारखा हक्क आहे. तीं मोठीं झालीं म्हणजे मग कोणाचाच नाहीं. पत्नी नालायक असेल तर तिचा हक्क उडून जाईल, तीच गोष्ट पतीच्या बाबतींत.

थोडक्यांत म्हणजे स्त्री–पुरुषांमध्यें जे भेद निसर्गानं ठेवले आहेत आणि जे उघड्या डोळ्यांनीं दिसण्याजोगे आहेत त्यांशिवायचे कसलेहि भेद मला मान्य नाहींत......

* * * त अनासक्तीनं कार्य करण्याची मोठी शक्ति आहे. अनासक्त मनुष्य आसक्तापेक्षां नेहमीं पुष्कळ काम करतो आणि रिकामा असल्यासारखा वाटतो. सगळ्यांत शेवटीं तो थकतो. खरं म्हटलं तर त्याला श्रम वाटतांच कामाचे नाहींत. पण हा झाला आदर्श. तूं तेथें आहेसच, तुला जर अशांति दिसली, स्वतःला फसवितो आहे असं दिसलं तर तुझा धर्म माझ्यापेक्षां वेगळा झाला. तूं * * * ला सावध केलंच पाहिजेस. मी सुद्धां तिथं असेन आणि प्रत्यक्ष तो सांगतो त्याहून वेगळंच बघेन तर त्याला सावध करीन. तूं सावध करीत असतांनासुद्धां तो तुला विरोध करील तर त्याचं म्हणणं ऐकावं; जोंवर तूं त्याला सत्यवादी समजत आहेस तोंवर. पुष्कळ वेळां आपले डोळेसुद्धां आपल्याला फसवितात. तूं खिन्न असतेस असं मला दिसलं पण तूं तें नाकारलंस तर मला तुझं ऐकलंच पाहिजे. माझ्यापासून तूं तें लपवून ठेवते आहेस असा माझा समज झाला किंवा संशय आला तर मात्र वेगळं. मग मला तुला विचारायचं कारण नाहीं. तें ओळखण्याला इतर साधनं शोधणं हें माझं काम आहे. पण आश्रम-जीवन असं चालायचंच नाहीं. त्याच्या मुळाशीं तर सत्य आहे. तेथें शुभ हेतूनं देखील फसविणं योग्य नाहीं..

§ ४थ्या जुलैची जरूर वाट पहा. कोणत्या वर्षाची ४ थी जुलै हें विचारांत घेण्यासारखं आहे खरं. वर्ष वाटेल तें असो: महिना आणि तारखेचा निश्चय झाला हें काय थोडं आहे? कारण दुसऱ्या कोणत्याही महिन्याची किंवा दुसऱ्या तारखेची निदान वाट पहायला नको. ४ थी जुलै उलटून गेली म्हणजे १९३३ च्या जुलैपर्यंत शांत रहावं.

ता. २३।६।३२ बापूचे आशीर्वाद.

—❋—

## पत्र....३८

चि.—

तूं तीन वर्षांची झालीस असं मी म्हणतों. तूं म्हणतेस तें खरं. जेव्हां तुला मी मुंबईहून बरोबर घेतली तेव्हां तूं टिकूं शकशील कीं नाहीं याविषयीं शंका होती. पण तूं समजतेस इतकी मुळींच नव्हती. कारण तुझ्या वचनावर तूं उभी राहिलीस. आणि जें मनुष्य आपल्या वचनाला जागतं त्याच्याविषयीं मला शंका रहात नाहीं....पण तूं राहिलीस इतके दिवस राहाशीलच अशी मला खात्री नव्हती, अशी त्या वेळची माझी (मनः-) स्थिति मला आठवते. माझी अवश्य अशी इच्छा आहे कीं जशीं तूं तीन वर्षे काढलींस तसं सारं आयुष्य काढ आणि तें अनिश्चित-पणें राहून, जाईल तसं जाईल असं नव्हे, तर निश्चय करून; तूं आश्रमाची आणि आश्रम तुझा असं दृढतापूर्वक मानून, समजून. पण माझा कांहीं आग्रह नाहीं. यासंबंधीं मला फक्त इच्छाच प्रदर्शित करतां येईल. तुला जोंवर सहज आश्रम तुझाच असं वाटणार नाहीं तोंवर तुला निश्चय करतां येणार नाहीं. मी आपली माझी इच्छा तुला सांगितली.

हें झालं तुझ्या आश्रम-जन्मदिवसासंबंधीं. तुझा * दुसरा जन्मदिवस १३ जुलईला येतो. आणि हें पत्र तुला ८ तारखेच्या आसपास मिळेलच. माझा आशीर्वाद आहेच. तुझ्या सर्वोच्च अभिलाषा सफळ होवोत! त्या

§ महात्माजी ४ जुलैला सुटतील असें भविष्य कोणीसें केलें होतें.

* हिंदी पंचांगाप्रमाणें.

दिशेनं तुझे प्रयत्न चालूं आहेतच, म्हणून मला शंका नाहीं. तितकं आयुष्य आणि तितकं आरोग्यहि बरोबर असलं पाहिजे. तेंहि राहील असं मी समजतों. पण तीन्हींचा [अभिलाषांची यशस्विता, आयुष्य व आरोग्य] आधार शेवटीं तुझ्यावर किंवा माझ्यावर नाहीं. सर्व कांहीं त्याच्यावर सोपविलं आहे. त्याला आवडेल तसं तो करील. आणि तो जें करील तें शुभच असणार. १३ तारखेचा तुझा हिशेब पाठीव. त्या दिवशीं कोणता निश्चय करणार तें लिही. जन्मतिथीच्या दिवशीं कांहीं ना कांहीं नवा निश्चय करावा असं मी सर्वांना सुचवीत असतों हें तुला माहीत आहे ना? ज्योतिषांच्या सांगण्यावर विश्वास ठेवूं नकोस. त्याचा विचारसुद्धां सोडून दे. त्यांचं सांगणं खरं असलं तरी तें समजल्यानं कांहीं फायदा नाहीं. हानि स्पष्ट आहे.

उर्दू पुस्तकांत पैगंबराचीं जितकीं चरित्रं सांपडतील तीं सारीं, अरबए सहाबाचे दोन भाग आणि खुलहा ए राशद्दीन. इंग्रजी-उर्दू आणि उर्दू-इंग्रजी शब्दकोश लवकर पाठवून दे.......

सारीं घरं नियमित रीतीनं अमुक दिवशीं स्वच्छ झालींच पाहिजेत. सामान हालविलं पाहिजे. त्याच्यासाठीं वेळ काढल्यावांचून गत्यंतर नाहीं.

ज्याच्या संगतींत—मग ती व्यक्ति असो—समाज असो किंवा संस्था असो—अपूर्णता वाटेल त्या ठिकाणीं पूर्णता आणण्याचा प्रयत्न करणं हा आपला धर्म आहे. गुणांपेक्षां दोष जर वाढत असतील तर त्यांचा त्याग—असहयोग—हा धर्म आहे, हा शाश्वत सिद्धांत आहे. तोच मी लिहिला होता. त्या वाक्यानं मी तुला आश्रम किंवा दुसरं कांहीं सोडायला सांगितलं नाहीं. मीं आपलं तुला अमुक स्थितींत मनुष्यमात्राचा जो धर्म मानला आहे तो सांगितला.

बंगालमध्यें कलकत्ता एथें रोज दिवसाढवळ्या शेंकडों बकऱ्यांचा किंवा शेळ्यांचा काली मातेला बळी दिला जातो. तो थांबविण्याची योग्यता यावी म्हणून मी ईश्वराजवळ याचना करीत असतों. हें तुला माहीत नव्हतं?

मनुष्य [पुरुष भक्त] स्वतःला गोपीची उपमा देतो हें मला माहित आहे. तें केवळ भक्तिभावानं होत असेल तर त्यांत मला कांहीं वाईट वाटत नाहीं. ईश्वरापुढं सगळे अबलाच आहेत.

स्वराज्यांत माणसं हिमालयाच्या शिखराचा व उत्तर-ध्रुवाचा शोध करायला अवश्य निघतील.

सामान्य भौतिकशास्त्रांचं ज्ञान मी लाभदायी समजतों.

माझ्या आहाराच्या प्रयोगांनीं मला तोटा कांहींच झाला नाहीं. तें आठ वर्षंहि चालले आहेत आणि सात दिवसहि चालले आहेत.

मॉनोडाएटमध्यें ( एका वेळीं एकच वस्तु खाणें ) लाभ आहेच.

ता. ३०।६।३२. **बापूचे आशीर्वाद.**

—※—

## पत्र....३९

चि.—

तुझं पत्र मिळालं. तूं पाकीट सजविण्याचा प्रयत्न केलास आणि तें बिघडून टाकलंस. निरुपयोगी शोभेच्या बाबतींत असंच समजावं. सरदार पाकिटावर जी सजावट करतात ती कांहीं सजावटीसाठीं म्हणून असत नाहीं; तर उपयोगामधून सजावट निर्माण होते म्हणून ती शोभते. लिहिलेल्या पाकिटाचा पुनः उपयोग करायचा असेल तर लिहिलेलं नाहींसं केलं पाहिजे. त्याकरितां लिहिलेल्या ठिकाणीं प्रमाणशीर कागदाच्या पट्ट्या दांतऱ्या नसलेल्या त्यांनीं चिकटविल्या त्या त्यांना बऱ्या वाटल्या; पण तेवढ्यानं त्यांना संतोष झाला नाहीं. तेव्हां आतां तिकडून येण्याचीं कव्हरं उलटवितात, त्यायोगें लहान लहान पट्ट्या चिकटवाव्या लागत नाहींत आणि कव्हर नव्यासारखं दिसतं. तें बारकाईनें पहा म्हणजे समजेल. तुझ्या दांतऱ्या असलेल्या पट्ट्या अर्ध्या निसटल्या होत्या त्यामुळें फारच वाईट दिसत होत्या. त्यांचा उपयोग तर कांहींच नव्हता. त्यांत घातलेली मेहनत व्यर्थ गेली आणि वेळ अन् तितका कागद बिघडला. तितकं प्रजेचं नुकसान. तात्पर्य काय कीं समजल्याशिवाय कुणाचं अनुकरण करूं नये. शृंगारासाठीं केलेला शृंगार शृंगार नव्हे. युरोपमध्यें मोठमोठीं देवळं आहेत, त्यांच्याविषयीं सांगतात कीं त्यांच्या सर्व शृंगाराच्या मागें उपयोग असतोच असतो. हें खरं असेल नसेल. मी सांगितलं त्या नियमाविषयीं शंका घ्यायला जागा नाहीं.

या वेळच्या तुझ्या पत्रांत सुपरिंटेंडंटविषयींच्या टीकेव्यतिरिक्त दुसरं कांहीं फारच थोडं आहे. मला तर वाटतं कीं टीका निरर्थक आहे. तेव्हां तिच्या योग्यपणाविषयीं विचार करण्याचं कारण उरत नाहीं. Judge not, lest ye be judged. हें वाक्य हृदयावर कोरण्याजोगं आहे. याला अन्वर्थक असं गुजराती वचन आठवत नाहीं. मराठींत असलं तर पाठीव.

उर्दू पुस्तकांची यादी हवी आहे. शिब्लीचं पुस्तक पाठवून देच, आणि खलीफाचा जीवनवृत्तांही. ... ...

...तूं मरण पसंत करशील पण मच्छी खाणार नाहींस हें मला आवडतं. याचा असाहि अर्थ आहेच ना कीं कॉडलिवर ऑईलहि तूं घेणार नाहींस ? माझी इच्छा काय याचा विचार नाहीं करायचा. तुझी मानसिक स्थिति समजून घेण्यासाठीं मीं हा प्रश्न विचारला आहे. ... ...

तुझ्या आहारांत दूध/दहीं अथवा/आणि तूप हीं वाढवलीं पाहिजेत. कच्च्या भाजीच्याऐवजीं केव्हां केव्हां पिकलेलें फळ असलंच पाहिजे. ( आज–काल तेथें ) पपई पिकत नाहींत का ? का चांगल्या मिळत नाहींत ? कसल्याच प्रकारची पालेभाजी ( आश्रमांत ) होत नाहीं ? तूं स्वतःच थोडे टमाटे कां पेरत नाहींस ? लेटीसदेखील फार झपाट्यानं उगवतात. कच्ची पपई फार खाऊं नये आणि नेहमींही खाऊं नये. खर्चाचा विचार न करतां इतका फेरफार अवश्य कर.

विद्यावतीची मूढता प्रेमानं जाईल. * * * ची केस जरा कठीण आहे. पण त्याचा उपाय एकच आहे. त्याचेवर तीन शक्ति काम करीत आहेत. तेव्हां जर त्या तिन्ही एकाच दिशेनं वहात नसल्या तर कठीण काम आहे. तीन शक्ति म्हणजे त्याचे वडील, आई आणि तूं अथवा ज्याची त्याच्यावर देखरेख असेल ते. या स्थितींतून देखील मुक्त होणं आणि रस्ता काढणं हें प्रेमाचंच काम आहे. यांतूनही बाहेर पडून मार्ग काढायचा हें प्रेमाचंच काम आहे. तें तुझ्यांत जितकं विशाल होईल तितकी तुझी शक्ति अशा मुलांना सुधारण्यांत मदतगार होईल.

आश्रमांतल्या मोठ्या मुलींच्या बाबतींत उदारता अंगीं आण. त्या खोटेपणानं घरीं बसून राहात नाहींत, अपंग आहेत म्हणून राहातात. त्यांच्या अपंगपणाचं माप तुला किंवा मला काढतां येणार नाहीं. हें माप मुलींनींच काढावं. तें खोटंहि असेल. त्यांच्या मनानं तें खोटं नसलं म्हणजे झालं ✻ ✻ च्यावर दोन मुलांचा बोजा. आतां तिच्यापासून कितीशा कामाची आशा बाळगतां येईल? मुलांचं संगोपन कसं करावं याची कल्पनाही नाहीं आणि इतक्यांत आई होऊन बसली आहे! ह्या सर्वांचा न्याय आपण धारवाडी कांट्यानं नये करूं; आणि तुला अनुभवानं दिसेल कीं जशी उदारता वाढत जाईल तशी लोकांच्याकडून कामं करून घेण्याची शक्ति वाढत जाईल–खरं खोटं देव जाणे, पण असं म्हणतात कीं माणसांकडून मला पुष्कळ काम करून घेतां येतात. हें खरं असेल तर त्याचं कारण हें आहे कीं त्यांच्याविषयीं मला चोरीची शंकाच येत नाहीं. जो जें देईल त्यानं मला संतोष होतो; पण मी आणखी मागितलं तर तो आणखी देतो. कित्येक असंहि म्हणणारे आहेत कीं मला जितकं लोक फसवितात तितकं इतरांना क्वचितच फसवीत असतील. ही परीक्षा खरी ठरली तरी मला पश्चात्ताप व्हायचा नाहीं. मी माझ्या आयुष्यांत कुणाला फसविलं नाहीं इतकं प्रमाणपत्र मिळालं तरी मला पुरे; आणि तें कुणी मला दिलं नाहीं तरी मी स्वतःला तें देतोंच.

मला असत्य हें सर्वांहून अधिक वाईट भासतं. 'जास्तींत जास्त लोकांचं जास्तींत जास्त कल्याण' आणि 'बळी तो कान पिळी' हे नियम मला मान्य नाहींत. 'सर्वांचं कल्याण–सर्वोदय' आणि 'दुबळे पहिले' हा मनुष्यासाठीं नियम आहे. आपण दोन पायांचीं माणसं म्हणवितों, पण चार पायांच्या पशूचा स्वभाव अजून आपण सोडूं शकलों नाहीं. तो सोडण्यांत धर्म आहे.

ता. ६।७।३२ **बापूचे आशीर्वाद.**

यरवडा मंदिर

—✻—

## पत्र....४०

चि.—

तुझं पत्र मिळालं. आतां मला किती पत्रं लिहितां येतील हें सांगतां येणार नाहीं. पत्रांवर तरवार लटकत आहे. पत्रं येथून निघतांना जो उशीर होत आहे तो कायमच राहिला तर लिहिण्यांत मला कांहीं अर्थ वाटत नाहीं. येणारीं पत्रं मला आतां नियमित देण्यांत येतात. जाणाऱ्या पत्रांविषयीं अजून पत्रव्यवहार चालू आहे. पत्रं नच आलीं तर समजावं कीं माझं गाडं अटकलं आहे. पण त्यामुळं घाबरण्याचं किंवा उदास होण्याचं कारण नाहीं. लिहूं देणं न देणं सरकारच्या हातीं. कैद्याला हक्क म्हणून पत्रं लिहिण्याची मागणी करतां येणार नाहीं. इतके दिवस लिहितां आलीं म्हणून कांहीं हक्क उत्पन्न होत नाहीं. आणि ज्या वस्तूच्या बाबतींत आपल्याला कांहीं हक्क नाहीं ती हातांतून गेली तर दुःख मानण्याचं कांहींच कारण नाहीं.

तुझ्या वाढदिवसासंबंधीं आशीर्वाद लिहिलेलं माझं पत्र तर आतां तुला मिळालंच. उशीरां मिळालं म्हणून काय झालं? कदाचित् त्यामुळें त्याची किंमत वाढली. मिळालं नसतं तर त्याचा अपशकुन मानण्याचं कारण नव्हतं. मला तुझं पत्र मिळाल्यानंतर मी आशीर्वाद पाठविणार नाहीं असं व्हायचंच नाहीं. अस्मानी सुलतानीच्या योगानं मिळाला नाहीं किंवा उशीरा मिळाला तर त्यांत अपशकुन कसला? आणि खरं पहातां अनासक्ताला अपशकुन वगैरे कांहीं नाहींच. म्हणून आपलं नवं वर्ष वाईट जाणार असं मुळींच मानूं नकोस. आपण कांहीं वाईट चिंतिलं, बोललों किंवा केलं तरच वर्ष वाईट जाईल; आणि ही तर आपल्या हातांतली गोष्ट आहे.

गळ्यांतील गांठी ( टॉन्सिल्स ) कापल्या पाहिजेत असा डॉक्टरांचा सल्ला असेल तर त्या कापून घ्याव्या......त्याला कांहीं वेळ लागत नाहीं. त्यांत कांहीं धोका असतो असंहि मी ऐकलेलं नाहीं. तुझं शरीर अगदीं रोगरहित झालं पाहिजे. मला वाटतं कीं शेवटीं स्वतःच्या शरीराची माहिती जास्तींत जास्त स्वतःलाच लागते. यावरूनच दिसतं कीं रोग्यानं जर आपलं शरीर ओळखलं नाहीं तर त्याला डॉक्टरला योग्य तीं उत्तरें देतां येणार

नाहींत. 'डोकं दुखतं' एवढं बोलल्यानं डॉक्टर काय सांगणार? डोकं कशानं दुखतं तें रोग्याच्या ध्यानांत आलं पाहिजे. हीच तऱ्हा पुष्कळ बाबतींत आहे असं आपल्याला समजून येण्याजोगं आहे. तीच गोष्ट उपचाराच्या बाबतींत. अमुक उपचाराचा काय परिणाम झाला हें डॉक्टरला आपोआप समजत नाहीं, त्यांना रोग्यावरच अवलंबून राहावं लागतं. पण सगळ्या रोग्यांना उपचाराचा परिणाम काय झाला हें ओळखतां येत नाहीं. आहार हा शरीराचा रोजचा उपचार आहे. त्याचा परिणाम खाणाऱ्यालाच कळणार. म्हणून ज्याला हवा, पाणी आणि अन्न यांचा परिणाम कळला त्याला आपल्या शरीरावर जितका ताबा ठेवतां येईल तितका डॉक्टर लोक कधींहि ठेवूं शकणार नाहींत. म्हणून मला वाटतं कीं आपण सर्वांनीं शरीराविषयीं सामान्य ज्ञान प्राप्त करून घेतलं पाहिजे. तसंच हवा, पाणी व आहारासंबंधीं. हें ज्ञान मिळविण्यापुरतं साहित्य आपल्या इथं आहेच. तें सगळं वाचण्याची जरूर नाहीं, त्यांतलं थोडं समजून घेतलं कीं काम भागेल. *** नं स्वतःच्या प्रयत्नानं आपलं शरीर उत्तम बनवलं आहे. माझ्या बाबतींत मी मानतों कीं माझ्या कामापुरतं ज्ञान जर मीं मिळविलं नसतं तर केव्हांच खलास झालों असतों. माझं फाटकंतुटकं शरीरसुद्धां माझ्या काळजीपूर्वक वागण्यानंच टिकून राहिलं आहे. त्यांत डॉक्टरांचा फार थोडा हात आहे याविषयीं मला खात्री आहे.

ता. २४।७।३२ बापूचे आशीर्वाद.

—*—

## पत्र....४१

चि.—

तुझं नशीबच फुटकं म्हणायचं का? मी तर तुझ्या वाढदिवशीं आशीर्वाद उलट टपालीं पाठविला होता, पण माझं पत्रच अधांतरीं लोंबकळत राहिलं. कदाचित् काल रवाना झालं असलं तर सांगतां येत नाहीं. पण पत्रांत लिहिलेल्या आशीर्वादानं काय होणार? हृदयाचा आशीर्वाद असला म्हणजे पुरे आणि तो तर होताच. हृदय कशा प्रकारें काम करतं तें आपल्याला समजतहि नाहीं. आणि खरं तेंच, बाकी सारं मिथ्या......

नव्या भगिनी आल्या आहेत. त्यांपैकीं ज्यांना लिहितां येतं त्यांना मला पत्र लिहिण्यास सांग. * * ला बरोबर ओळखून घे. तिची कहाणी दुःखदायक आहे.

प्रेसिडेन्ट विल्सनच्या जीवनाशीं माझा परिचय नाहीं. ऐकलं आहे, त्याप्रमाणें तर तो भला माणूस होता आणि त्याचे हेतु चांगले होते.

गेल्या युद्धानं फायदा झालासं वाटत नाहीं. भीतीचं बळ ढिलं झालं आहे. द्वेष वाढला आहे. लढण्याची वृत्ति कमी झालेली नाहीं, लोभ वाढला आहे.

एखाद्या मनुष्याला किंवा वस्तूला उद्देशून प्रार्थना होऊं शकते. त्याचा परिणाम होऊं शकतो. पण असा उद्देश न ठेवतां केलेली प्रार्थना आत्म्याला आणि जगताला अधिक कल्याणकारी असण्याचा संभव आहे. प्रार्थनेचा संस्कार स्वतांवर होतो. अर्थात् त्यामुळं अंतरात्मा अधिक जागृत होतो; आणि जशी जागृति वाढत जाईल तसा तिच्या संस्काराचा विस्तार वाढत जातो. तो हृदयाचा विषय आहे. तोंडानं म्हणणं वगैरे क्रिया हृदयाला जागृत करण्यासाठीं आहेत. व्यापक शक्ति जी बाहेर आहे तीच आंत आहे, आणि तितकीच व्यापक आहे. तिला शरीराचा अंतराय नाहीं. अंतराय आपण उत्पन्न करतों. प्रार्थनेच्या योगानं तो अंतराय दूर होतो. प्रार्थनेनं इच्छित फळ प्राप्त झालं कीं नाहीं तें आपल्याला समजत नाहीं. मी * * * च्या मुक्तीकरितां

प्रार्थना केली आणि ती दुःखमुक्त झाली त्यामुळं तें माझ्या प्रार्थनेचंच फळ आहे असं मीं मानून घेऊं नये. ती प्रार्थना निष्फळ होत नाहीं पण कोणतं फळ देते तें आपल्याला समजत नाहीं. शिवाय आपण अपेक्षिलेलंच फळ पदरांत पडलं तर तें चांगलंच असंहि मानणं योग्य नाहीं. या ठिकाणींहि गीताबोधाचा अंमल करावयाचा आहे. प्रार्थना अनासक्त असली पाहिजे. कोणा एखाद्याविषयीं प्रार्थना केली तरी अनासक्त राहातां येईल. एखाद्याची मुक्ति आपल्याला इष्ट वाटली तर त्यासंबंधीं प्रार्थना करावी. पण मुक्ति मिळो, न मिळो त्याविषयीं निश्चित राहावं. विरुद्ध परिणाम झाला म्हणजे प्रार्थना निष्फळच झाली असं समजायचं कारण नाहीं. याहून अधिक खुलासा पाहिजे ?

उर्दू पुस्तकांची यादी मीं मागितली ती लक्षांत ठेव. आतां हें पत्र तुला केव्हां मिळणार आणि तुझं उत्तर केव्हां येणार हें कांहीं निश्चित नाहीं. अनिश्चिततेंत निश्चितता ठेवायला शिकणं आणि निश्चितता पाहाणं हेंच आपलं काम आहे.

ता. १७।७।३२ बापूचे आशीर्वाद.

यरवडा मंदिर

—※—

## पत्र...४२

चि.—

तुझं पत्र मिळालं. तुझ्या मूर्खपणाला अंतच नाहीं. क्रोधावेशांत येतेस तेव्हां भानच विसरून जातेस. ज्या पत्रांत क्रोधाला जिंकण्याच्या व्रताचा उल्लेख करतेस त्यांतच क्रोध करतेस, आणि तो विनाकारण. माझ्या गोड ठपक्याचं कारणच तुला समजलं नाहीं. जो दांतऱ्या असलेला कपटा तूं कव्हरवर चिकटविला होतास त्यांत शृंगार किंवा कला नव्हती ही माझी तक्रार होती. कलेला जो पुष्कळ वेळ देतो त्याला मी ठपका देणार नाहीं. त्यांत कांहीं कलाच नव्हती मुळीं. कव्हरवर अशा चिठ्या चिकटविण्यांत कला कसली आली आहे ? आणि तूं त्या चिकटविल्याससुद्धां अशा रीतीनं कीं अर्ध्या उसकटूनच गेल्या होत्या. तेव्हां तुझा क्रोध अविचारी होता. मला त्यामुळं हंसूंच आलं. जवळ असतों तर थप्पडच दिली असती. पण तूं घसरलीस त्याचं काय ? त्यांत इतका वेळ घालविलास, करूं नये तो युक्तिवाद केलास आणि तुझं शरीर बिघडविलंस. कारण क्रोधाचा परिणाम शरीरावर फार होतो, हें भौतिक शास्त्रज्ञांनीं प्रयोग करून शोधून काढलं आहे. आपल्यामध्यें तर तशी समजूत आहेच. तुझं व्रत मोडलं हें निराळंच. पुनः असा क्रोध करूं नकोस; आणि माझी टीका गोड टीका होती. ती समजण्याइतकी अक्कलसुद्धां तूं गमावून बसलीस.

पत्रांविषयीं तर गाजराची पुंगीच समजावी. तेव्हां पत्र न मिळाल्यास दुःखी होऊं नये. तेथून पत्र लिहीतच जावं. बंदी झाली तर मी लिहीन. इतकीही बातमी न देऊं शकलों तरी लिहिलेलं व्यर्थ जाणार नाहीं.

नव्या फुलांना माझा प्रणाम सांग. केव्हां तरी त्यांच्यामध्यें निजण्याची मला आशा आहे असं सांगून त्यांना आश्वासन दे.

तूं मोठी मानी आहेस. फुलांच्या आसपास थोडे टोमॅटो व भाजी लावलीस तर ती बारमाहीं मिळेल आणि शरीराला लाभ होईल. शरीर तुझं नाहीं, तुला सोपविलेली ईश्वराची वस्तु आहे. तेव्हां तूं त्याच्या रक्षणासाठीं वेळ जरूर दिला पाहिजेस. अशा तरवांना फारसा वेळ लागत नाहीं. त्याला जमीनहि थोडी लागते.

माझे एक इंग्रज मित्र—जे दक्षिण आफ्रिकेंत मजबरोबर राहात होते ते—विनापरिश्रम थोड्याच दिवसांत कच्ची खाण्याची 'क्रेस' नांवाची भाजी काढीत असत.

मुलींच्या आजाराविषयीं मीं तुला लिहिलंच आहे. खोलांत शिरून तपास कर. * * विषयीं मला भीति होतीच. पण त्यानं तुझ्याजवळ सर्व कांहीं सांगितलं आहे; तेव्हां त्याला जिंकून घे. आतां तुझ्या अडचणीविषयीं—

(१) व्यक्तिपूजेच्या ऐवजीं गुणपूजा करणं योग्य आहे. व्यक्ति खोटी निपजेल आणि तिला नाश हा आहेच, गुणांना मात्र नाहीं.

(२) आश्रमाच्या चालकवर्गांतील लोक पुष्कळसे आवडत नसतील तर त्यांना सहन करायला शिकण्याची ही सोनेरी संधि आहे. निर्दोष असं कोणीच नाहीं. आणि आपल्याप्रमाणेंच सगळ्यांना मानायचं ठरविलं म्हणजे आवडण्या न आवडण्याचा प्रश्न उडून जातो.

(३) आश्रमाचीं तत्त्वं मान्य आहेत तर त्याच्या बाह्य स्वरूपाविषयीं मतभिन्नता असली तर त्याची चिंता करण्याची जरूर नाहीं. आपलं काम मर्मांशीं [तत्त्वाशीं] आहे; टपटपशीं [बाह्य स्वरूपाशीं] नाहीं.

(४) तुझे स्वभावदोष काढण्याकरतां तर आश्रमांत रहाणं हा धर्म आहे.

(५) तुझीं ध्येयं तुला आश्रमांत पुरीं करतां येणार नाहींत तर दोष तुझा—आश्रमांत तर संपूर्ण स्वातंत्र्य आहे.

(६) तुझ्या प्रेमी जनांच्या ओढीनं तुला आश्रमाच्या बाहेर कां न्यावं? [त्यापेक्षां] त्यांच्या प्रेमानं त्यांना जरूरीपुरतं तिथं आणावं. प्रेमाला भौतिक सान्निध्याची आवश्यकताच नसावी आणि असेल तर तें प्रेम क्षणिकच म्हणायचं. एक तर शुद्ध प्रेमाची कसोटी दुसऱ्याच्या वियोगानं—दुसऱ्याच्या मरणानंतर—होते.

पण हा सारा बुद्धिवाद झाला. तुझं हृदय जिथं असेल तिथंच तूं राहाशील. आश्रमाला जर तुझें हृदय सामावता येणार नसेल तर मी तरी काय करणार व तूं तरी काय करणार?

माझ्या सुताच्या साड्या विणून घेतल्याच पाहिजेत. मीं सुताविषयीं माझे विचार दर्शविले तत्पूर्वीचं तें सूत आहे. खरं पाहतां 'बा'च्यासाठींच तें राखलं आहे. तेव्हां त्याचा त्याग 'बा'नंच करावयाचा आहे. मला करावयाचा नाहीं. बा फार जाड साड्या वापरूं शकतच नाहीं; तेव्हां आश्रमाकडूनदेखील सामान्यपणें बारीक साड्याच मिळावयाच्या. अशा रीतीनंदेखील माझ्या सुताची साडी बा खुशाल वापरो. यानंतरच्या सुताविषयीं मात्र कडकपणा धारण केला पाहिजे. पण तेथेंदेखील मी 'बा'वर जबरदस्ती करणार नाहीं. 'बा'नं स्वेच्छेनं त्याचा त्याग करावा आणि तिच्या वांट्याला जें येईल त्यानं संतुष्ट राहावं, अशी माझी इच्छा आहे. पण ही भविष्यकाळची गोष्ट झाली. सध्यां तर माझं नवं सूत सगळं येथेंच आहे. कांहीं झालं तरी माझं सूत पडून राहातां कामा नये. कोणाचंही पडून राहातां कामा नये. विणण्याइतकं सूत गोळा झालं कीं तावडतोब त्याची ताणी झाली पाहिजे.

* * * कांतत असावी अशी माझी समजूत आहे. पण तूं लिहि. तेस तें बरोबरच आहे. पुष्कळ स्त्रिया कांतायचं सोडून भरतकाम पसंत करतील. जसं खाण्यांत तसं कामांतही आहे. भाकरी सोडून भज्यांकडे मन धांवेल. भाकरीवर स्थिर राहण्यांत संयम आहे—त्याग आहे; भज्यांकडे जाण्यांत स्वच्छंद आहे. त्याचप्रमाणें कांतण्यावर स्थिर राहण्यांत संयम आहे. दुसऱ्या गोष्टीकडे जाण्यांत [प्रमाणांत] स्वच्छंद आहे.

'कोणाचाही न्याय करूं नका. नाहीं तर दुसरे तुमचा न्याय करतील' [Judge not, lest ye be judged.] यावरील तुझी टीका तुला शोभत नाहीं. त्याचा अर्थच तुला समजला नाहीं. तुझ्या टीकेंत मोठा अहंकार भरला आहे. 'नाहीं तर तुमचा न्याय दुसरे करतील'चा अर्थ हा आहे कीं आपण अशा तऱ्हेच्या न्यायपात्र दोषांत सांपडूं नये. जगतापुढें आपण उद्धत बनूं नये. 'जगताला म्हणायचं असेल तें किंवा करायचं असेल तें खुशाल करो' असे विचार किंवा असले शब्द आपल्याला कसे बरं काढतां येतील? जगतापुढं आपण क्षुद्र आहोंत. म्हणजेच आपण सत्यमार्गावर असलों तरीसुद्धां जगताला शिक्षा

करीत बसत नाहीं—त्याचा न्याय करीत बसत नाहीं—तर जगतानं केलेली शिक्षा आणि न्याय आपण निमूटपणें सहन करतों. याचंच नांव नम्रता किंवा अहिंसा. तुझं लिखाण व्यंगपूर्ण किंवा क्रोधानं लिहिलं गेलं असलं तरीहि तूं पुनः असं लिहूं नयेस अशी माझी इच्छा आहे. माझ्यावर तूं जो राग काढला आहेस त्याची फिकीर नाहीं, तो मला हंसून घालवतां येईल, पण हे शब्द मला बोचतात. तुझ्या लेखणींतून अशीं वाक्यं बाहेर पडूं नयेत अर्थात् अशा प्रकारचे विचारही मनांत येऊं नयेत. विचार आलाच त्याअर्थी तो माझ्यापुढें ठेवला गेला हें ठीक झालं. माझ्यापुढें ठेवला म्हणून तर मला सुधारणा करतां येते. हा मजकूर तूं आपले विचार माझ्यापासून लपवावेस यासाठीं नाहीं लिहिला. तूं वेडी-खुळी, उद्धत, नम्र जशी असशील तशी मी तुला पाहूं इच्छितों. पण माझी मागणी मात्र ही आहे कीं तुझ्या पत्रांतील त्या विचारांना तूं तुझ्या हृदयांत-सुद्धां थारा देऊं नयेस.

जोरानं मालीश करण्यासाठीं शारीरिक बळाची आवश्यकता नसते. युक्तीची आवश्यकता असते.......

आतां तूं हल्लीं वाचते आहेस त्यासंबंधीं तूं लिहितेस तशी समजूत एके काळीं होती. आज तशी नाहीं. मेल्थुसचं कांहीं लिखाण लोकांना समजलेलं नाहीं व कांहीं चुकीनं भरलेलं आहे. जो कायदा मनुष्येतर प्राण्यांना लागू पडतो तो मनुष्याला लागू पडत नाहीं. मनुष्येतर प्राणी इतर जीवांना मारून खातात आणि जगतात, मनुष्य त्यांतून बाहेर पडायला धडपडतो. यांत त्याची अहिंसा आहे. देह आहे तोंवर तो पूर्ण अहिंसेप्रत पोहोंचणार नाहीं. पण भावनारूपानं जर ही अहिंसा त्यानें वाढविली तर कमींत कमी हिंसेनं तो निर्वाह करील. स्वतः मरून इतरांना जगूं देण्याच्या तयारींतच मनुष्याची विशेषता आहे. जसा मनुष्य वाढतो तसा आहारही वाढतो. अजून त्याच्यांत वाढण्याची शक्ति आहे. डार्विनच्या शोधानंतर दुसरे पुष्कळ नवीन शोध लागलेले आहेत. जें पुस्तक तूं वाचते आहेस तें जुनं दिसतं. जुनं असो कीं नवीन असो 'मोठ्यांतल्या मोठ्या संख्येचं कल्याण' किंवा 'बळी तो कान पिळी' हा कायदा चूक आहे. अहिंसा सर्वांचंच कल्याण चिंतिते. ईश्वराच्या इथं सान्यांच्या कल्याणाचाच न्याय असणार.

तो कसा दिला जातो, आणि अशा न्यायांत मनुष्याचं कर्तव्य काय आहे हें शोधणं आपलं काम आहे. या नीतीच्या विरुद्ध नीति पुढें मांडणं हें आपलं काम नव्हे. पण हा विषय मोठा आहे. मी आपलं थोडक्यांत तुला थोडंसं सांगून टाकलं आहे. तुला अधिक चर्चा करावयाची असेल तर प्रश्न काढ.

ता. ३०।७।३२ बापूचे आशीर्वाद.
यरवडा मंदिर

—*—

## पत्र....४३

चि.—

तुझं १ ता. चं पत्र मिळालं. छात्रालयांत होणाऱ्या भरतीनं तूं घाबरून जात नसशील. चांगल्या मुली असतील तर कांहीं त्रास होणार नाहीं. आणि जर आपण अनासक्तीचा पाठ बरोबर शिकलों असलों तरीहि कसला त्रास वाटणार नाहीं. तुझ्या शरीरस्वास्थाकरितां इतरांना फक्त बाह्य उपायच मुख्यत्वें सुचवितां येतील. अंतराचं तुझं तुलाच जास्त कळणार. मानसशास्त्र जाणणाऱ्यांवर माझा फारसा विश्वास नाहीं. कितीही शिकलेला शास्त्री असलां तरी मनुष्याचं मन तो कुठवर जाणणार? म्हणून तुझ्या प्रकृतीचा मनाशीं जो संबंध असेल तो तुलाच समजून घेतला पाहिजे आणि जरूर ते उपाय केले पाहिजेत. पण याच पत्रांत तूं असंहि लिहितेस कीं लहान मोठ्या कामांचा अन् झोपेचा किंवा जाग्रणाचा परिणाम शरीरावर झाल्यावांचून राहात नाहीं. तेव्हां खरं म्हणजे असं कीं अंतर् आणि बाह्य या दोन्हींचा शरीरस्वास्थ्याशीं संबंध आहे. बाह्य साधनांविषयीं बेदरकार राहून केवळ मनानं कोणी शरीर निरोगी ठेवूं शकलेले नाहींत. म्हणून निद्रा, आराम आणि काम यांविषयीं * * * सांगेल ते ऐक. मनाच्या विषयींचा तपास तूं कर. वाटेल तें करून शरीर लोखंडासारखं बनीव. ... ...

अंतर्नादाचं वर्णन करतां येणार नाहीं; पण कित्येक वेळां आपल्याला असं वाटायलाच लागतं कीं अंतरांतून अमूक प्रेरणा झाली आहे. मी तो नाद ओळखायला शिकलों तो काळ माझा प्रार्थनाकाळ म्हणतां

येईल. म्हणजे साधारणतः १९०६ च्या आसपास—तूं विचारतेस म्हणून आठवून हें लिहीत आहे. बाकी मला ' अरे, आज कांहीं नवाच अनुभव आला ' असं कांहीं भान झाल्यासारखं माझ्या आयुष्यांत घडलेलं नाहीं. जसे आपले केस न समजतां वाढतात तसंच माझं आध्यात्मिक जीवन वाढलं आहे, असं माझं मत आहे.

नामजपामुळं पापहरण याप्रकारें होतंः—शुद्ध भावानं नाम जपणाऱ्यांत श्रद्धा असतेच. नामजपानं पापहरण होईलच अशा निश्चयानं तो आरंभ करतो. पापहरण म्हणजे आत्मशुद्धि. श्रद्धापूर्वक नाम जपणारा थकायचाच नाहीं, म्हणजे जें जिव्हेनं होतं तें शेवटीं हृदयांत उतरतं आणि त्यामुळं शुद्धि होते. हा अनुभव निरपवाद आहे. मानसशास्त्रज्ञांचं सुद्धं असं मत आहे कीं मनुष्य जसा विचार करतो तसा होतो. रामनाम या नियमालाच अनुसरतो. नामजपावर माझी श्रद्धा अखूट आहे. नामजपाचा ज्यानं शोध केला तो अनुभवी होता आणि हा शोध अत्यंत महत्त्वाचा आहे, असा माझा दृढ अभिप्राय आहे. निरक्षरालासुद्धां शुद्धिद्वार उघडं असलं पाहिजे. तें नामजपानं होतं. (पहा गीता ९–२२, १०–१७) माळ वगैरे एकाग्र होण्यासाठीं मोजत बसायचं साधन आहे.

विद्याभ्यास सेवेकरितांच असावा; पण सेवेंत अपूर्व आनंदच आहे. म्हणून विद्या आनंदाकरितां आहे, असं म्हणतां येईल. पण कोणाला आजपर्यंत सेवेवांचून केवळ साहित्य विलासानं अखंडानंद अनुभवत आल्याचं ऐकिवांत नाहीं.

कलेचा कोणत्याहि देशाला किंवा व्यक्तीला मक्ता असत नाहीं. जींत लपविण्यासारखं कांहीं आहे ती कला नव्हे.

प्रत्येक देशाला आपल्या धंद्याचं रक्षण करण्याचा अधिकार आहे आणि तो त्याचा धर्म आहे.

निराश्रयाला आश्रय देणं हा अहिंसकाचा धर्म आहे. निराश्रय कोण हें मात्र त्या त्या परिस्थितींतच सांगतां येईल.

जो बाहेरून वाईट दिसतो तो आंत वाईटच असला पाहिजे असा नियम नाहीं. उर्दू पुस्तकं बाहेरून वाईट दिसतात यावरून तीं प्रकाशित

करणाऱ्याची गरीबी दिसून येते. पण त्यांतले लेख उत्तम नाहींत असं कसं होईल ? कित्येकांत तर आहेतच. पण हें लिहिण्यांत गोडीचा प्रश्नच कां यावा ? ऊर्दूचा अभ्यास करणं कर्तव्य आहे अर्थात् त्यांत गोडी असणारच; कारण कर्तव्यांत गोडी आहे. तूं कधींमधीं उर्दू शिकण्याची तसदी घेशील तर तुलाहि स्वतंत्रपणें गोडी वाटेल.

ता. ८।७।३२ यरवडा मंदिर

बापूचे आशीर्वाद.

—•—

## पत्र....४४

चि.—

खालील पुस्तकं परचुरे शास्त्र्यांच्या करितां पाहिजेत, त्यांतलीं जीं असतील तीं पाठवावींत, नसतील तीं दुसरीकडून मागवीन. जरा लवकर पाठविलीं तर बरं.......परचुरे शास्त्री आश्रमांत होते. फार विद्वान् आहेत. हल्लीं या जेलमध्यें आहेत. त्यांना महारोग झाला आहे. म्हणून त्यांना पुस्तकं देण्याची घाई आहे. ते रोज कांततात मला त्यांना भेटतां येत नाहीं; पण पत्र लिहूं शकतों. त्यांची पत्नीहि आजारी पडली आहे. ती बाहेर आहे. **पुस्तकें**: (१) Imitation of Christ. (२) Works of Swami Vivekanand. (जीं असतील तीं) (३) Works of sister Nivedita(जीं असतील तीं.) (४) Essays of Tolstoy. (५) व्याकरण-महाभाष्य. (६) यजुर्वेद भाष्य. (७) Dispensation of Keshav Chandra Sen.

तुझं पत्र मिळालं. मनांत येईल त्यावेळीं मला रसिक पत्र लिहितां येतं असं तूं समजतेस वाटतं ? आतां समजून ठेव कीं तसं कांहीं नाहीं. कोणतं पत्र रसिक आणि कोणतं कोरडं हेंसुद्धां मला समजत नाहीं. खरंच. आणि जें तूं रसिक समजतेस तें वस्तुतः रसिकच आहे असं कोण सांगूं शकेल ? रसिकता मापण्याचा स्वतंत्र गज परमेश्वरानं स्वतःच्या पेटींत कड्याकुलूप घालूनच ठेवलेला

दिसतो. तेव्हां तूर्त तर रसिकतेचं माप प्रत्येकाशीं स्वतःचंच राहिलं. तुझं माप पुरं करण्याचा प्रयत्न करायला लागलों तर माझे बाराच वाजतील ना ? त्यांतच माझा वेळ जायचा. हें पत्र कदाचित् अरसिक वाटेल अशी शंका आली कीं दुसरं, मग तिसरं असं लिहीतच बसूं का ? आणि तुला जशीं रसिक पत्रं लिहिलीं पाहिजेत तशींच दुसऱ्यांना, मग शेवटीं काय ? दिवाळं ! ! ! त्यापेक्षां माझं आपलं सरळ धोरण आहे. रसिक-अरसिक याचा विचारच न करतां जें मनांत येईल तें, येईल तशा भाषेंत लिहून टाकायचं. पण तूं पडलीस मूर्ख आणि वर अभिमानी. एवढी साधी सरळ गोष्ट तुला थोडीच कळणार ? आणि आतां तर मी पहातों आहे कीं तूं सर्वज्ञ असल्याचा दावा करीत आहेस. जी शहाणपणाची गोष्ट लिहिली ती सर्व तुला माहीतच आहेसं दिसतं. पण जरा थांब. जे 'मला सारं कळतं' असं समजतात, पण त्याचा अंमल करूं शकत नाहींत, त्यांना कांहीं कळतच नाहीं किंवा कळत असूनही समजत नाहीं. तेव्हां माझ्या मतें तर तूं जोंवर वेडंखुळं लिहिशील, क्रोध करशील, अभिमान बाळगशील तोंवर मूर्खच राहाशील. याचा अर्थ असा नव्हे कीं तूं अभिमान, क्रोध, खुळेपणा झांकून लिहावंस. जोंवर हें सारं आहे तोंवर तूं तसंच लिहिलं पाहिजेस. तुझ्या पत्राची किंमत तूं जशी आहेस तशी दिसण्यांत आहे. पण खुळी राहिलीस तरी चालेल. मात्र क्रोध काढलाच पाहिजे आणि अभिमान थोडा कमी करावा. साफ काढून टाकणं जवळ जवळ अशक्य आहे. तूं नारद-मुनीचं उदाहरण देतेस. पण त्यांच्या वचनाचं रहस्य तुला कुठं माहीत आहे ? त्यांच्यासारखी व्यक्तिपूजा अवश्य कर. ती करणं वाजवी आहे. जसे वैकुंठभगवान् ऐतिहासिक तसे त्यांचे कृष्ण. नारदमुनींचे भगवान् त्यांच्या कल्पनामंदिरांत विराजले होते. ते नारदमुनी आजहि आहेत आणि त्यांचा कृष्णहि आहे. कारण ते दोघे आपल्या कल्पनेंतच आहेत. माझ्या दृष्टीनं इतिहासापेक्षा कल्पना वरचढ आहे. रामापेक्षां नाम वरचढ असं तुलसीदासांनीं म्हटलं आहे, त्याचा हाच अर्थ संभवतो. तूं व्यक्तिपूजेच्या भोवऱ्यांत सांपडली आहेस, म्हणूनच मला चिंतेंत टाकत आहेस का ? आश्रमाच्या बाबतींत तूं मला निर्भय करूं शकत नाहींस. * * * करूं शकला आहे. असे दुसरे नमुनेहि दाखवितां येतील. तेसुद्धां व्यक्तिपूजक आहेतच.

कोण नाहीं ? पण शेवटीं ते व्यक्तीच्या पार जाऊन तिच्या गुणांचे म्हणजेच कृतीचे पुजारी बनतात. ही अमूल्य गोष्ट विसरून जाऊन आपण आपल्या मूर्खपणानं स्त्रियांना सती जायला शिकविलं ही व्यक्तिपूजेची पराकाष्ठा ! ! पण पत्नीधर्म तर हा आहे कीं तिनं पतीचं कार्य स्वतःमध्यें अमर करावं. पतिपत्नीमधून विकार आणि नरनारीजातिभेद काढून टाकला म्हणजे तो आदर्श सगळ्या जगाला वाटेल त्या स्थितींत लागू पडतो. याचाच अर्थ कीं हें प्रेम परमेश्वरांत जाऊन मिसळतें. पण आतां हा विषय तसाच सोडतों.

तूं * * च्या येण्याचा समाचार ऐकून इतकी गोंधळलीस कां ? त्यालादेखील ताब्यांत आणण्याची हिंमत बाळग. तेवढा विश्वास बाळग. प्रेम सर्व कांहीं जिंकतं हें अमर वाक्य हृदयांत उतरूं दे. कोणीही आला तरी प्रसन्न राहाण्याचाच आपला धर्म आहे. आपण आपल्या हातून होईल तेवढी सेवा करून मोकळं व्हायचं आहे ना ? तूं असा कां विचार करीत नाहींस कीं बाकीचीं मुलं सुधरलीं असतील तर * * * सुधारतीलच. संभव असाही आहे कीं * * आतां शहाणा झाला असेल. मला त्याची पुष्कळ आशा आहे.

मुलींची सेवा करतां करतां तुला पाणी झालं पाहिजे. मुली जर कोणाशींच मनमोकळ्या बोलणार नाहींत तर त्या सगळ्या आजारीच पडणार. * * ला लिहिलेलं माझं पत्र वाच आणि जर ती तें पत्र द्यावयास तयार असेल तर समजूत आलेल्या मुलींना वाचून दाखव.

केळ्यांमध्यें वात उत्पन्न करण्याचा गुण मीं तर कधींच नाहीं अनुभवला. माझ्या इतकीं केळीं क्वचितच कोणीं खाल्लीं असतील. पुष्कळ वर्षं तीं माझा मुख्य आहार होतीं. दूध नाहीं रोटी नाहीं, फक्त केळं व ऑलिव ऑईल, तसेच शेंगदाणे व लिंबू. पण वायूचं नांव नाहीं. पुष्कळ वर्षांनीं पुन्हा हल्लीं खात आहे. पण कांहीं वाईट परिणाम दिसत नाहीं. त्याचा एक नियमच आहे. एक तर केळीं शिजवावींत किंवा तीं अगदीं पिकलेलीं असावींत. कच्च्या केळ्यांत निव्वळ स्टार्च असतो. स्टार्च शिजविल्याशिवाय खाऊं नये हें * * * च्या प्रयोगांत मी बघितलं. म्हणून केळीं मऊ लागलीं

नाहींत, पक्कीं वाटलीं नाहींत तोंवर खाऊं नयेत. दोन तीन दिवस तशीच ठेवलीं म्हणजे पिकतात. खाण्याची घाई असली तर तीं शेकावीत किंवा उकडावींत.

मला विरोध करणारे पूर्वीं होते आणि आजहि आहेत. तरी मला त्यांच्यासंबंधीं रोष नाहीं. स्वप्नांतहि त्यांचं मी वाईट चिंतलेलं नाहीं. यामुळें पुष्कळ विरोधी लोक मित्र बनले आहेत. कोणाचाहि विरोध माझ्यापुढं आज-पर्यंत टिकूं शकलेला नाहीं. तीन वेळां तर विरोधकांनीं माझ्यावर हल्ला केला तरी अजूनपर्यंत मी टिकलों आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं विरोधकांना पाहिजे असलेलीं सफलता त्यांना कधीं मिळणारच नाहीं. मिळो वा न मिळो, त्याच्याशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं. माझा धर्म त्यांचंसुद्धां हित इच्छिणं आणि प्रसंगीं त्यांचीसुद्धां सेवा करणं हा आहे. या सिद्धांताचा मी यथाशक्ति अंमल केला आहे. तो माझ्या स्वभावांतच आहे, असं मला वाटतं.

लाखो लोक माझी पूजा करतात तेव्हां मला गुदमरल्यासारखं होतं. या पूजेंत मला गोडी वाटली आहे किंवा त्यामुळं मी त्या पूजेला योग्य आहे असं मला वाटलं आहे असं कधींच झालं नाहीं. पण माझ्या अयो-ग्यतेची मात्र मला जाणीव राहिली आहे. मानाची भूक मला कधीं लागली असं मला आठवत नाहीं. पण कामाची भूक मात्र आहे. मान देणाऱ्या-कडून काम घेण्यासाठीं मी धडपडलों आहे आणि ज्यांनीं काम दिलं नाहीं त्यांच्या मानापासून मी दूर पळालों आहे. मला जिथं पोहोंचायचं आहे तिथं जेव्हां मी पोंचेन तेव्हांच मी कृतार्थ होईन. लेकिन ऐसा दिन कहाँसे, जब मियाँके पाँवमें जूती ?

दुनियेच्याविरुद्ध उभें राहाण्याची शक्ति मिळविण्यासाठीं मगरूरी किंवा तुच्छता अंगीं आणण्याची जरूरी नाहीं. जीझस् दुनियेच्या विरुद्ध उभा राहिला, बुद्धहि आपल्या युगाच्या विरूद्ध गेला, प्रल्हादानं तसंच केलं. ते सारे नम्रतेचे पुतळे होते. त्यासाठीं आत्मविश्वास आणि प्रभूवर श्रद्धा पाहिजे. मगरूरीनं विरोध करणारे शेवटीं पडले आहेत. तुझी मगरूरी आणि तुझा क्रोध कित्येक वेळां ढोंग असतो. पण हें ढोंगहि

वाईट आहे. ढोंग शेवटीं संवयीचं रूप घेतं आणि पुष्कळ वेळां उगीचच गैरसमजाला कारण होतं. असं होऊं नये यासाठीं माणसानं फार सावध राहून चालण्याची जरूरी आहे. अंतसमयीं एकाकी टिकून राहाण्याची शक्ति आत्यंतिक नम्रतेवांचून असंभवित वाटते; आणि ही शक्ति आली असेल तरच ती खरी नम्रता म्हणायची. तिची परीक्षा त्यांतच आहे. पुष्कळसे बहादुर गणले गेलेले लोक खरोखर तसे होते कीं नाहीं तें पारखण्याची संधीच समाजाला मिळालेली नसते.

ता. २८।८।३२ **बापूचे आशीर्वाद.**

यरवडा मंदिर

—*—

## पत्र...४५

चि.—

तुझं पत्र मिळालं. राखी मिळाली. दोन दिवस उशीरां, पण मी तर ती सोमवारींच मिळाली असं मानून घेतलं.

केळीं जर अनुकूल न झालीं तर जबरदस्तीनं खाण्यापासून कांहीं फायदा नाहीं. प्रत्येक कोठ्याचं कांहीं वैशिष्ट्य असतंच.

तुझ्या क्रोधाचं पृथक्करण बरोबर ध्यानांत आलं. क्रोधाला तूं जिंक. तूं जिंकशीलच असं मला वाटतं.

स्वतःची कांहीं गरज असेल ती न सांगणं म्हणजे मोठा अभिमान व अन्याय आहे आणि त्यामुळें प्रियजनावर मोठा बोजा पडतो. विनय आणि निरभिमान ही आपली गरज जाणण्याच्या कष्टांतून प्रियजनांना वांचविते. हा विनयाचा पहिला पाठ आहे. आतां शीक.

लोकमत म्हणजे ज्या समाजाच्या मनाची आपल्याला किंमत आहे त्याचं मत. हें मत नीतीच्या विरुद्ध नसेल तोंपर्यंत त्याला मान देणं हा धर्म आहे. ( रामानं धोब्याचे शब्द ऐकून सीतेचा त्याग केला या ) धोब्याच्या गोष्टीवरून शुद्ध निर्णय करणं कठीण आहे. आज आपल्याला तर तें मुळींच रुचणार नाहीं. अशी टीका ऐकून आपल्या पत्नीचा त्याग करणारा निर्दय आणि अन्यायीच म्हटला पाहिजे. पण रामायणांत

कवीनं हा प्रसंग कोणत्या दृष्टीनं आणला आहे हें मला सांगतां येणार नाहीं. आपल्याला त्या पंचाइतींत पडायची गरज नाहीं. मी तरी निदान त्या भानगडींत पडणार नाहीं. रामायणासारखीं पुस्तकंसुद्धां मी अशा दृष्टीनं वाचीत नाहीं.

मुलींच्याबरोबर माझ्या मोकळेपणाच्या वागणुकीनं आश्रमवासीयांवर आघात होत असेल तर तो मोकळेपणा मी सोडून दिला पाहिजे असं माझं मत आहेच. ही मोकळीक घेण्याचा कांहीं स्वतंत्र धर्म नाहीं आणि घेतली तर त्यांत नीतीचा भंग नाहीं. पण अशी मोकळीक न घेण्यानं मुलींच्यावर वाईट परिणाम होईल तर मी आश्रमवासीयांची समजूत घालीन व मोकळीक घेईन. मुलींनींच मला सोडलं नाहीं तर काय करायचं तें पाहून घेणं माझं काम आहे. मी जी मोकळीक ज्या तऱ्हेनें घेतों तिची नक्कल कोणीहि करणं योग्य नाहीं. तें स्वाभाविक झालं पाहिजे. ‘आजपासून मी मोकळीक घेणार’ असा विचार करून कृत्रिमपणें कोणाला मोकळीक घेतां येणार नाहीं आणि जर कोणी घेतली तर तें भयंकर म्हटलं पाहिजे.

... मुख्य गोष्ट ही आहे कीं विकारवश होऊन अत्यंत निर्दोष वाटणारी मोकळीकसुद्धां जो कोणी घेतो तो खाईंत पडतो आणि दुसऱ्यालाहि टाकतो. आपल्या समाजांत स्त्रीपुरुषांचा संबंध स्वाभाविक झालेला नाहीं, तोंवर अवश्य सावधानपणें चालण्याची जरूर आहे. या बाबतींत सर्वांना लागू पडेल असा एखादा राजमार्ग नाहीं. तुझ्या स्वतःच्या चालचलणुकींत पुष्कळ असंस्कारिता आहेच. तुझ्या स्वाभाविक निर्दोषपणामुळें तुझा बचाव होतो; पण त्याचा तूं अभिमान धरतेस आणि त्याला हट्टानं धरून ठेवतेस हें अगदीं बरोबर नाहीं. त्यांत अविचार आहे. आज त्याचा तोटा तुला कळत नाहीं; पण केव्हां तरी पस्तावा करावा लागेल. अभिमान कोणाचासुद्धां टिकला नाहीं. लौकिक मर्यादा तेवढी वाईट असं म्हणून समाजावर आघात करूं नये. आतां लोकमत म्हणजे काय तें समजलं ?

ता. १८।८।३२ **बापूचे आशीर्वाद.**

—※—

## पत्र....४६

चि.—

तुझं पत्र मिळालं. माझीं विशेषणं मिळविण्याखातर तर तूं निरनिराळ्या त्या त्या विशेषणांना लायक असे गुण प्रगट करीत नाहींस ना ? तसं करशील तर विशेषणांना कांहींच किंमत राहाणार नाहीं. *** *** मध्यें असतांनासुद्धां ** ची ग्लानि ती दूर करूं शकली नाहींस हें विचित्र आहे. राखी पौर्णिमेदिवशीं तिनं रक्षाबंधन तर केलंच असेल; पण तें सुताच्या धाग्यानं पर्याप्त झालं कां ? ***च्या शोकाचं मूळ समजून घेऊन तें दूर करणं ***च्या शक्ति बाहेरचं नसावं. *** आपल्या पत्नीला पूजीत असे. दोघेंहि विवाहित असूनसुद्धां ब्रह्मचर्य पालन करीत असत, अशी माझी समजूत आहे. ** जातांच **** वर मोठा आघात झाला. ****च्या अगदीं अंतरांत लग्न करण्याची कदाचित् इच्छा असेल. आपली स्थिति तो स्वतःच जाणूं शकत नाहीं. पण त्याला त्याच्यासारखीच भावनाप्रधान पत्नी पाहिजे. ती मिळो वा न मिळो. पण तिच्याऐवजीं त्याला भावनाप्रधान बहीण मिळाली तरी कदाचित् **** खुलेल आणि त्याचं मन मोकळं होईल. *** पूर्ण ब्रह्मचारिणी आहे अशी माझी कल्पना आहे. तिची ****शीं मैत्री आहे. तिच्यांत सुद्धां भावना आहे. आणि तूं **** च्या खिन्नतेविषयीं लिहिलंस म्हणून इतकं लिहायची मला प्रेरणा झाली. *** ला मी बरोबर ओळखलं आहे असं तुला वाटलं आणि सदर काम तिच्या शक्तीबाहेरचं नाहीं असं तुला वाटलं तर हें पत्र तिला खुशाल पाठवून दे. हें तिच्या आटोक्याबाहेरचं किंवा क्षेत्राबाहेरचं वाटलं तर एवढा भाग विसरून जा. **** शुद्ध प्रेमाचा भुकेला आहे ! पण त्याच्यांत आवड आणि नावड भरलेली आहे. थोड्यांनाच तो चाहूं शकतो. त्यामुळं मनांतल्या मनांत कुढत असतो. अशा माणसाला पत्नीची जरूर कमी असते. पत्नीमध्यें तो लिपटून जाऊं शकतो. अशा माणसाला विकारशून्य बहीण पाहिजे. ती मिळाली तर त्याचं सुरळीत चालेल. आपल्या स्त्रिया हा गुण अंगीं आणत नाहींत. त्यांना पत्नी होतां येतं, बहीण होतां येत नाहीं. बहीण व्हायला मोठ्या त्याग-

वृत्तीची आवश्यकता आहे. जी पत्नी होते ती पूर्णपणें बहीण होऊंच शकत नाहीं हें स्वयंसिद्ध असं मला तरी वाटतं. खरी बहीण सगळ्या जगाची बहीण होऊं शकते. पत्नी मात्र स्वतःला एका पुरुषालाच अर्पण करते. पत्नीगुणाची जरूर आहे. पण तो शिकावा लागत नाहीं; कारण त्यांत विकारशांतीला अवकाश आहे. जगताची बहीण होण्याचा गुण कष्टसाध्य आहे. जिच्यांत ब्रह्मचर्य स्वभावसिद्ध आहे आणि जिच्यांत सेवाभाव उत्कृष्ट स्थितीला पोंचला आहे तिलाच बहीण होतां येईल.........तूं स्वतः अशी आदर्श बहीण व्हावेंस हा तर माझा प्रयत्न आहेच. काम कठीण आहे. पण प्रभूला करायचं असेल तें तो करील.

......जन्माष्टमीच्या दिवशीं तूं आश्रमांत पोंचलीस हें ठीक झालं. लक्षांत ठेव, क्रोधाला जिंक. * * तुझ्याबरोबर यायला तयारच झाला नाहीं हें तुला माहीत आहे का? त्याच्यावर क्रोध करूं नकोस. तो पोर आहे, तूं पोर नाहींस. त्याला जिंकण्यांत तुझा विजय आहे. त्याला न जिंकण्यांत तुझा पराजय आहे.

सुसंस्कारी आईबापांची परीक्षा कोण करणार? गर्भ राहिला तेव्हां आईबापांची स्थिति कशी होती हें कुणाला सांगतां येणार? म्हणून मला वाटतं कीं 'चांगल्याचं फळ चांगलंच' या निरपवाद नियमाला चिकटून राहाण्यांतच सार आहे. दरेक वेळेला अमुक व्यक्तीच्या बाबतींत हा नियम सिद्ध करतां नाहीं आला तर त्याचं कारण आपलं अज्ञान, नियमाची अपूर्णता नव्हे.

दैवाला मीं मानलं तरी तें मिथ्या करतां येण्यासारखं नाहीं. दैव म्हणजे पूर्व कर्मांचा परिणाम.

वेश्यांचा उद्धार करण्यासाठीं पुरुषांनीं पशुत्व सोडून दिलं पाहिजे. जोंवर पुरुष पशुसृष्टींत वावरेल तोंवर वेश्याहि राहाणारच. वेश्यांनीं आपला धंदा सोडला आणि त्या सुधारल्या तर त्यांच्याशीं 'कुलीन' म्हटल्या जाणाऱ्या पुरुषांनीं अवश्य लग्न करावं.' एकदां वेश्या ती सर्वदा वेश्याच' असा नियम नाहीं.

लष्करांतील शिपायांच्यासाठीं मुलींना पळविण्यांत येतंच हें मत मला अवास्तव वाटतं. सुव्यवस्थित राज्यांत असं मुळींच असणार नाहीं.

ता. २६।८।३२ **बापूचे आशीर्वाद.**
यरवडा मंदिर

—*—

## पत्र....४७

चि.—

या वेळेला तुला कोणतं नवं विशेषण द्यावं तें सुचत नाहीं. तूं मागशील तें देतों.

मला नाहीं वाटत कीं त्या दोन बाया आल्यानं आपल्याला म्हणतां येईल कीं शिकलेल्या स्त्रिया आतां येऊं लागल्या. तसं म्हटलं तर मधून-मधून एखादी शिकलेली स्त्री वाट चुकून येते; पण त्यांच्यापैकीं एकीला देखील आपण ( आश्रमांत ) संग्रहूं शकलों नाहीं. तुला शिकलेली मानली आणि तुझा संग्रह केलेला आहे असं मानलं तर गोष्ट निराळी. पण हा तर एक अपवाद झाला. एक चिमणी आली म्हणजे उन्हाळा आला असं थोडेंच मानलं जाणार ?

** विषयीं मी दिलगीर आहे. त्याला वर्गातून रजा दिली तें ठीक; पण त्याला विसरून जाऊं नको. त्याच्यावर नजर ठेवून त्याला सरळ रस्त्यावर आणतां येईल तर आण. ** विषयीं तुझी अडचण मला समजते. जर तुझ्यांत उदारता आणि हिंमत येईल तर त्याच्याविषयीं त्याच्या आईबापांशीं तूं बोलून घेतलं पाहिजेस आणि त्याच्या हिताचा कांहीं रस्ता काढला पाहिजेस.

......आपल्या मार्गांत आपणच कांटे पेरतों आणि मग ते बोंचले म्हणून तक्रार करतों. आपल्या स्वतःच्या शक्तीवर आपण विसंबून राहिलों तर कदाचित् आपण सफल होणार नाहीं; पण ईश्वराच्या शक्तीवर विसंबून राहिलों तर घोर अंधारांतसुद्धां प्रकाश दिसेल. ‘माझ्यांत प्रेम असेल तर ना ?’ असं म्हणून जर तूं पाठ फिरवलीस तर माझं सांगणं निरर्थक आहे. आणखी ‘आपल्यांत प्रेम आहे असं समजत असूनसुद्धां तुम्हांला पुष्कळांना कां जिंकतां आलं नाहीं ? मग मला सांगण्याचा तुम्हांला काय अधिकार ?’ असं म्हणून तूं तुझं हृदयद्वार बंद करशील तरीहि मी लाचार बनून जाईन. माझी अपूर्णता मी कबूल करतों. तिचं तूं कशाला अनुकरण करतेस ? माझ्या अनुभवांतून मी तुला जें देतों त्याचा तूं उपयोग कर. सोबत्यांचे दोष घेऊन ठेवायचे नसतात

ते दोष टाळायचे असतात आणि त्यांचे गुण असतील ते ग्रहण करायचे असतात. शिवाय मी तुझ्यासारखा हात टेकून [ हार खाऊन ] बसत नाहीं, कठोरतम हृदयालासुद्धां विरघळून टाकण्याची मला उमेद आहे, आणि म्हणून मी प्रयत्नशील असतों.

तूं भोजनगृहांत वर्तमानपत्रं वाचून दाखवीत असशील आणि थट्टा-विनोद करीत असशील तर तें मी वाईटच म्हणेन. भोजनगृहांत मौनच राखलं पाहिजे. तिथं वाचून काय दाखवायचं ?......

......तुझं वाचणंसुद्धां गांभीर्यपूर्ण निदान भोजनगृहांत तरी असलं पाहिजे. म्हणून एवढी सुधारणा करून टाक. जर तूं भोजनगृहांत विनोद आणि टवाळक्या करायला लागलीस तर मुलांचं काय होईल ? आणि तीं सर्वच जर तुझ्याप्रमाणं करूं लागलीं तर भोजनगृह म्हणजे ‘ माकडांचं रान ’ होऊन जाईल व शिस्त मोडेल. हें सर्व ‘ स्मार्ट लिट्ल् गर्ल ’ च्या ‘ स्मार्ट डोक्यांत ’ उतरलं का ? कीं ‘ स्मार्टनेस् ’ सगळा आश्र-मांतून चोरीला गेला ? आज आतां अधिक लिहीत नाहीं.

ता. ३१।७।३२ **बापूचे आशीर्वाद.**
यरवडा मंदिर

—*—

## पत्र....४८

चि.–

तूं धीर आणि विश्वास ठेवलास तर माझ्या 'स्वभाव पुस्तका'ची सगळीं पानं तुझ्यापुढं उघडीं होतील. 'जो मला (सत्याला) प्रीतिपूर्वक सतत भजतो त्याला बुद्धियोग मी देतों' हा सत्य-नारायणाचा कौल आहे. याच्या मनामधून माझ्या स्वभावाचीं सगळीं पानं उघडीं होतात. पुस्तक समोर पडलं असलं तरी तें वाचतां आलं नाहीं किंवा वाचण्याची कोणी तसदी घेतली नाहीं तर तो दोष कोणाचा? पण मी थोडा वाहवलों. तरी पण मीं तुला हें पुस्तक वाचण्याची रीत दाखविली. तूं म्हणशील, 'मला हें ठाऊकच होतं.' असं म्हणालीस तर मी तुला 'सर्वज्ञा' म्हटलं तें खरंच ठरलं म्हणायचं ना?

* * * बहेन आजारी आहेत, तुला माहीत आहे? तिच्या-बरोबर बोल तर खरी! आपली कल्पना आपल्याला जितकी भ्याड बनविते तितक्या भयाचं कारण वास्तविक असतच नाहीं. 'मंछाभूत आणि शंका डाकीण' (इच्छारूपीभूत आणि शंकारूपी डाकीण) ही म्हण अगदीं खरी आहे—अगदीं शंभर टक्के.

तुझ्याविषयीं मी * * * च्या पत्रांत काय लिहिलं आहे?...मला तुझ्या आजच्या ब्रह्मचर्याविषयीं लेशमात्र शंका नाहीं. उद्यांचं मला माहीत नाहीं. उद्याचं तूं जाणत असतील तर नारदापेक्षां व रामापेक्षांहि तूं विशेष आहेस. असं असलं तरी तुझ्या संकल्पाला मी नेहमीं उचलूनच धरलं आहे. तुला चट्कन् कोणी फूसलावील असं मी मानीत नाहीं. पण तुझ्यासारख्याच दृढ स्त्रियांनीं लग्न केलेलं मी पाहिलं आहे. त्यांत त्यांचा तरी दोष काय काढायचा? म्हणून आज फक्त मी तुझ्यासंबंधीं तशी इच्छाच बाळगीन, तुला आशीर्वाद देईन, माझ्याकडून होईल ती मदत करीन, माझ्याकडून होतील तितके प्रहारहि करीन. शेवट भगवंताच्या आणि तुझ्या हातांत. तुझीं पत्रें जशीं येतात तशींच मला हवीं आहेत. तूं कृत्रिम झालीस तर माझ्या दृष्टीनं कुचकामाची झालीस. तुझ्या अंतरांत गांठीं आहेत त्या जसजशा दिसतील तसतशा काढण्याचा प्रयत्न

करीन. पण मी तरी काढणारा कोण ? हें काम एका माणसाच्या हातचं नाहीं. भगवान् मला जितक्या अंशांनीं करूं देईल तितक्या अंशानं मी निमित्त होईन. माझा त्यांत स्वार्थ आहे. कारण तुझ्याकडून मला पुष्कळ काम करून घ्यायचं आहे. तुझ्यामध्यें जें मी ओतीत आहे तें फुकटच जाणार असं मला वाटत असतं तर एवढीं मोठीं पत्रं लिहिण्याची मी तसदी घेतली असती का ?

एखाद्या व्यक्तीच्या किंवा समाजाच्या अवनतीचं खरोखर कारण आजवर शोधलं गेलं आहे असं ऐकिवांत नाहीं. अनुमानं पुष्कळ करतां येतात. तात्कालिक कारणहि सांपडतं, आणि तें नेहमीं एकच असत नाहीं. पण सामान्यतः असं अवश्य म्हणतां येईल कीं अवनतीच्या मुळाशीं धार्मिक न्यूनता असतेच. पारतंत्र्य हें कधींहि मूळ कारण असूं शकणार नाहीं; कारण तें खुद्द इतर कारणांमुळें—अनेक प्रकारच्या दौर्बल्यामुळें—आलेलं असतं.

शेजाऱ्याचं कर्तव्य आपल्या शेजाऱ्याला सदोदित धार्मिक पद्धतीपूर्वक मदत करणं हें आहे.

अहंकाराचं बीज शून्यता अनुभवल्यानंच नष्ट होईल. एक क्षणभर कोणी अंतरांत खोल उतरून विचार करील तर स्वतःची अतिअल्पता त्याला समजल्यावांचून राहाणार नाहीं. पृथ्वीशीं तुलना करतां जन्तूंना जसें आपण तुच्छ समजतों त्याहूनहि हजारोंपट मोठ्या प्रमाणांत या जगताशीं तुलना करतां मनुष्य प्राणी तुच्छ आहे. त्याच्यांत बुद्धि आहे म्हणून फेर मुळींच पडत नाहीं. त्याचा मोठेपणा आपली तुच्छता अनुभवण्यांतच आहे. कारण अनुभव होतांच दुसरं हें ज्ञान उत्पन्न होतं कीं जसा तो स्व-रूपानं तुच्छ आहे तसाच तो परमेश्वराचा तुच्छतम अंश असूनसुद्धां परमेश्वरामध्यें त्याचा लय होतो; म्हणून तो परमेश्वररूप आहे आणि या सूक्ष्म अणूंतसुद्धां परमेश्वराची शक्ति भरून राहिली आहे.

मायावाद मी माझ्या पद्धतीनं मानतों. कालचक्रांत हें जगत् माया आहे. पण ज्या क्षणाला त्याचं अस्तित्व आहे तेवढ्या क्षणभर तें आहेच.. मी अनेकान्तवाद मानतों.

जर कोणती एखादी वस्तु मनुष्यासमोर प्रत्यक्ष असेल तर ती मृत्यु ही तर आहेच. असं असूनहि या अनिवार्य प्रत्यक्ष वस्तूचं मोठं भय वाटतं

हेंच आश्चर्य आहे, हीच ममता आहे, नास्तिकता आहे. तिला तरून जाण्याचा धर्म एकट्या मनुष्यालाच लभ्य आहे.

पापपुण्य मृत्यूनंतरसुद्धां जीवाबरोबरच जातं. जीव जीवरूपानं तें भोगतो—मग तो दुसऱ्या दृश्य शरीरांत असो कीं सूक्ष्म शरीरांत असो, त्याला हरकत नाहीं.

ता. ११।९।३२ **बापूचे आशीर्वाद.**

यरवडा मंदिर

—*—

## पत्र....४९

चि.—

तुझं पत्र मिळालं. सर्वांचा समाचार चांगला दिला आहे. * * च काम कठीण आहे. तुझ्यावर तिची श्रद्धा आहे, तेव्हां कांहीं करतां येईल तर पहा. ती आहे भाबडी, तिचा हेतु शुभ आहे; पण फार विह्वळ आणि अव्यवस्थित मनाची आहे. प्रेमानं जें करतां येईल तें कर.

* * नं माफी मागितली हें चांगलं केलं. त्याला आतां जवळ करणं शक्य असेल तर कर. तो खूप हुशार आहे इतकं तर मीं पाहिलं आहेंच. आपल्या हुशारीचा चांगला उपयोग करील तर किती चांगलं !

आश्रमाचा पैसा ज्याच्यासाठीं वापरणं योग्य आहे त्याच्यासाठीं वापरला जातो. मग तो कोणीही असो. पण टीका मात्र वाटेल त्या कार्याची होऊं शकेल. चुका होत असतील पण आश्रमाचा हेतु नेहमीं तटस्थतेनं कारभार करण्याचा असतो.

आश्रमाच्या पैन् पैचा हिशेब पहाण्याचा लोकांना अधिकार आहे. आश्रम खासगी संस्था नाहीं. आवक ही त्याच्या खर्चाची मर्यादा आहे. आश्रमाजवळ कवडी नसली तरी चालेल, कोटी मिळाले तरी तो खर्चील. देणाऱ्यांना विश्वास आहे तोंवर ते देतील. संस्था ईश्वर चालवीत आहे, देणाऱ्यांना तोच प्रेरणा करतो.

मला वाटतं कीं कोणीही व्यक्ति आश्रमांतून बाहेर जात असली तर तिनं मंत्र्यांची परवानगी घेतली पाहिजे.

ता. १५।१०।३२ **बापूचे आशीर्वाद.**

यरवडा मंदिर

—*—

## पत्र....५०

चि.—

माझ्यावर आतां इतका बोजा येऊन पडला आहे कीं आश्रमाला लांब पत्रं पाठवितां येतील कीं नाहीं, शंकाच आहे; त्यांतही माझीं लांबलचक पत्रं आतां वर्तमानपत्रांत वाचशील तेव्हां तुला संतोष वाटेल हें मी जाणतों.

दिवाळीच्या दिवसाचीं वेगळीं वर्णनं वाचून तिकडे उडून यावं असं मनांत आलं; पण पहातों तों पिंजरा वरून आणि आजूबाजूनं बंदच आहे, तेव्हां पंख फडफडावून गप बसलों.

तुझी जबाबदारी वाढत चालली आहे हें मला समजतं. ईश्वर तुला संभाळून घेईल. तूं आत्मविश्वास गमावून बसूं नकोस.

तूं लोणी वाढवून जर बरी झालीस तर मी तें स्वस्त औषध समजेन.

तुला इतकंच सांगायचं कीं तूं चिकाटी सोडूं नकोस. ... ... मुलांच्या बाबतींत विनयाचाच उपयोग करावा. आश्रमांत राहाणाऱ्यांनीं चूक केली कीं लगेच ‘ आपला रस्ता धरा ’ असं म्हणणं हें फार अपमानकारक आहे. असं कोणाला म्हणूं नकोस ... ...

आपलं ( राष्ट्र ) गीत आपल्याला शोभेल असंच आहे. स्वप्नांचं पृथक्करण मला करतां येत नाहीं.

... भावना केव्हां प्रगट करावी याचा एक नियम नाहीं. सत्यनारायण प्रेरणा करील तेव्हां प्रगट करावी असं मी म्हणेन.

ता. ६।११।३२ बापूचे आशीर्वाद.
यरवडा मंदिर.

—*—

## पत्र....५१

चि.—

आजसुद्धां छोटंच पत्र. हल्लीं हरिजन बंधु-भगिनी पुष्कळ वेळ घेत असतात.

... ... माझ्या भावनेविषयीं तूं विचारतेस त्यांतून कांहीं निष्पन्न होईलसं वाटत नाहीं; कारण कोणालाहि आलेल्या भावनांचं पृथक्करण पुरं करतां येत नाहीं.

जेव्हां तत्त्व व्यवहारांत उतरत नाहींसं दिसतं तेव्हां समजावं कीं, आपण तत्त्व बरोबर ओळखलं नाहीं. शुद्ध तत्त्व व्यवहारांत उतरलंच पाहिजे. संपूर्णपणें मात्र कोणतेंहि तत्त्व व्यवहारांत उतरूं शकत नाहीं; पण जो व्यवहार तत्त्वाच्या जवळ जात नाहीं तो अशुद्ध आणि त्याज्य आहे.

ता. १३।११।३२. बापूचे आशीर्वाद.

—*—

## पत्र...५२

चि.—

तुझं पत्र मिळालं. ज्यांना संयमाची किंमत समजली त्यांना तर आहाराच्या फेरफारांत गोडीच वाटेल. आश्रमांत जेलचं अन्न सुरू केलं आहे, असं वर्तमानपत्रांत कोणीं दिलं ? ही गोष्ट खरीच असती तर हरकत नव्हती, पण आपण तर दूध, तूप इ. पुष्कळ वस्तू घेतों; असं असून जेलचं अन्न सुरू केलं आहे असं कसं म्हणतां येईल ? या गप्पेचं मूळ तुला सांपडलं असेल तर कळीव.

तुझी तक्रार खरी आहे कीं कडक नियमहि मीच घडवितों व विलासी लोक आश्रमांत येतात त्याचंहि कारण मीच आहे. मी तर सांगून चुकलों आहे कीं याच्याविरुद्ध जाऊन तुम्ही सगळे याचा प्रतिकार करूं शकतां आणि शक्तीबाहेर असलेल्या कोणालाहि आश्रमांत घ्यायला तुम्ही बांधलेले नाहीं. मी फक्त सल्लाच देणार. अंमल करणं न करणं केवळ तुम्हां लोकांच्या हातीं आहे. एवढं मात्र मला वाटतं खरं कीं आपण स्वतः

कडक नियम पाळत असतांनाहि अनियमित असं कोणी आलं तर त्याला निभावून घेण्याची, त्याच्याविषयीं उदारता दाखविण्याची शक्ति आपणांत असली पाहिजे.

लहानमोठी जी प्रतिज्ञा आपण करूं ती पाळतां आली तर तो ईश्वराचाच अनुग्रह आहे यांत शंका नाहीं.

ता. २७।११।३२ बापूचे आशीर्वाद.

—*—

## पत्र....५३

चि.—

'* * ना तुझं पत्र वाचायला देऊं नये' या तुझ्या मनाई-हुकमाला मीं मान दिला आहे. मनाई हुकूम मात्र त्यांना वाचून दाखवावा लागला. त्यांचेविषयीं तूं जें लिहिशील तें त्यांना समजूं नये अशी तुझीदेखील इच्छा नसणार असं मी मानतों. तेव्हां तेवढाच भाग वाचून दाखवून बाकीचा भाग वाचूं नका असं मीं सांगितलं. पण तुझा मनाई-हुकूम मला पसंत नाहीं. आश्रमांतील एका व्यक्तीनं आश्रमांतील दुसऱ्या व्यक्तीपासून एखादी गोष्ट कां लपवावी? लहान मुलींनीं अशी इच्छा केली, अडाणी मोठ्या माणसांनाहि तसं वाटलं तर तें एक समजण्याजोगें आहे. पण तुला लपवायचं काय कारण आहे? तुझीं पत्रं दुसऱ्यांनीं वाचलीं म्हणून त्यांचं पावित्र्य कमी होत नाहीं, वाढतं. तुझे विचार जगाला समजले तर त्यांत तुला संकोच वाटायचं कारण नाहीं. आपल्याला गुप्त विचार करायचा अधिकार नाहीं. अशी संवय लावल्यानं विचारांवर आपला सहज अंकुश चालतो. मनुष्यमात्र ईश्वराचा प्रतिनिधि आहे. ईश्वराला तर आपले सारे विचार कळतातच. पण तो आपल्याला प्रत्यक्ष दिसत नाहीं म्हणून आपण निश्चितपणें ओळखीत नाहीं कीं तो आपले विचार जाणतो. पण मनुष्याला त्याचा प्रतिनिधि म्हणून ओळखलं म्हणजे आपले विचार त्याला कळल्याचा आपल्याला संकोच वाटूं नये. आणि हा प्रतिनिधि प्रत्यक्ष आहे म्हणून आपल्या विचारावर आपला सहज ताबा राहातो. तूं ज्ञानपूर्वक आपला मनाइहुकूम मागें घ्यावास, असं मी इच्छितों. ... ...

( मला आशा होती कीं उजव्या हातानंच लिहूं शकेन; पण आतां दिसतं कीं मी तो हात वापरतां कामा नये. तेव्हां मनांत आहे तेवढं कदाचित् आतां लिहून होणार नाहीं. )

* * बहेनविषयीं तुझ्या मनाला येईल तें तूं लिहिलंस तरी हरकत नाहीं. तूं जें लिहिशील तें द्वेषभावानं लिहिणार नाहींस इतकं तिला ठाऊक आहेच. ...... तूं इस्पितळांतून घाईनं परत आलीस असं वाटतं. डॉक्टरच्या सूचनांचं पूर्ण पालन करीत असलीस तर हरकत येण्याचं कारण नाहीं. * * ची कथा दुःखद आहे. * * चा पक्ष समजल्यावांचून * * चा दोष काढावयास मी तयार नाहीं. * * स्वच्छ आहे. निर्दय नाहीं, स्वतःचा धर्म जाणणारा आहे. अधिक वेळ मिळाला असता तर अधिक समजावलं असतं. तुझ्यानं होईल तितकी सेवा तूं * * ची कर. ती जर एकटीच पडली असली तर त्यांत तिचा कमी दोष नाहीं. पण या दोषामुळें तिची सेवा करण्यांत आपलेकडून न्यूनता येतां कामा नये. तिच्यांत गुण देखील पुष्कळ आहेत.

* * ला कांहीं कळतच नाहीं. तो भोळा आणि खेळकर आहे. मीं त्याच्या बापाला लिहिलंच आहे कीं तुम्ही त्याला जवळ करा.

ता. १८।१२।३२ बापूचे आशीर्वाद.

यरवडा मंदिर

—*—

## पत्र...५४

चि.—

तुझं पत्र आल्यानं मी चिंतामुक्त झालों. चिंतासुद्धां कल्पनेचीच प्रजा आहे. पत्र आलं नाहीं म्हणून चिंता कां आणि आल्यामुळं मुक्ति कां? याचा खुलासा तूं विचारलास तर मला देतां येणार नाहीं किंवा द्यायचाच झाला तर म्हणेन की 'याचं नांव मोह!'

तूं मला खुळ्यासारखं कांहींतरी लिहितेस त्याचं मला वाईट वाटत नाहीं. पण मला तुझं चूक वाटेल तें मी तुला सांगितलं नाहीं तर मी तुझा हितेच्छु, सोबती, मित्र किंवा बाप राहणार नाहीं. मला हें विचित्र वाटतं कीं मी शुद्ध भावानं जें सांगतों त्याचा तुला राग कां यावा? तूं माझे आभार कां मानूं नयेस ? आपल्याविषयीं आपल्या सोबत्याच्या मनाला जें वाटतं तें त्यानं सांगितलं तर त्याचे आभार नये मानूं? मी तर हा धडा लहानपणापासून शिकलों आहे. इतकं तरी तूं माझ्याकडून शीक. माझी परीक्षा खोटी असेल तर मी कींव करण्याला लायक होईन. ती खरी ठरली तर तुझे उपकार होतील. तुला काय, दोन्हीकडून लाभच होईल. कारण तूं ज्याच्याशीं जोडली गेली आहेस त्याला जास्त चांगल्या रीतीनं ओळखूं शकशील. माझे दोष, माझा कच्चेपणा तुम्हीं सर्वांनीं पूर्ण-पणें जाणावा अशी माझी इच्छा आहे; आणि तें दाखविण्याचा माझा सदोदित प्रयत्न आहे. मी माझे विचारहि झांकूं इच्छीत नाहीं. ते लिहिण्याची माझ्यांत शक्ति आली तर मी ते सर्व लिहून काढीन. पण तें शक्य नाहीं हें मला माहीत आहे. विचाराच्या गतीला पुरी पडेल अशी जगांत एक तरी शक्ति आहे असा संभव मला तरी वाटत नाहीं. कोणी विचार मापण्याचं यंत्र शोधून काढलं तर समजेल. एवढं लिहितांनासुद्धां माझे विचार ब्रह्मांडाच्या पांच सात प्रदक्षिणा करून आले.

आपल्यामध्यें विष आहे कीं नाहीं याची परीक्षा आपल्याला करतां येईलच असा नियम नाहीं, हें तूं कबूल करशील. विष सांठवून ठेवण्याची इच्छा नसली तेवढ्यावरून विष नसेल असंहि नाहीं. तें आपल्यावर अनिच्छया स्वारी करतं. ज्याच्यांत क्रोध आहे त्याच्यांत विष आहेच ही गोष्ट कदाचित् तुला कबूल होणार नाहीं. तें तुला कबूल नसेल

तर विषाचा अर्थ आपण दोघें एकच करीत नाहीं. 'बा'नं मला पुष्कळ वेळां विषारी मानलं आहे असं मला आठवतं. मी तिचा आरोप कसा नाकारूं? मला माझ्या बोलण्यांत विष वाटलं नाहीं म्हणून काय झालं? तिला तें झोंबलं हें मला पुरेसं असलं पाहिजे. जो वचनानं पूर्णपणें सत्य व अहिंसामय आहे तो कधीं कोणाला दंश करणार नाहीं; प्रथम दंशासारखं वाटलं हें निराळं, पण तसा अनुभव घेणाराच मागाहून त्यांतील अमृताचा स्वीकार करतो.

तूं सगळ्या बाबतींत स्वतःची परीक्षिका बनूं नकोस, असं माझं सांगणं आहे. कदाचित् दुसरे जास्त चांगली परीक्षा करतील असंहि होईल. विषप्रकरण इथंच पुरं करतों.

आश्रम सोडण्याचा तुझा प्रश्न आज अप्रस्तुत आहे. मी सुटून आश्रमांत राहूं लागेन तेव्हांच हा प्रश्न निघूं शकतो असं तुझ्या पत्रा-वरून मी समजतों. नैतिक दृष्ट्या तर तेव्हांच हा प्रश्न निघाला तर निघूं शकेल. मला आश्रमांत राहतां येणार नाहीं तोंवर आश्रमाच्या दृष्टीनं मी जेलमध्यें असल्याप्रमाणंच म्हणतां येईल. आणि जेव्हां मी आश्रमाचा निरोप घेतला तेव्हांच जे तुम्ही मागें राहिलां होतां ते, मी परत येऊं शकेन तोंवर, बंधनांतच राहिलां. माझं हें मत यथार्थ असेल तर मी तिथं राहावयाला आल्यानंतर काय करणं योग्य आहे त्याचा विचार कर. तो आतां करणं हा शक्तीचा आणि वेळाचा अपव्यय आहे.

* * *

माझ्या जाळ्यांत मी कोणाला फसवूं इच्छीत नाहीं. माझेच सगळे पुतळे बनले तर माझी काय दशा होईल? असा प्रयत्नसुद्धां मी तरी फुकट समजतों. पण कदाचित् मी कुणाला फसविण्याचा प्रयत्न करीत असलों तरीसुद्धां तूं आत्मविश्वास कां गमावतेस? तूं सावधानच आहेस असा तुझीं पत्रं पुरावा देतात. हां, इतकं मात्र खरं कीं आपण फसूं अशी भीति तुला नेहमीं वाटत असते. हें वाईट लक्षण आहे. निश्चय केल्यानंतर भीति कसली? किंवा 'फसणं' या शब्दाचा अर्थ-सुद्धां आपण एकच करीत नसूं असंहि असूं शकेल.

ता. २२।१।३३ बापूचे आशीर्वाद.
यरवडा मंदिर

—*—

## पत्र....५५

चि.—

ही मौनवाराची सकाळ आहे. तीन वाजतां उठून तुझं पत्र हातीं घेतलं आहे. हें पत्र मला फार आवडलं आहे. मला पाहिजे असलेलं सगळं तूं दिलं आहेस. स्त्रियांच्याकडून जें मिळण्याची मी कल्पना केली आहे तें त्यांत आहे.--अवडंबर न करतां बारीक सारीक पण शास्त्रज्ञाला अत्यंत उपयोगी असें. अशा तटस्थ पत्रांतून मला ज्ञान मिळतं आणि तुला व इतरांना मी वाट दाखवूं शकतों.

खरोखरच आश्रम 'धर्मशाळा' आहे. 'धर्मशाळा' याचे दोन अर्थ: दान म्हणून दिलेलं निवासस्थान, आणि धर्म जाणण्याचं आणि जाणून त्याचं पालन करण्याचा प्रयत्न करण्याचं स्थान. यांतल्या दुसऱ्या अर्थी तो धर्मशाळा आहे. पण सत्य म्हणजेच धर्म; म्हणून सत्याला शोधून त्याप्रमाणं चालण्याचा प्रयत्न करण्याची म्हणजे सत्याचा आग्रह राखण्याची शाळा म्हणजे सत्याग्रह-आश्रम.

सत्य शोधतांना जीवमात्राशीं ऐक्य साधायचं असतं, म्हणून आश्रम हा एक विशाल बनत जाणारं कुटुंब आहे; असं असूनहि तो त्यापेक्षां जास्ती आहे; कारण तो धर्माच्या अनुषंगानं आहे. त्याच्यावर धर्म अवलंबून नाहीं. शिवाय तो शिक्षणालय आहे आणि असूनहि नाहीं. कारण तो कुटुंब आहे. त्यामुळं सामान्य शिक्षणाचे बाह्य नियम त्याला जड भरताप्रमाणं लागू पाडतां येणार नाहींत. नियमाचा आत्मा संभाळण्यासाठीं नियमाच्या देहाला-बाह्य स्वरूपाला—त्यागावं लागेल.

एक उदाहरण घेऊन त्याला ही गोष्ट कशी लागू पडते हें पाहूं. लक्ष्मीला वाढविण्यांत आपली—तुझी—परीक्षा आहे. कुटुंबांतील मुलांना आपण काय करूं? तुझ्या सख्या बहिणीला तूं काय करशील? * * लक्ष्मीनं नियम पाळले नाहींत, ती शिकली नाहीं याचा दोष माझा, नंतर तुझा. मधल्या लोकांना मी सोडून देतों......हें काम स्त्रीचंच आहे आणि त्यांतहि जिच्या हातीं तें सोपविलं असेल तिचं विशेषेंकरून. माझा अपराध पहिला, कारण मानलेला पिता मी आणि माताहि मीच.

मीं पितृधर्म पाळला पण मातृधर्म पाळला नाहीं. कारण मी हिंडत राहिलों. म्हणून मी लक्ष्मीला ठेवूनच कदाचित् घ्यायला नको होती. पण मी कोण? ईश्वराचा दास. लक्ष्मीला मी शोधायला गेलों नव्हतों. तिला ईश्वरानं पाठविलं. तो तिला संभाळील......

बा, नंतर संतोक, नंतर गंगाबेन व आतां तूं. तुम्हांपैकीं कोणींही तिला बोलावलं नव्हतं. काळाप्रमाणं आणि स्थितीप्रमाणं ती त्या त्या माणसांच्या हातीं गेली. आतां तुझ्या हातून होईल तें कर. विचारायचं असेल तेव्हां मला विचार. थकूं नकोस, निराश होऊं नकोस. श्रद्धा ठेव आणि तिच्यावर प्रेमाचा वर्षाव कर–शेवटीं उलगडा ईश्वर करील. ती हरिजनांची प्रतिनिधि म्हणून आपल्यापाशीं ऋण घ्यायला आली आहे. ती अर्धवट व आळशी आहे तर त्याचं पाप तुझ्यावर, माझ्यावर, सर्व सवर्ण हिंदूंवर आहे. करावं तसं भरावं......

दुसरीं मुलीमुलं येत आहेत त्यामुळं घाबरण्याचं कारण नाहीं. तीं जितके नियम पाळतील तितका लाभ. सहन होईल तोंवर त्यांना राहूं द्यावं, न होईल तेव्हां त्यांना रजा द्यावी. धर्मशाळेंत उतारू कांहीं स्थिर राहात नाहींत. कुटुंबी जनहि स्थिर राहात नाहींत. आश्रमाच्या चौकटींत बसतील ते राहातील, न बसतील ते जातील. त्याचा हर्षशोक कसला? शिवाय आज तर आपल्या हातून दुसरं कांहीं होणार नाहींच. शक्ति आहे तिथवर जे येतील आणि ज्यांच्यावर थोडा वेळहि दृष्टि ठरेल त्यांना ठेवून घ्यावं. पुष्कळसे आपणहूनच पळून जातील. आपले नियमच पुष्कळांना पळवून लावतील. येईल त्यानं मजुरी तर केलीच पाहिजे, पायखाने साफ केलेच पाहिजेत, अन्न औषध म्हणून खाल्लं पाहिजे. गूळहि मिळायचा नाहीं व गहूंहि पाहिजे तेव्हां मिळायचा नाहीं. आश्रम हा गरीब, कंगाल, भुकेनं मरणाऱ्या लोकांचा प्रतिनिधि आहे असं रोज सिद्ध करीत जाऊं तर निरंतर सुरक्षित आणि सुखी राहूं. म्हणून आश्रमांत रोज साधेपणा वाढला पाहिजे, रोज नियम–पालन कडकपणें झालं पाहिजे. अग्नि आपल्या स्वरूपांत राहिला तर त्याच्या सहवासांत टिकूं न शकणारे जीव त्याच्याजवळ राहूंच शकणार नाहींत. हा अग्नीचा दोष नव्हे तर गुण.

तसेंच आपण आपल्या स्वरूपानं राहात नाहीं; म्हणून साऱ्या उपाधि उत्पन्न होतात. साधेपणा इत्यादिऱ्या कडकपणाविषयीं मी लिहिलं तें आपल्यापुरतं आहे. आपल्यांत त्याचा अंश रोज वाढला पाहिजे. आपल्या रक्षणाचा मार्ग आपण आपल्या अंतरांत शोधून काढला आहे, बाहेर नव्हे, आणि आपण म्हणजे आश्रमांत ज्ञानपूर्वक रहाणारे; म्हणजे मी, तूं आणि प्रत्येक व्यक्ति. सगळे आश्रमवासी पाळतील तितकेच नियम मी पाळावे असं नाहीं. माझ्या हातून जास्तींत जास्त ज्याचं पालन होऊं शकेल तें मला केलंच पाहिजे. यांतच आश्रमाच्या चढतीची किल्ली आहे. इतरांच्या बाबतींत उदारता, स्वतःच्या बाबतींत कृपणता असं करीत असतांनासुद्धां आपण कसेबसे आपल्या बाबतींत कांहीं विवेकानं वागायला लागूं; कारण पुष्कळ वेळां इतरांच्या बाबतींत उदारता ती खरी उदारता नसते आणि स्वतःच्या बाबतींत कृपणता ती भासमात्र असण्याचा पुष्कळ संभव असतो.

मुलींच्या बाबतींत आदर्श अखंड ब्रह्मचर्याचा. त्यांतच आदर्श विवाह सामावला आहे. विवाहाचं शिक्षण द्यायची गरज नसते. तो संबंध देहधाऱ्याच्या स्वभावांतच आहे. या स्वभावाला कांहींतरी नियमांत ठेवण्याकरितां विवाहविधि रचला गेला. या स्वभावावर पूर्ण अंकुश म्हणजे ब्रह्मचर्य. जो पूर्ण अंकुश पाळील तो विवाहरूपी मर्यादित अंकुशाचं पालन करीलच; पण ज्याचा पहिल्यापासून विवाह हाच आदर्श आहे त्याला विवाहाचं स्वरूपच समजत नाहीं. विकारांच्यासाठीं शिक्षणाची काय जरूर ? ते आपोआपच बाहेर फुटत असतात, पण जी मुलगी ब्रह्मचारिणी आहे तिला घरकारभार चालविण्याचं ज्ञान मिळवावंच लागेल. बालसंगोपनाचं ज्ञान घ्यावंच लागेल. एकलकोंडी, गुहेंत जाऊन बसलेली—तिला कुमारिका नाहीं म्हणतां येणार. कुमारिका सगळ्या जगाशीं लग्न लावते, साऱ्या जगाची माता बनते, पुत्री बनते, साऱ्या जगाचा कारभार चालवायला लायक बनते. अशी कोणी कुमारिका आजवर उत्पन्न झाली नसेल कदाचित्, पण आदर्श म्हणजे हाच आहे. म्हणून शिक्षण सर्वांना एकच असणार. हें आतां, मला वाटतं, मी पुरेसं स्पष्ट केलं आहे.

त्या मुसलमान बाईविषयीं काय कर्तव्य आहे तें यांतूनच स्पष्ट झालं पाहिजे. मुलींच्या 'फिट' वगैरेचं मूळ आपली अपूर्णता आहे. आपण थोडे कां होईना जरूर तितके पुढें गेलों असूं तर तरुणांचं अस्तित्व भयंकर वाटणार नाहीं. पण जेथें धोका वाटेल तेथें तरुणांना रजा दिली पाहिजे. माझी सगळी भिस्त ** वर आहे. माझ्या कल्पनेचे ** तेच जर आश्रमाचे मंत्री असतील तर सर्व कांहीं कुशल आहे. त्यांच्याविषयींची माझी श्रद्धा वाढत चालली आहे. ते गळले तर दुसरे जुने आश्रमी आहेत ते पुढें येतील. मिळून सर्व कांहीं ठीक होईल. आश्रमांत माणसं पुष्कळ आहेत; पण आश्रमी थोडे आहेत म्हणून ताण पडतो. अशा पुष्कळशा अपूर्ण स्थितींत तुम्ही सारे होईल तेवढें करून मोकळे व्हा. आश्रम हा मला मापण्याचा गज आहे. मी जिथं असेन तिथं आश्रमाला घेऊन फिरतों. देह वाटेल तिथं असो, आत्मा तिथंच वास करीत आहे. त्यांत असलेले सारे दोष माझ्यामध्यें दृष्ट किंवा अदृष्ट रूपानं वास करीत असलेच पाहिजेत. तुम्हां सर्वांना ओळखण्यांत माझी चूक झाली असली तर तो दोष माझा नव्हे तर कुणाचा ? पण मलाच मी जर ओळखीत नसेन तर तुम्हां सर्वांचा न्यायाधीश कुठं होऊं ? नांव घ्यावयास बसतों तेव्हां दिसतं, कीं छगनलाल व मगनलाल यांच्याशिवाय इतरांना मी धुंडायला गेलों नव्हतों. त्यांना ईश्वरानं माझी परीक्षा करण्यासाठीं किंवा मला मदत करण्यासाठीं पाठविलं आहे.

ता. १३।२।३३ बापूचे आशीर्वाद.

---

## पत्र...५६

चि.—

आज आतां लांब पत्र नाहींच लिहीत ... ... एका इंग्रज सद्गृहस्थांना पाठविलं आहे; त्यांच्याशीं बरोबर परिचय करून घे. मला ते त्यागी दिसतात. त्यांना काय पाहिजे नको त्याची काळजी घे. ...... ... ... डॉक्टरांच्या विषयीं समजलों. एकदां त्यांच्या हातांत गेल्यावर त्यांच्याकडून जें मिळवायचं असेल तें मिळवून घेतलं पाहिजे, तसं केलं नाहीं तर त्यांना न्याय केल्यासारखं होणार नाहीं आणि आपली हानि होण्याचा संभव. कांहीं कांहीं कामं त्यांच्या हातून चांगलीं होतात हें कबूल केलं पाहिजे. बाकी दुर्लक्षामुळें, अज्ञानानं ते अनेक चुका करतात हें जगप्रसिद्धच आहे. त्यांची मदत घ्यायचीच नाहीं अशी कोणी प्रतिज्ञा घेतली तर त्याला मी अवश्य मान देईन. कोट्यवधी लोकांना तर त्यांची मदत मिळतच नाहीं. पण हा त्याग आश्रमाच्या शक्तिबाहेर आहे असं माझं मत आहे; म्हणून चांगल्या डॉक्टरांची मदत आपण घेतों.

ता. १९।२।३३ बापूचे आशीर्वाद.
यरवडा मंदिर

—*—

## पत्र....५७

चि.—

तूं पाठविलेल्या तुझ्या पेळूंतून मी ७५ नंबरापुढें जाऊं शकलों नाहीं. ७५ नं.चें सूत बरंच कच्चं गणलं जातं. वजन तूं दिलं आहेस त्याच्यावरूनच नंबर काढला आहे. इथल्या कांट्यावरून सूक्ष्म वजन निघत नाहीं. माझा हात जर बरोबर चालेल तर १०० नंबरापर्यंत जाऊं शकेन असं मला वाटतं.

कच्ची भाजी आणि खजूर यानं वजन उतरलंच पाहिजे. त्यांच्या बरोबर रोज २॥ तोळे ताजं कच्चं दूध घ्यावं. कच्च्या भाजींत टोमॅटो, मुळे, गाजर किंवा लेटिस अशा वस्तू असाव्यात. मीठ घेऊं नये. लिंबू दोनतीन पाण्याबरोबर किंवा खजुराबरोबर खावे. पाण्याबरोबरच वेगळे

पिळून पिणं कदाचित् अधिक बरं. त्यानं दांत आंबले तर घेऊं नयेत; लिंबाच्या रसांत सोडा टाकून घ्यावा.

आश्रमाच्या उणीवा जितक्या तूं दाखविशील तितक्या मी कबूल करीन. पण त्याचबरोबर जर तूं उपाय शोधून लिहिशील तर तें अधिक उपयोगी होईल. शोधतां आले नाहींत तरी तुझी टीका मला हवीच. माझी अक्कल जितकी चालेल तितकी मी चालवतों, मला इतकं माहीत आहे–आश्रमाची उणीव ती आश्रमाची नव्हे माझी आहे. कुंभारानं मडकं बेडौल घडवलं तर त्यांत दोष मडक्याचा कीं कुंभाराचा ? ही उपमा मी शंभरच्या शंभर टक्के खरी मानतों आणि त्यायोगें मला माझ्या मूढतेचं माप मिळतं. पण उणीवा असल्या तरीहि आश्रम मला आवडतो; कारण मी मला स्वतःला आवडत नाहींच असं म्हणायला मी तयार नाहीं. जितक्या अंशानं मी [ अहंपणा ] नाहीं तितक्या अंशानं मी मला आवडतो, आणि जितक्या अंशानें आहे त्याला नाहींसं करण्याचा मी निरंतर प्रयत्न करीत आहे.

ता. ६।३।३३ बापूचे आशीर्वाद.
यरवडा मंदिर.

—*—

## पत्र...५८

चि.—

तुझं सुंदर पत्र मिळालं. ही भावना तुझ्यामध्यें स्थिर होवो ......नासूत तर मी तुझ्यासाठीं ठेवायला सांगितलंच आहे ना ? तें ठेवीन. ती मागणी धिक्कारण्याची कांहींच जरूर नाहीं. माझ्याजवळ वाटेल तें मागण्याचा तुला अधिकार आहे. सुताची मागणी निर्मळ आहे. ज्या रीतीनं मागणी केली गेली तींत दोष होता तो तूं सुधरून घेतलास तेव्हां आतां सांगायचं कांहीं उरत नाहीं.

तूं पहातेसच कीं माझ्या आशांची राख होत चालली आहे. * * काय नी * * काय ? त्यांच्याविषयीं मला कसली ती शंका यायची नाहीं. त्यांच्यावर मीं आशांचा डोंगर रचला होता; पण त्याचा पाया होता वाळूचा. आश्रमाचा आदर्श कसा सिद्ध होणार ? कोणीं कोणावर टीका न करतां

स्वतंत्र प्रयत्न करील तर तो सिद्ध होईल. तूं असा प्रयत्न करतेस? ब्रह्मचर्याची माझी व्याख्या तुला माहीत आहे ना? ती पूर्ण करशील? तींत रागद्वेषाला अवकाशच नाहीं. मला तुझ्यावर टीका करायची नाहीं, तुला उपदेशहि करावयाचा नाहीं, मी केवळ माझी भिक्षा मागत आहे. हें भिक्षापात्र भरलेलं नाहीं तोंवर आश्रम हा आश्रम होऊं शकणार नाहीं. ... ...

...तेथें आश्रमांत पुष्कळ महाराष्ट्रीय भगिनी आहेत. जमनालालजीनीं त्यांना तिथं पाठविलं आहे असं ते म्हणत होते. त्यांपैकीं एखादीला तरी तूं त्यांच्या महिलाश्रमासाठीं तयार केलं पाहिजे, असा जमनालालजींचा तुला संदेश आहे. अशी एखादी आहे का? ती पोक्त असली पाहिजे. मला लिही.

'श्वेत पत्रा '[ White Paper ]विषयीं मला कांहीं सांगतां येणार नाहीं. इथं आहे तोंवर तें माझं क्षेत्रही नव्हे म्हणून मीं तें वाचलेलं पण नाहीं.

ता. २६।३।३३ बापूचे आशीर्वाद.

---

## पत्र...५९

चि.—

* * विषयीं तूं लिहिलंस तें अर्धसत्य आहे. चुका सर्वांच्या हातून होतात, त्याचं दुःख मानूं नये. पण चूक करणाऱ्यानं चूक लपवून ठेवायची नी ती अनिच्छेनं उघड झालीच तर मग आपला अयोग्य असा बचाव करायला लागायचं, असं झालं म्हणजे दुःख वाटलंच पाहिजे. जर दुःख वाटलं नाहीं तर अशा घटनांना पायबंद घालण्याचा उपायच मिळायचा नाहीं. अशा गोष्टी घडायच्याच; तेव्हां त्या थांबवण्याचा उपाय करायचाच कशाला? असा विचार केला तर समाजाचा नाशच होईल, म्हणून या गोष्टी थांबवण्यासाठीं उपाययोजना केलीच पाहिजे. असे उपाय आघात होतात तेव्हांच करावे. जो मिथ्या दुःख

करतो, क्रोध करतो तो बरोबर नाहीं असं म्हणतां येईल; आणि तुलाहि, मला वाटतं, एवढंच म्हणायचं आहे. याहून अधिक कांहीं तुला म्हणायचं असेल तर ती चूक आहे, याविषयीं मला शंका नाहीं. दुःख, आघात वगैरे शब्दांऐवजीं दुसरे शब्द मिळाले तर ते मात्र मी स्वीकारीन; पण तुझ्या पत्रांत कुठेंतरी मोह दडलेला आहे. 'मोह' शब्द बरोबर वापरला आहे कीं नाहीं हें मला नाहीं सांगतां येणार. माझा आशय तुला समजला म्हणजे बस् ... ... ...

तुझ्याकडून मला हवी सरलता, मृदुता, नम्रता, धीर, सहनशीलता, उदारता. तूं आकाशांतून उतरशील तेव्हांच मला हें मिळणार. 'आपण कांहींच नाहीं' असं तूं केव्हां मानूं लागशील? रोज पृथ्वीमातेला वंदन करायचं व रोज तिला लाथ मारायची हें काय? जर खरोखरच आपल्या या [1]प्रार्थनेंत सत्य असेल तर आपण रजःकण बनलें पाहिजे व जगाची लाथ सहन करायला शिकलं पाहिजे; म्हणजे धरणीमातेला आपल्या चरणाचा स्पर्श होणार नाहीं. कारण त्यामुळें जिवंत असतांनाच आपण राख होऊन जातों. 'दुई की धूल उडाता जा.'

परचुरे शास्त्र्यांच्या मुलाला हाताशीं धरलंस हें ठीक केलंस ......

तुझे पेळू अजून चालतात. त्यांत गांठी राहिल्या आहेत. तो दोष तुझा नव्हे. तो कांहीं अंशीं पिंजणीचा आहे आणि कांहीं कापसाचा आहे. जास्ती पिंजलं असतं तर कापसाचे तंतु कमजोर झाले असते. दुसरे पेळू फार बारीक सूत देत नाहींत; पण त्यांत गांठी कमी आहेत.

ता. २।४।३२ बापूचे आशीर्वाद.
यरवडा मंदिर.

---

१. समुद्रवसने देवी पर्वतस्तनमण्डले ।
विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे ॥
[ प्रातःप्रार्थना, आश्रम भजनावली. ]

—*—

## पत्र...६०

चि.—

तुझं पत्र मिळालं. लिहिलंस तर लिहिलंस–चांगलं आहे. आज सविस्तर लिहिण्याजोगं नाहीं. तुझं पत्र चांगलं आहे तरी त्यांत ब्रह्मचारिणीला न शोभण्यासारखा अभिमान आहे. नारदाच्या कथेची आठवण ठेव. नारदानं ब्रह्मचर्याचा अभिमान करतांच तो पडला. ब्रह्मचाऱ्याचा आधार थेट ईश्वरावर असतो, म्हणून त्यानं नम्र असावं. स्वतःचा विश्वास धरूं नये. जो जन्मापासून निर्विकार आहे तो मनुष्य नाहीं. तो एक तर परमेश्वर आहे किंवा पुरुष वा स्त्री–शक्ति रहित आहे–म्हणजेच अपूर्ण आहे–रोगी आहे. परमेश्वराला अभिमान कशाचा ? दगडाला काय दगडपणाचा अभिमान असतो ? रोग्याला रोगाचा अभिमान नसावा. स्त्रीपुरुषांना आपले विकार ताब्यांत ठेवण्याची शक्ति कमावितां येते आणि त्यामुळें संग्रहित झालेल्या शक्तीचा त्यांना सदुपयोग करतां येतो. पण ज्याला या शक्तीचा अभिमान उत्पन्न झाला त्याच्या शक्तीचा त्याच क्षणीं नाश होतो. तुझ्यांत असलेल्या ब्रह्मचर्याचा किती क्षय होत आहे हें तुला काय माहित ? तुझ्या ब्रह्मचर्यांत न्यूनता अवश्य आहेच. तुझ्यांत स्वाभाविक काय आहे ? तुला विकार माहीतच नसतील तर काय तूं देवी आहेस ? देवीचीं लक्षणं निराळींच असतात. तूं देवी नाहींस. तुला रोग आहे असंही मला वाटत नाहीं. तूं स्वतःची तपासणी कर आणि मला लिही.

ता. २।४।३३ बापूचे आशीर्वाद.

## पत्र....६१

चि.—

तुझं पत्र मिळालं. मी तुला धोक्याची सूचना दिली इतकं बस्स आहे. तुला वाटतं तुझीं पत्रं मी बरोबर वाचीत नाहीं. पण तें बरोबर नाहीं. तुझ्या लिहिण्याचा भावार्थ मी बरोबर समजलों होतों. तुझ्या-एवढ्या आत्मविश्वासांतच अभिमान, किंवा गर्व म्हण वाटल्यास, भरलेला आहे. तुझा अभिमान तुझ्या भाषेंतच दिसतो. पण त्यावरून मी कांहीं अशी इच्छा करीत नाहीं कीं तूं आपल्या विचारांना लपवावेंस किंवा नीट नीटके बनवून माझ्यापुढें मांडावेस. जसे येतात तसेच तूं पाठवतेस हें मला आवडतं. तूं जशी अंतर्बाह्य आहेस तशी मला पत्रांतून पाहूं देतेस याला मी तुझा गुण समजतों. तूं कृत्रिम झालीस तर मी लाचार होईन आणि तुला कांहींही सांगूं शकणार नाहीं.

त्रासाची मला संवय झाली आहे. ईश्वर माझी परीक्षा अनेक रीतींनीं घेत आहे. संवय झाल्यावांचून मनुष्य घडणार कसा? तूं कर्तव्य-पालन करीत नाहींस इतकं मला जरूर भासतं. पहिल्यापासूनच घशाला विश्रांति देण्यासंबंधीं मी लिहिलं होतं; शरीरालाही आराम दे असं लिहिलं होतं; पण दोन्ही हुकमांचा तूं अनादर करीत आहेस. हे हुकूम तुला देण्यांत स्वार्थ तुझा नाहीं, आश्रमाचा आहे. तुझा घसा कायमचा बिघडला, शरीराची हेळसांड झाली, तर नुकसान तुझं होईल त्यापेक्षां आश्रमाचं जास्त होईल. हें साधं सत्य तुला समजतं का? जर समजत असेल तर नम्र होऊन शरीर चांगलं ठेवण्यासाठीं जें सांगण्यांत येईल तें करीत जा. तीच गोष्ट क्रोधाची. तीही एक व्याधि आहे. तिलाही दूर कर. अधीरेपणाही दूर कर.

ता. १०।४।३३ बापूचे आशीर्वाद.

—*—

## पत्र...६२

चि.—

......रजःकण होण्याचा धडा मला नाहीं देतां येणार. ईश्वराला जाणलं म्हणजे मनुष्य आपोआपच रजःकण होऊन जातो. तें साध्य आपल्या मार्गानं यायचं असेल तेव्हां येईल.

......तुला वाटतं कीं माझ्या आसपास तुझ्याविरुद्ध वातावरण जमलेलं आहे. पण तें चूक आहे...... * * नीं तुझ्याविषयीं सांगितलेलं नवं नाहीं. ते तुझी किंमत जाणतात पण म्हणतात कीं तूं तुझ्या जिभेला ताब्यांत ठेवणार नाहींस तोंवर जबाबदारी टाकूं नये. हें त्यांचं जुनं सांगणं आहे. मी माझ्या तीन्ही सोबत्यांच्या* बरोबर क्वचित्च बोलतों हें तूं लक्षांत ठेव. खातांना किंवा फिरतांना थोड्या विनोदाशिवाय दुसरं कांहीं होऊंच शकत नाहीं.प्रसंगाखेरीज क्वचित्च एखाद्या व्यक्तीविषयीं आम्ही चर्चा करीत असतों. माझ्या कामांतून मला चर्चा करण्याला फुरसदहि राहात नाहीं. फुकट चर्चा करून माझ्या शक्तीचा मी व्ययहि करूं इच्छीत नाहीं......तुझ्याविरुद्ध वातावरण माझ्या आसपासहि नाहीं व माझ्या मनांतहि नाहीं. मी तुला कडक ठपके देतों तें तुला मी मुलगी मानतों व तूं पूर्ण व्हावेंस अशी इच्छा आहे म्हणून. तूं माझ्या टीकेनं दुःखी कां व्हावंस? त्यांतून जें घेण्याजोगें असेल तें घेऊन बाकी विसरून जावं. कारण माझ्या टीकेंत कदाचित् अज्ञान असेल, तुझी भाषा कदाचित् मला समजली नसेल, असंहि असण्याचा पुष्कळ संभव आहे.

एकच वस्तु निरनिराळीं माणसं निरनिराळ्या रीतीनं पाहातात हें बरोबर आहे. एकाच शक्तीचा उपयोग वेगवेगळ्या रीतीनं होतो हें आपण रोज पहात असतों.

(स्त्रियांच्या) मासिक धर्माच्या वेळीं कोणालाहि नियत कार्य सोपूं नये असं मला वाटतं खरं. त्याचं दुःख केव्हां उत्पन्न होईल हें दुसऱ्या कोणाला कळूं शकणार नाहीं. त्या वेळीं स्त्रीवर कोणत्याहि प्रकारचा बाह्य बोजा

---

* सरदार वल्लभभाई, महादेव देसाई, व छगनलाल जोशी.

नसावा हें इष्ट आहे. आपल्या मनानं त्यांना जें काम करावंसं वाटेल तें त्यांनीं सुखानं करावं. कित्येक स्त्रियांना मासिक धर्माचा परिणाम जाणवतच नाहीं आणि त्या आपलं काम चालूंच ठेवतात. कित्येकींना असह्य वेदना होतात. कित्येकींना वेदना होत नाहींत; पण शरीर काम करण्याजोगं राहात नाहीं. जिला या धर्माचा सदुपयोग करतां येतो ती दर महिन्याला नवी शक्ति मिळविते. हे तीन किंवा चार दिवस नवी शक्ति मिळविण्याचे असतात. आणि ती मिळविण्याकरितां स्त्रीला कसल्याहि प्रकारच्या जबाबदारींतून मुक्त ठेवणं इष्ट आहे. तिला निजावंसं वाटलं तर तसं करण्याची तिला मुभा असली पाहिजे. न समजल्यामुळं कित्येक स्त्रिया त्या वेळींसुद्धां धांवपळ सोडीत नाहींत, त्या ज्ञानहीन आहेत. त्यांना समजावून देण्याची जरूर आहे......

ता. १२।४।३३ बापूचे आशीर्वाद.

—※—

## पत्र ६३.

चि.—

तूं त्या मुलीला कां बरं मारलंस ? शिक्षिकेनं शिष्यांची माफी मागितली तर तिचा स्वाभिमान कांहीं गमावल्यासारखा होत नाहीं, उलट तो वाढतो. शिष्यहि तिला अधिक चाहूं लागतात. म्हणन तूं जर माफी मागितली नसशील आणि आपण मारलं हा जर तुला दोष वाटत असेल तर त्या मुलीची तूं माफी माग. त्यांत तुझं श्रेयच आहे......

काम करण्यांत उतावीळपणा कशाला ? जेवढं आस्ते आस्ते करीत जाशील तेवढ्यांत संतुष्ट राहिल्यानं कामाची गति आणि स्वच्छता वाढते. याचा मला हजार वेळां अनुभव आला आहे.

ता. १७।४।३३ बापूचे आशीर्वाद.

—※—

# पत्र...६४

चि.—

उजवा हात चांगलाच थकला; म्हणून जी कांहीं शक्ति असेल ती 'हरिजन'च्या लेखासाठीं सांठवून ठेवण्याची इच्छा आहे. मला वाटतं कीं, संपूर्ण विश्रांति घ्यायची जरूर पडणार नाहीं.

.........** थोडा त्रास देईल. जर ती सुधरायची असली तर फक्त सहन करण्यानं व प्रेमानंच सुधरेल. तिला आई नसल्याची जाणीव भासूं देऊं नये. .........तुझा धीर सुटूं देऊं नकोस. सुधारकाचं–सेवकाचं–धीरावांचून क्षणभरहि चालायचं नाहीं हें घोकून ठेव. तुझ्या भिंतीवर लिहून ठेव, त्याचा ताईत करून गळ्यांत घाल.

तिकडून परवानगी आली म्हणजे नीला नागिणी तेथें थोड्याच दिवसांत येईल. तिनं उघड उघड व्यभिचार केला आहे, कर्ज करून ठेवलीं आहेत, खोटं बोलली आहे. आज ती साध्वी होऊन बसली आहे. मला त्यांत कृत्रिमता वाटली नाहीं. तिला आपल्या दोषांचं दर्शन झाल्यानंतर जितकं मी तिला सांगितलं तितकं तिनं केलेलं आहे. जर तिला तिच्या शुभ निश्चयाप्रमाणंराहाण्याची संधि कुठं मिळायची असली तर ती तिथंच ( आश्रमांतच ) मिळेल. दुसरीकडे कुठंहि ती सुकून जाईल किंवा पुनः स्वच्छंदी होईल. तिच्यांत शक्ति पुष्कळ आहे. तिला माहिती पुष्कळ आहे. महाभारताशीं तिचा चांगला परिचय आहे. ती आली तर तिची ओळख करून घे, इतर भगिनींना तिची ओळख करून दे. तिच्या भूतकाळच्या गोष्टी तिला काढायला लावूं नकोस. ती त्या काढील, पण तिच्या गोष्टी काढण्याकाढविण्यांत दोष आहे. विषयाचं स्मरण हानिकर आहे. आपल्याविषयीं भूतकाळासंबंधींच्या गोष्टी ती गोडीनं सांगायला लागली तर समजावं कीं तिच्यांतून त्याचं उच्चाटण झालेलं नाहीं. तिला आपली धाकटी बहीण समजून प्रेमपूर्वक थांबवीत जा. तिच्या जीवनाविषयीं जें कांहीं विचारायचं तें मला विचार. तिला आश्रमांत पाठविण्याची वेळ येईल तेव्हां विस्तारानं लिहिण्यास मला वेळ मिळणार नाहीं म्हणून आजच इतकं लिहिलं आहे. तिचा मुलगा फार चांगला आहे.

ता. २३।४।३३ —*— बापू.

## पत्र....६५

चि.—

तुला एक पत्र मध्यंतरीं लिहिलंच आहे. वातावरण पुष्कळसं अस्थिर होत चाललं आहे. त्यांत तुझे विचार वेळोवेळीं येत असतात. तुला शिकवण देण्याची इच्छा होत नाहीं आणि तुझ्याबरोबर वादांत उतरण्याची हिम्मतहि राहिलेली नाहीं. माझी स्थिति गजेंद्रासारखी आहे. थोडीशी सोंड तेवढी बाकी उरली आहे. ती पाण्यांत बुडली कीं दम कोंडेल. म्हणून ज्यांच्याविषयीं आज मनांत विचार येतात त्यांच्या· विषयीं प्रार्थनाच करणं उरतं. पण प्रार्थना कुणाला करूं ? जो सदोदित जागृत आहे, ज्याला एवढासासुद्धां आळस नाहीं, जो नखापेक्षांहि जवळ आहे, जो सर्व कांहीं ऐकत आहे, सर्व कांहीं ज्याला दिसतं, तो तर माझ्या प्रार्थना जाणतोच आहे.

म्हणून त्याच्याच आधारावर सोंड पाण्याच्या बाहेर थोडीशी राहिली आहे. त्याला जसं करायचं असेल तसं करील, ठेवायचं असेल तसं ठेवील.

ता. २६।४।३३ बापू.

—*—

## पत्र....६६

चि.—

माझा उपवास सर्व आश्रमवासीयांच्यासाठीं होईल अर्थात् तुझ्यासाठींहि होईल, हें जाणून तुझे रोग असतील ते सर्व काढून टाक.

तुझे प्रश्न तुझ्याजवळ आहेत असं समजून त्यांचीं उत्तरंच फक्त थोडक्यांत देत आहे. आज मला वेळेची फार तंगी आहे.

(१) लहान मोठे कोणीहि असोत त्यांना नम्रतापूर्वक समजावितां आलं नाहीं तर मौन धारण करून हृदयापासून त्यांच्यासाठीं प्रार्थना करावी. असं केल्यानं उतावीळपणा जाईल.

(२) या ठिकाणीं 'जरूरी'ची व्याख्या समजून घेतली पाहिजे. मी श्लोक सांगत आहे आणि मला साप दिसला, त्याला धरण्याची 'जरूर आहे तर मला श्लोक सांगण्याच्या नियमाचा भंग केला पाहिजे. मला

त्याच वेळीं शौचाला लागली तरीहि त्याचा भंग केला पाहिजे. मला तहान लागली तर ती जरूर दाबून टाकावी व श्लोक चालवावे. आणि जर गळयाला कांहीं तरी झालं असतांनादेखील श्लोक चालू ठेविले तर तसं करण्यांत वेडेपणापेक्षांदेखील अधिक गंभीर दोष होईल.

(३) सत्याच्या शोधांत जो लोकाचार अडथळा करील तो तोडून टाकावा.

(४) जर तुला माझ्याविषयीं अनन्य श्रद्धा असेल तर तूं समजावेंस कीं तूं ज्याला अंतःप्रेरणा समजतेस त्यांत चूक असण्याचा संभव आहे. पण अंतःप्रेरणा श्रद्धेच्याहि पुढें जातेशी प्रत्यक्ष वाटली तर वाटेल तें संकट ओढवलं तरी तिलाच मान द्यावा.

(५) याचं एकांगीं उत्तर नसणारच.

(६) हा प्रश्न मला समजला नाहीं.

(७) स्वतःला एखादा कोणी खोटा किंवा आळशी आहे असं वारंवार दिसलं असेल तर त्यानंतर तसा तो असल्याचा संशय सत्यार्थी मनुष्याच्या मनांतहि येऊं शकेल. पण सत्यार्थी मनुष्य संशय असूनसुद्धां आळस किंवा खोटेपणा करणाऱ्यावर प्रेम ठेवतो आणि त्याला संधि देत राहातो.

(८) यासंबंधीं सर्वांच्यासाठीं एकच नियम असूं शकणार नाहीं. प्रत्येकाच्या मनावर अवलंबून आहे. पण कलेचा बहाणा करून साधेपणाचा त्याग करूं नये.

(९) उलट उत्तर-प्रत्युत्तर करणंच मुळीं निंद्य आहे. 'तूंहि तसाच' असं म्हणणं म्हणजे हलकेपणा आहे.

(१०) अहिंसेच्या गर्भांतच ही वस्तु आहे.

तुझ्याजवळ तुझ्या प्रश्नांची नक्कल करून ठेवण्यास वेळ नसेल असं समजून ती या पत्राबरोबरच पाठवीत आहे.

दोन भगिनींना पाठवतों तर खरा. पुष्कळ संकोच वाटतो; पण पाठवण्याचा धर्म आहे असं समजून पाठवीत आहे. आशा आहे कीं त्या तुझं काम वाढवणार नाहींत; पण त्या तुझ्या उपयोगीं पडतील. त्यांना हिंदी शिकण्याची सोय करून दे.

सुशीलेनें या वेळची तिची सुटी आश्रमांत घालवावी अशी माझी इच्छा आहे. तुम्हां दोघींना त्यायोगानं आराम मिळण्याचा संभव आहे. उद्योगाचा फेरबदल हा आराम आहे, ही इंग्रजी म्हण तुला ठाऊक आहे ना ? यांत पुष्कळ सत्य आहे.

लिहितां लिहितां सहज सुचलेला हा विचार आहे असं समजावं. सुशीलेनं निराळाच कांहीं कार्यक्रम ठरविला असेल तर तो माझ्या इच्छेसाठीं तोडावा असं मुळींच नाहीं.

ता. १।५।३३ बापू.

**पुरवणी—**

## प्रश्न.

(१) आपल्यापेक्षां मोठी, आपल्या बरोबरीची किंवा आपल्यापेक्षां लहान कोणीहि व्यक्ति खूप गोंगाट करीत असेल, उलट बोलत असेल, अपशब्द बोलत असेल, समजाविलं तरी समजून घेत नसेल आणि या गोष्टींचा परिणाम इतरांवर वाईट होत असेल, काम आणि वेळ बिघडत असेल, तर माणसानं काय करावं ? आपला Impatience ( अधीरपणा ) कसा जिंकावा ?

(२) आपलं कर्तव्य करीत असतां कांहीं जरूरीमुळें आश्रमनियमाचा किंवा शिस्तीचा भंग झाला, तर त्याचा परिणाम इतरांवर काय होईल ? वाईट परिणाम होण्यासारखा असला तर आपल्या जरूरीच्या गोष्टीचा त्याग केला पाहिजे कीं नको ?

(३) लोकाचाराला सत्याग्रहाच्या मार्गांत कुठवर किंमत द्यावी ?

(४) तुमच्यासारख्या पुण्यश्लोक माणसांत आणि माझ्यांत अमुक बाबतींत मतभेद असला आणि माझं मत मला आंतून खरंच वाटत असेल आणि त्या बाबतींत तुमच्या संस्थेच्या आचारधर्माची हरकत येत असेल तर सत्याग्रही या नात्यानं मी काय करणं योग्य आहे ?

(५) संस्थेमुळें व्यक्ति प्रिय असावी कीं व्यक्तीमुळें संस्था प्रिय असावी ?

(६) दुसऱ्याविषयीं आपल्या मनांत वाईट विचार येतात तर ते जाणण्याची मर्यादा काय ?

(७) एकाद्याचा खोटेपणा, आळस किंवा स्वार्थीपणा आपल्याला पुष्कळ प्रसंगांतून कळून आल्यामुळें, त्या व्यक्तीविषयीं पुनः एखाद्या बाबतींत आपल्याला संशय आला तर सत्याग्रहीला तें शोभेल कीं नाहीं?

(८) साधेपणानं जीवन काढलं तरी त्याची मर्यादा कुठवर असूं शकेल? साडीवर वेलबुट्टी छापणं, फॅशनेबल पोलकीं घालणं, डोक्यांत किंवा गळ्यांत फुलं घालणं, नक्षीदार चप्पल वापरणं इ. इ. गोष्टींत कलाभिज्ञता समजायची कीं आश्रमाच्या तत्त्वाचा खून झाला असं समजायचं ?

(९) आश्रमांत एक मनुष्य दुसऱ्यावर टीका करतो आणि तोच दोष तो स्वतः करीत असेल किंवा त्यानं केला असेल तर जिच्यावर टीका केली त्या व्यक्तीनं टीकाकाराला टोमणे मारले किंवा तिचे दोष दाखविले तर ते निंद्य किंवा हिंसा म्हणतां येईल ?

(१०) आश्रमांत येणारे सर्व लोक वेगवेगळे हेतू मनांत धरून येतात. तर प्रत्येकाच्या इथल्या जीवनाकडे आपल्या दृष्टीनं वेगळ्या वेगळ्या रीतीनं पाहिलं पाहिजे कीं कसं?

---*---

## पत्र....६७

चि.—

तुझं पत्र व माझं पत्र यांची वाटेंत टक्कर झालेली दिसते. मी कालच पत्र लिहिलं व तूं देखील कालच. आपणा सर्वांचीं वर्षं एकामागून एक वहात चाललीं आहेत. आपण लहान होत आहोंत असं म्हणणं कदाचित् जास्त बरोबर असेल, नाहीं? जितकीं वर्षं जातात तितकीं आयुष्यांतून कमी झालीं; तितक्या अंशांनीं आपण लहान झालों असं म्हणायचं!' यांतून मला तात्पर्य हें काढायचं आहे कीं आपण अधिकाधिक सावधान झालं पाहिजे. आपल्याकडे सोपवलेलं भांडवल कमी कमी होत चाललं आहे. जें बाकी आहे त्याचा पूर्ण उपयोग करायला शिकूं या. तुझ्या बाबतींत तेंच सिद्ध होवो अशी माझी इच्छा आहे.

ता. १।७।३२ बापू.

---*---

## पत्र....६८

चि.—

... ... आज लिहितों आहे त्याचीं दोन कारणें; एक तर *** प्रेरणा करते आहे व दुसरं म्हणजे तिनं दिलेली बातमी. माझा निर्णय* ऐकून तीन दिवस तूं रडलीस ? मला वाटत होतं कीं हा निर्णय ऐकून तुझ्यावर आघात होईल; पण त्याचबरोबर तूं नाचूं लागशील आणि गाऊं लागशील. कारण त्याचं रहस्य, महत्त्व आणि शुद्ध सत्य तुला समजल्याशिवाय राहाणार नाहीं. अनुभवानें त्याची योग्यता रोजच्या रोज सिद्ध होत आहे. यांत सहकाऱ्यांच्या अयोग्यतेचा प्रश्न नाहीं. अयोग्य कोणीच निघाले नाहींत; पण जें प्रगट झालं तें सूचक होतं. त्यानं मला हा निर्णय करण्याची प्रेरणा दिली. वेळ येतांच—आणि वेळ येईलच—हेच सहकारी लढतील. मुद्दा अधिक शक्ति मिळविण्याचा, अधिक संयमाच्या आवश्यकतेचा होता. माझीं हत्यारें आज उपयोगीं पडलीं नाहींत म्हणून कांहीं तीं अयोग्य नाहींत. त्यांना अधिक पाणी देण्याची जरूरी असेल. त्यांचा उपयोग अवेळीं झाला असेल. याहून अधिक समजावून देतां येणार नाहीं. तूं सुटलीस म्हणजे सरळ मला शोधून काढ आणि समजलं नसेल तर पोट भरून माझ्याबरोबर भांडून घे व समजावून घे. या निर्णयाच्या पाठीमागें सर्वांची कसोटी आहे. माझी पण त्यांत कसोटी आहे. पण ईश्वरकृपेनें आपण सारे तिच्यांतून पसार होऊं.

हें पत्र पाटण्याला जातांना आगगाडींत लिहिलं आहे. पण E. I. रेल्वे नेहमीं इतकी सरळ चालते कीं तिच्यामध्यें लिहितांना अडचण पडत नाहीं.

ता. १७।५।३४ बापूचे आशीर्वाद.

—*—

* सत्याग्रहाची चळवळ मागें खेंचण्याचा निर्णय.

## पत्र....६९

चि.—

तुझं पत्र मिळालं. आजहि पहांटेच्या प्रार्थनेपूर्वी हें पत्र लिहीत आहें. हें कांहीं तुझ्यावर मेहेरबानी म्हणून लिहीत नाहीं; एवढंच दाखवण्यासाठीं लिहिलं आहे कीं आतां नियमाप्रमाणें पहांटे तीन वाजतां उठून मी कामाला लागतों. सबंध दिवसांत पत्र लिहिण्याला फुरसत फार कमी मिळते. मला कोणी उठवीत नाहीं व अलार्म पण नाहीं. बहुतेक आपोआपच उठतों. इथं निजण्यासाठीं गच्ची आहे.

तूं व्यवसाय वाढविते आहेस असं दिसतं. कमी करावं पण पक्कं करावं असा माझा सल्ला आहे. खेडेगांवच्या कामांत उतावळेपणा उपयोगाचा नाहीं. ‘ हरिजन ’ किंवा ‘ हरिजनबंधु ’ नियमपूर्वक वाचीत जा. त्यांत हल्लीं इतर विषयांचीसुद्धां चर्चा असते......

...गीताईची प्रत हवी असल्यास पाठवीन. माझ्या *निवेदनावरून कांहीं विचार सुचले असल्यास लिही......

ता. २०।९।३४ बापूचे आशीर्वाद
वर्धा.

—*—

* महात्माजींनीं कॉंग्रेसमधून अंग काढून घेतलें त्यावेळचें निवेदन.

## पत्र....७०

चि.—

तुझं पत्र वर्णनानं भरलेलं आहे. काम चांगलं चाललेलं आहे असं दिसतं. असाच हिशेब पाठवीत जा.

खेडेगांवांत काम करण्यासंबंधानें 'हरिजन'मध्यें लिहिलं आहे तें पहा. सर्व ठिकाणीं एकच पद्धतीनं काम चालणार नाहीं. हें न नांगरलेलं क्षेत्र आहे. म्हणून कामामध्यें पुष्कळ विविधता असण्याचा संभव आहे. माझ्यापाशीं जी योजना आहे आणि जी मीं 'हरिजन'मध्यें दिलेली आहे ती फक्त एकच प्रकारची आहे; पण तिचा घोट कोणाला पाजूं? तुलाच ना? तूं आतां कितीजणांना पाजतेस तें पाहूंया. तुझ्या अडचणीचं मला आश्चर्य वाटत नाहीं. माझा सल्ला आहे कीं तूं कॉंग्रेसचं नांवसुद्धां घेऊं नयेस. सविनय भंगाचं तर बाजूलाच राहिलं. आज तूं जें जें काम करतेस त्याचे गुणदोष ग्रामवासीयांच्या पुढें मांडावे. कॉंग्रेसच्या कामाशिवायचं नाम अनवश्यक आहे. जो 'कृष्ण कृष्ण' म्हणतो तो त्याचा पुजारी नव्हे. जो त्याचं काम करतो तोच त्याचा पुजारी. 'रोटी रोटी' म्हटल्यानें पोट भरत नाहीं; ती खाल्ल्यानंच भरतं.

तुला वाटलं तें बरोबर आहे. गांव सोडण्याचा जर हुकूम झाला तर त्याचं आनंदानं पालन करायचं आहे. न आवडणाऱ्या कायद्याचंसुद्धां जो इच्छापूर्वक पालन करतो त्यालाच केव्हां केव्हां कायदेभंग करण्याचा अधिकार मिळतो. ही गोष्ट थोड्यांच्याच लक्ष्यांत येते.

माझं कॉंग्रेसमध्यें येणं होईलच असं मानण्याचं कारण नाहीं. मनांत पुष्कळ गोष्टी शिजताहेत. त्या साऱ्या लिहायला वेळ मिळत नाहीं. जें होईल तें पहात रहा. तुझं कार्य आखलं गेलं आहे तें बस्स आहे.

अब्दुल सलामला लिहिलेलं तुझं [ उर्दू ] पत्र चांगलं आहे असं म्हणतां येईल.........

ता. ३।९।३४ — बापूचे आशीर्वाद.

वर्धा, पहांटे ३ वाजतां

—*—

## पत्र....७१

चि.—

तुझं पत्र मिळालं. तुझी उदारता अपरंपार आहे. मी नाहीं लिहिलं तरी चालेल म्हणतेस! पण या उदारतेचा उपयोग करण्याची आज तरी मला इच्छा नाहीं. तरी तुला धन्यवाद दिलेच पाहिजेत.

* * *

आश्रमाची कोणीं निंदा केली तर त्याचं मला मुळींच दुःख वाटत नाहीं. पण मीं आश्रम कां भस्म केला त्याचं कारण मीं सांगितलेलें कोणीं मानलं नाहीं म्हणजे त्याचं मला दुःख होतं खरं. मी ज्याला पवित्र मानीत नाहीं त्याचं बलिदान काय करणार? ही गोष्ट तूं बरोबर समजावून दिली असशील. पण आपलं जें होईल तेंच प्रसन्न चित्तानं सहन करायचं आहे—करूं या.

* * *

माझं गाडं ठीक चाललं आहे. शक्ति येत आहे. लिहीत जा.

ता. २१।९।३४ —*— बापूचे आशीर्वाद.

## पत्र...७२

चि.—

तूं माझं निवेदन पूर्ण समजूं शकलीस याचा मला संतोष वाटतो.

तुझ्या कामाचा विकास होतो आहेसं दिसतं! विस्तार वाढवूं नकोस. हातीं घेतलं आहेस त्याचीं मुळं खोल रुजीव. आपल्या कंगाल देशांत आपण गवताचं बीं पेरून त्याच्यावर निर्वाह करीत असतों. गहूं इत्यादि गवताचंच बीं आहे. फळझाडं लावण्याचा आपल्याला धीरच नसतो. त्यामुळं गरीबांना तीं मिळतच नाहींत. श्रीमंतांना तीं पोषक नसतात. ते मुखशुद्धी म्हणून खातात. याचप्रमाणें सेवाक्षेत्रांतसुद्धां आपण कंगाल असल्यामुळें गवतावरच संतुष्ट राहात असतों. या चुकींतून आपण थोडेसे जरी वांचलों तरी उत्पन्न झालेलीं फळझाडं छाया देतील व त्यांचीं फळं पिढ्यान्‌पिढ्या खाल्लीं जातील. आज इतकंच.

ता. ५।१०।३४ बापूचे आशीर्वाद.

—*—

## पत्र....७३

चि.—

तुझं पत्र मिळालं. तुझ्या प्रश्नांची समजूतदार उत्तरं दिलीं म्हणजे तीं खऱ्या शहाणपणाची निशाणी असेलच असं थोडंच म्हणतां येणार आहे ? माझा राग तुम्हाला कोणाला कळायचा नाहीं. त्याचा साक्षी मीच होऊं शकेन * * * किंवा * * * बहेन यांना जो अनुभव आला असेल त्याची मी थोडीच रागामध्यें गणना करीन ? माझ्यामध्यें जो राग भरला आहे तो पुष्कळच मी गिळून टाकीत असतों. गिळतां गिळतां जो बाकी राहील तेवढाच * * * इत्यादींना दिसला असेल. तेवढासुद्धां जर त्यांना दिसूं दिला नाहीं तर मी दंभी बनेन किंवा सुकून जाऊन हाडांचा सांपळा बनेन. तसं होत नाहीं, कारण माझ्या रागाला जाणूनबुजून आवरून धरून पुढचा मार्ग मी कांपीत असतों. माझ्या आसपास राहणाऱ्यांच्या बाबतींत सावधान राहण्याची आवश्यकता मला दिसली नाहीं, म्हणजे त्यांना माझ्या रागाचं ओझरतं दर्शन होतं आणि ते माझ्यावर दया करीत असल्यामुळें माझा राग विसरून जातात.

* * * विषयीं तूं समजतेस तसं असण्याचा संभव फारच कमी. एकाद्याच्या निंदेच्या गोष्टीवर विश्वास ठेवतांना पुष्कळ विचार करावा. ती ऐकलीच नाहींस तर अधिक बरं.

* * * सारख्यांच्या बाबतींत काय होणार ? त्यांचीं मतं वेगळीं. मनोरथ वेगळे. ज्या प्रवृत्ति त्यांना आवडतात त्या सरकार चालूं देत नाहीं. ज्या चालत असतील त्यांमध्यें त्यांना गोडी वाटत नाहीं. प्रजेच्या तंत्रांत तेच येऊं शकतील जे कुठें ना कुठें बसूं शकतील. त्यांच्यासारख्यांनीं एकाद्या धंद्यांत पडून शक्य ती सेवा करणं योग्य. अशा रीतीनं पुष्कळांना मी मार्ग दाखवीत आहे. जे प्रामाणिकपणें धंदा करीत आहेत तेसुद्धां देशाची सेवा करतात आणि सेवा करतों असें म्हणणारे भाररूप असण्याचा संभव आहे. धंदा करून कमावणारे शुद्ध सेवक असूं शकतील.

उद्योगाविषयीं जें होण्याजोगं असेल तें कर ... ... एकाच क्षेत्रांत टिकून राहतां येईल तरच कांहींतरी काम होऊं शकेल. तूं जेथें राहा-

तेस तें जर शहराचं उपनगरच असेल तर तेथें राहून फारसा फायदा होणार नाहीं. पण आतां तिकडे राहिलीच आहेस तेव्हां एकाएकीं तें स्थान न सोडलेलं चांगलं. पण यांत माझं शहाणपण कुचकामाचं आहे असं समजावं. चुकीनं जर त्या ठिकाणीं राहाण्याचं ठरलं असेल तरी देखील त्याला चिकटून राहावं असा न्याय असूंच शकत नाहीं. चूक झाली असं सिद्ध झालं तर ती सुधारलीच पाहिजे.

अहिंसेनं स्वराज्य मिळवून देणारा मी कोण ? माझ्यांत जर खरोखर अहिंसा वास करीत असेल तर तिचा संसर्ग दुसऱ्यास झाल्यावांचून राहाणारच नाहीं. माझ्यावर माझी कमी श्रद्धा आहे. अहिंसेवर मात्र अखूट आहे. जगाला हा एक महान् सिद्धांत समजला आहे. तो आचरणांत फार कमी आला आहे. मला तर रोज त्याची नवी गोडी चाखायला मिळते. कारण माझ्या बाबतींत तोच एक कल्पवृक्ष आहे. या जगांत माझ्या बाबतींत दुसरं कांहींच संभवत नाहीं. कारण सत्यनारायणाला भेटण्याचा दुसरा मार्ग मला सांपडलेला नाहीं. आणि त्याला भेटल्याशिवाय जीवन व्यर्थ भासतें. म्हणून अहिंसेचा मार्ग बिकट असो कीं सोपा असो त्याच मार्गानं मला जाणं आहे. माझ्या मृत्यूनंतर जर कापाकापीच झाली तर समजावं कीं माझ्यांतील अहिंसा फार कोती अथवा खोटी-अहिंसेचा सिद्धांत कांहीं खोटा होणार नाहीं; किंवा असंही होईल कीं अहिंसेप्रत आपण पोंचूं तत्पूर्वीं रक्ताच्या वैतरणीमधून आपल्याला पसार व्हावं लागेल. २० सालीं राजकारणांत अहिंसा प्रगट झाली. त्यानंतर चौरीचौरा इ. काय झाले नाहींत, सरकारनं तरी कुठं हात आवरला आहे ? पण मला विश्वास आहे कीं ही सर्व हिंसा होत असतांसुद्धां अहिंसेनं आपला पुष्कळ प्रभाव पाडला आहे. पण तो समुद्रांत बिंदुमात्र आहे. माझा प्रयोग पुढें वाढतच चालला आहे. तुझी श्रद्धा कधीं चळूं देऊं नकोस. आपल्या इंद्रियांना दिसतं तें सर्व सत्यच असतं असं नाहीं. पुष्कळ वेळां तर तीं असत्यच पाहतात. म्हणूनच अनासक्तीचा मार्ग शोधला गेला. अनासक्ति म्हणजे इंद्रियांच्या पर जाणं. हें त्यांच्यांत असलेली आसक्ति सुटली तरच साध्य होईल. डोळ्यांचा पुरावा खरा मानला तर पृथ्वी सपाटच सिद्ध होणार नाहीं का ? आणि सूर्य म्हणजे सोन्याच्या थाळी-

शिवाय दुसरं काय वाटणार ? डोळे पाहातात तीच तूं असशील तर माझे बाराच वाजतील ना ? कानांनीं माझ्याविषयीं तूं ऐकतेस तें सारं खरं समजून बसलीस तर ?

आतां फार झालं. मीराबेनचा अलार्म झाला. आतां प्रार्थनेची घंटा होईल. एवढ्यांतून जें चित्र तुला काढतां येईल तें काढ. पंधरा तारखेनंतर दिल्लीला जाण्याचा विचार आहे. तेथें थोडे दिवस हरिजनाश्रमांत राहण्याचं योजिलं आहे. शेवटीं आतां जेल डोळ्यांसमोर आहे.

ता. ४।१२।३४ बापूचे आशीर्वाद.

—※—

## पत्र....७४.

चि.—

...आजहि पहांटे १–४५ वा. उठून पत्रं लिहीत आहे. हल्लीं दोन वाजण्याच्या आसपास उठण्याची संवयच पडली आहे. नऊ वाजण्यापूर्वीं निजायला मिळतं. दिवसा एकदोन वेळ मिळून अर्धा ते एक तास निजायला मिळतं. पुरेसं होतं......

...स्वप्नांत व्रतभंग झाला तर त्याचं प्रायश्चित्त सामान्यपणें अधिक सावधानी आणि जागृति येतांच रामनाम. स्वप्नांत होणारे दोष हे आपल्या अपूर्णपणाचे द्योतक आहेत. न कळत कां होईना ते ते विषय अंतःकरणाच्या कुठल्या तरी कोनाकोपऱ्यांत भोगत असतों. त्यामुळं निराश व्हायचं कारण नाहीं. पण जास्त जास्त प्रयत्नशील व्हावं. निराशा ही विषयासक्तीची खूण असू शकेल, अश्रद्धेची तर आहेच. रामनाम घेतांना जो थकेल–निराश होईल–त्याची श्रद्धा अपुरीच म्हटली पाहिजे ना ? कोलंबसाच्याबरोबर असणाऱ्या लोकांची श्रद्धा संपली तेव्हां ते त्याला मारायला तयार झाले. कोलंबसाला श्रद्धेच्या डोळ्यांनीं किनारा स्पष्ट दिसत होता आणि त्यानं थोडी मुदत मागितली व तो अमेरिकेला पोंचला !!! न खाण्याची वस्तू स्वप्नांत खाल्ली तर त्याचाहि हाच अर्थ आहे. अशा स्वप्नांना बाह्य कारणं असतात. तीं समजलीं म्हणजे दूर

करावी. 'सगळ्या अवस्थांचं जें साक्षी आहे तें निष्कल ब्रह्म मी आहे.'* असं आपण गातों. तसं होण्याचा सतत प्रयत्न करीत असूं तरच तें गाणं योग्य. तसे आपण झालों नाहीं याचं द्योतक हीं स्वप्नं आहेत. आपल्याला तीं दीपस्तंभासारखीं आहेत. ईश्वरकृपेवांचून पानहि हलत नाहीं. पण प्रयत्नरूपी निमित्तावांचूनहि तें हलत नाहीं. प्राणिमात्राची शुद्धतम सेवा हाच साक्षात्कार.

ता. १६।१२।३४ बापूचे आशीर्वाद.

—*—

## पत्र....७५

चि.—

आतां सहा वाजायला आले आहेत. पण अंधार घोर आहे. हात काकडले आहेत. इथं जंगल असल्यासारखं आहे. हरिजन-आश्रम वसवायचा आहे. दोन खोल्या मुद्दाम बांधल्या आहेत. बाकी तीन चार तंबू आहेत.

रामनाम रामबाण आहे, असा अढळ विश्वास तूं बाळगला आहेस; तेव्हां या सत्याचा तुला अनुभव येईल. सर्वत्र काळोख दिसत असला तरीहि त्याचा जप करीत जा म्हणजे कुशलच आहे.

शेतकऱ्यांच्या जमिनीच्या तुकड्यांचा प्रश्न फार मोठा आहे. आपल्या हातांत सत्ता आली तरीहि तो सोडवणं कठीणच आहे. आज आपला प्रयोग सत्तेशिवाय काय करणं शक्य आहे, हें पाहण्याचा आहे. हे जमिनीचे लहानसे तुकडेसुद्धां बुद्धी वापरून लागवडींत आणले गेले तर त्याचा उपयोग होण्याजोगा आहे. हें सारं प्रयोग करूनच करून दाखवण्यासारखं आहे. आपलं स्वतःचं ज्ञानसुद्धां कोतं, त्यामुळें आपण पंगु असल्यासारखे आहोंत. म्हणूनच शेतीचा प्रश्न प्रत्यक्षपणें आपण हातीं घेत नाहीं. सहज सुचतील असे व सहज करतां येतील असे उद्योगच आज तरी सिद्ध करायचे आहेत. कांहींहि करून शेतकऱ्यांचा आळस काढतां

---

* यत्स्वप्नजागरसुषुप्तिमवैति नित्यम्
तद् ब्रह्म निष्कलमहं न च भूतसंघः॥ [ प्रातःप्रार्थना, आश्रमभजनावली ]

आला व उद्योगाबरोबर बुद्धीचा मेळ बसवतां आला तर बाकी सर्व आपोआप ठीक होईल.

आजच्यापेक्षां पूर्वी लोकांची स्थिति खात्रीनं चांगली होती ही गोष्ट सिद्ध करतां येण्याजोगी आहे. पूर्वी बाहेरून धन आंत ओढलं जात होतं, जमिनीचे इतके तुकडे नव्हते. आजच्यासारखें धन कधीं बाहेर जात नव्हतें. निसर्ग आपलं काम आपल्या मार्गानं करीत होता. आज आपण पूर्ण ज्ञान नसतांना निसर्गाच्या कामांत ढवळाढवळ करीत आहों. आणि तेंदेखील एकतंत्री पद्धतीनं. त्यामुळें आपण पिळले जात आहोंत. रामराज्य अवश्य काल्पनिक आहे, पण त्याला धरून असं कांहीं ना कांहीं पूर्वी होतंच; हेंसुद्धां आपल्याला सिद्ध करतां येईल. बाकी असत्याचा किंवा दारिद्र्याचा संपूर्ण लोप कोणत्याहि काळीं नव्हता व यापुढेंहि तो संभवत नाहीं.

पर्वताच्या गुहेंत पळून जाण्याच्या प्रथेमध्यें कंटाळाच भरलेला आहे. त्याचा थोडासा उपयोग असेलच. आज मात्र खात्रीनें नाहीं. सेवा करतां करतां मरून जाणं हें गुहेमध्यें राहिल्याप्रमाणेंच आहे.

जी गोष्ट स्वत:ला लागू तीच परक्याला लागू. स्वत:च्या बाबतींत अनासक्त असतांसुद्धां शीतउष्णाची जाणीव राहाणारच. थंडींत ऊन्ह आणि उन्हांत थंडी आपण शोधणारच. पण हा शोध सफल नाहीं झाला तरी रडत बसणार नाहीं ही अनासक्ति. हीच गोष्ट थंडीनं काकडणाऱ्या इतरांविषयीं. त्यांना मदत करण्याचा आपण प्रयत्न करूंच. त्यांना काकडतांना पाहून आपल्याजवळ असेल तें अथवा त्यांतील कांहीं त्यांना आपण देऊंच. पण इतकं करूनसुद्धां ते काकडत राहतील तर तें आपण सहन करावं. त्यामुळं उतावीळ होऊन मारामारी करूं नये. असत्य आचरूं नये, ही अनासक्ति. खादी पोटाचा धंदा आहे व नाहीं. तिला अन्नपूर्णा म्हटलं आहे.

हिंसा बाद केली तर रशियापासून पुष्कळ घेण्यासारखं आहे असं मी मानतों; पण जें आज केवळ बळजबरीनं शक्य झालेलं दिसतं आहे तें तितकंच स्वेच्छया स्वीकृत होणारही नाहीं असा संभव आहे; पण आपण सारे वाचलेल्यावरूनच अनुमानं बांधीत असतों, हें बरोबर नाहीं. आपण आपला स्वतंत्र रीतीनं विचार करणं योग्य.

विषमतेचा सर्वस्वीं नाश अशक्य आहे; पण जास्तींत जास्त समतेप्रत पोंचण्याचा एकच मार्ग मी दाखविला तो आहे. मी दाखविलं तें कांहीं नवीन नाहीं. जुनंच ( कदाचित् नव्या पद्धतीनं ) मी दाखवून राहिलों आहे.

जोडधंदे फावल्या वेळांत करून आपल्या प्राप्तींत चांगली भर टाकतां येईल हें शेतकऱ्यांना मोठं आश्वासन आहे.

शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वार्थाचं संघटन होण्याजोगं आहे. संघशक्ति अंगीं बाणल्यावांचून आर्थिक लाभ अशक्य आहे हें त्यांना समजावून देतां येईल.

कर्माचा कायदा जाणणं सोपं आहे. मेकॅनिक्स्मध्यें जें आपण शिकतों तेंच यांत आहे. ज्या दृश्य शक्ती एकत्र काम करतात त्यांचा एकच दृश्य परिणाम आपल्याला दिसतो; तीच गोष्ट कर्माची आहे.

तुला लहान गांवांत जायचं असेल तर खुशाल जा. पण आहेस त्यालाच चिकटून राहिलीस तरी पुष्कळ. एका जागीं पूर्ण सफलता मिळाली तर ती एका गुण्याचं [ काटकोनाचं ] काम करील. आपल्यापाशीं आज गुण्या नाहीं.

ता. ३१।१२।३४ **बापूचे आशीर्वाद.**

बिरला मिल्स, दिल्ली.

—*—

## पत्र...७६

चि.—

तुझ्या पत्राचं उत्तर यावेळीं फार उशीरां देत आहे; कारण वेळच नाहीं. आज लिहून लिहून उजवा हात थकला आहे म्हणून डाव्या हातानं लिहितों.

माझं शरीर दुबळं तर झालंच असेल पण मला कांहीं तसं वाटत नाहीं. उपवासामुळं अशक्तता मुळींच वाढली नाहीं. वाढूंच नये, जर उपवासाचं पारणं बरोबर फेडतां आलं तर. माझ्या आहाराचा परिणाम माझ्या शरीरावर चांगलाच झाला आहे असं मी समजतों. त्याचं मला पृथःकरण करतां येणार नाहीं. आई, वडील वगैरे तुला भेटून गेले हें चांगलं झालं.

फोड उठतात त्यावर उपाय आहेच. थोडे दिवस फक्त फळं आणि कच्ची भाजी यांवर राहावं. बाष्पस्नान घेतलं म्हणजे लगेच ते मावळून जातील. बाष्पस्नानानंतर थंड पाण्यानं स्नान करावं. तीन चार दिवसांत आतडीं साफ होण्याचा संभव आहे. नंतर दूध किंवा अगदीं गोड दहीं आणि फळं त्याचप्रमाणें कच्ची भाजी घ्यावी. भाजींत मेथी, पालक, तांदुळजा, सॅलड या उत्तम आहेत. मी तर सरसूचीं पानं आणि देंठदेखील खातों.

ईश्वराजवळ मागणी करणं म्हणजे आपण तीव्र इच्छा करणं. ईश्वर आपणाहून भिन्नाभिन्न आहे. भिन्न आहे कारण तो संपूर्ण आहे; अभिन्न आहे, कारण आपण त्याचा अंश आहोंत. समुद्रापासून वेगळा पडलेला बिंदु समुद्राची जर विनवणी करणार नाहीं तर कोणाची करणार? पण समुद्राला कर्तव्याकर्तव्य असं कांहीं असतं का? प्रार्थना हा वियोगीचा विलाप आहे. त्यावांचून देहधारी जगूंच शकणार नाहीं.

राष्ट्राच्या प्रगतीची किल्ली आपल्या हातांत आहे आणि नाहीं. आपण जर शून्यवत् होऊं तर प्रगति होईल. शून्यवत् होणं आपल्या हातीं आहे. पण प्रगति आपल्या हातीं नाहीं; कारण आपण शून्य झालों. म्हणजे एकच एकस्वरूप परमात्म्याच्या हातीं (प्रगति) आहे.

'ऊधो, कर्मनकी गत न्यारी' हें शुद्ध सत्य आहे. कर्माचा कांहीं कायदा आहे एवढं आपण जाणूं शकतों. पण हा कायदा कसं काम करतो हें आपल्याला समजत नाहीं. एवढी प्रभूची कृपाच आहे. सामान्य राजाचे कायदेसुद्धां आपण जाणत नाहीं तर मग कायद्याची मूर्ति असा जो परमात्मा त्याचा कायदा आपण कसा जाणणार ?

या लढाईच्या सुरुवातीला जय दिसत होता, ती कल्पनाच होती; पराभवसुद्धां काल्पनिकच होता, सत्याचा नित्य जयच आहे अशी ज्याची अढळ श्रद्धा आहे त्याच्या शब्दकोशांत 'हार' असा शब्दच मुळीं नाहीं.

ता. ३।२।३५ बापूचे आशीर्वाद.
वर्धा.

—※—

## पत्र....७७

चि.—

आज तुझ्या दोन्ही पत्रांचं उत्तर द्यायला बसलों आहे— ता. ९-२-३५ आणि ३०-३-३५ चं. तुझा नांगर चालवण्याचा आणि मोट धरण्याचा धंदा हल्लीं सुरू आहे काय ?

ज्या लोकांत तुझा जम बसेल त्यांना तूं जन्ममरणासंबंधीं होणाऱ्या खर्चांतून वांचवावंस. सारेच मानतील असें नाहीं. पण थोड्यांना तरी पटेल.

* * * शीं झालेला तुझा संवाद चांगला आहे. पुष्कळजण अहिंसा पॉलिसी [धोरण] म्हणूनच पाळतात हें खरं आहे. पण तुझ्यासारखे कित्येक असे आहेतच कीं जे अहिंसा हा धर्म समजून तिचं पालन करण्याचा महा प्रयत्न करतात. शेवटीं हीच अहिंसा काम देणार आहे. आपण स्वतंत्र झालों तरी लष्कर हें राहाणारच. माझ्या अहिंसेंत इतकी शक्ति अजून मला दिसत नाहीं कीं ज्यामुळं लोक लष्कराची आवश्यकता नाहीं ही गोष्ट मानतील. लष्कर असणार तर लष्करी शिक्षणही असणार. हें झालं अनुमान. जर आपण खरोखर अहिंसेच्या योगानें स्वतंत्रता मिळवली तर लष्कराची जरूरच पडणार

नाहीं, असं घडणं कांहीं अशक्य नाहीं. अहिंसेची शक्ति अमाप आहे. तशीच अहिंसकाचीहि आहे. अहिंसक स्वतः कांहीं करीत नाहीं त्याचा प्रेरक ईश्वर असतो. त्यामुळं भविष्यकालीं ईश्वर त्याच्याकडून काय करवून घेईल हें तो स्वतः कसं सांगणार? म्हणून इथं काम्प्रोमाईज्चा [तडजोडीचा] प्रश्नच नाहीं. शक्तीच्या मापाचा प्रश्न आहे. सापाला भिऊन मी त्याला मारलं तर मी कांहीं काम्प्रोमाईज करीत नाहीं. माझ्या अशक्तीचं प्रदर्शन करतों. ईश्वरानं यापेक्षां जास्त शक्ति दिली नाहीं किंवा अशी शक्ति मिळवण्याइतकी शुद्धि मी केली नाहीं-तप केलं नाहीं असंच म्हणायचं. काम्प्रोमाईज् मनुष्य जाणूनबुजून करतो.

पूर्ण सत्याग्रही म्हणजे ईश्वराचा पूर्ण अवतार. असा पूर्ण अवतार जगाला हलवून सोडील काय, अशी तुझ्या मनांत शंका आहे, नाहीं? हें जग म्हणजे असा अवतार निर्माण करण्याची प्रयोगशाळाच आहे हें म्हणणं अतिशयोक्ति नाहीं. आपण सारे अंशरूपानें तयारी करूं तर केव्हांतरी पूर्ण अवतार प्रगट होईलच, असा आपण विश्वास राखावा. मग तुला लष्करासंबंधीं प्रश्न विचारावा लागणार नाहीं.

सरकार यंत्र आहे. पण तें चालवणारे यांत्रिक आहेत ना? *

गायन किंवा नृत्य पाहाण्यांत दोष नाहीं-जर तें अश्लील नसेल तर. पण आपल्यासाठीं कोणी दुसऱ्यानं पैसे देऊन आपण पहायला जाणं हें खटकण्यासारखं आहे खरं. एकाला कोणी पैसे देईल; अनेकांना कोण देणार? आपण तर अनेक आहोंत. पण या बाबतींत सर्वांनीं आपापल्या शक्तीप्रमाणें वागावं.

विहिरींच्या स्वच्छतेचा प्रश्न फार मोठा आहे. विहिरींच्या पायऱ्या जर बंद करतां आल्या तर तें एक मोठं काम झालं म्हणतां येईल.

तेल काढण्याची क्रिया मला बरोबर लिहून पाठव म्हणजे मी ती अजमावून पाहीन.

* * * परीक्षिका नेमली गेली. त्याबद्दल मिळणाऱ्या फीचा भाग तिनं द्यावा आणि परीक्षापत्र मौलिक आणि सोपं काढावं. (स्त्रियांच्या)

---

* सरकारचा हृदयपालट कसा होणार? सरकार तर यंत्र आहे. यंत्राला हृदय कोठून? या प्रश्नाचें उत्तर.

मासिकधर्माविषयीं मीं लिहिलं तें बरोबर आहे. तशी निर्विकारता यायला फार वेळ लागतो. हा विकार इतकी सूक्ष्म वस्तु आहे कीं तिला आपण नेहेमींच ओळखूं शकतों असं नाहीं. *

जवाहरलालना सोडविण्याची धामधूम यूरोपनं करावी हें बरोबर आहे.

असेंब्लीमधल्या ( मध्यवर्ति ) व्होटला मान दिला जात नाहीं, याबद्दल मला निराशा वाटत नाहीं. हा परिणाम माझ्या लक्ष्यांत होताच. तो प्रवेश आवश्यकच होता व आहे.

हिंदु मुस्लीम ऐक्याबाबत मी मौन धरलं आहे; कारण कांहींही करण्याला मी असमर्थ आहे. गजराज जेव्हां थकला तेव्हां त्यानं मौन धारण केलं व प्रार्थना सुरू केली. त्याची प्रार्थना सफल झाली. गजेंद्रासारखीच माझी स्थिति समज. माझी प्रार्थना चालू आहे. मोक्ष मिळेल तेव्हां खरा. त्याचा कालनिर्णय समजून घेण्याची अनासक्ताला तळमळ कशाला ?

येथें नवीं माणसं पुष्कळ झालीं आहेत. स्वयंपाकघर अगदीं साधं झालं आहे. वाफेवर सर्व कांहीं शिजवलं जातं. अर्थात् एकाच मोठ्या भांड्यांत तीन्ही वेळचीं भांडीं एकत्र चढतात. वेळ पुष्कळच वांचला गेला. पोळ्या करण्यापुरताच स्वयंपाक राहिला असं म्हणतां येईल. पोळ्यांचं काम देखील सोपं करण्याच्या शोधांत आहे. तेलाचा घाणा चालत आहे. जवळचं खेडेगांव रोज नियमानं साफ होतं. मी एकदांच गेलों होतों. महादेवाचं रोज जाणं होतं.

ता. ५।४।३५ **बापूचे आशीर्वाद.**

---

* "निर्विकार स्त्रीचा मासिकधर्म बंद होईल," हें महात्माजींचें मत.

—*—

## पत्र....७८

चि.—

आज माझ्या मौनाचा शेवटचा दिवस आहे. मौनामुळं मागचें काम चांगलंच उरकलं गेलं.

* * *

भात, गूळ, कांदा इ. खाण्याची कोणावर सक्ती मी थोडीच करतों आहे? लोक जी वस्तु वापरीत आहेत तिचे गुणदोष फक्त मी दाखवीत आहे. चिंच कच्च्या भाजीबरोबरच मी आपला खातों. ती पाण्यांत कोळून तिचं सत्त्व काढतों. कच्ची भाजीसुद्धां मला तर वाटूनच खावी लागते.

खेडेगांवच्या लोकांच्या आहारांत कांद्याला मोठं स्थान आहे. हीच एक अशी भाजी आहे कीं जी त्यांच्या बाबतींत बहुमोल आहे. कांदा असला म्हणजे तुपाची वगैरे तितकीशी जरूरी नसते. म्हणून मी प्रयोग म्हणून तो दाखल केला आहे. ज्यांच्या मर्जीला वाटेल ते खातात. कांद्यासंबंधीं माझा विचार मीं इतक्याच प्रमाणांत बदलला आहे कीं जे तो औषध म्हणून खातात, त्यांच्या ब्रह्मचर्याला त्याचा अडथळा होणार नाहीं. ह्याच्यासाठीं माझ्यापाशीं प्रमाण मात्र कांहीं नाहीं.

लाठी इत्यादींच्या शिक्षणामुळं अहिंसावृत्ति ढिली पडण्याचा संभव तर अवश्य आहे. लाठी रक्षणासाठीं शिकवायची ना? पण जो शिकवूं इच्छितो त्याला तिचा उपयोग न शिकवण्याचा नियम करण्याची इच्छा होत नाहीं.

पांढऱ्या खादीऐवजीं रंगीत वापरूंच नये असं कांहीं मीं लिहिलेलं नाहीं. लिहिलं असेल तर ती चूक समजावी.

स्वराज्य मिळाल्यावर पुष्कळ गोष्टींत इतका फरक पडेल कीं आज संस्थानांच्याविषयीं कांहीं सांगणं कठीण आहे. पण सामान्यत: संस्थानांच्या शक्तीला स्वराज्यतंत्र अटकाव करूं शकणार नाहीं असं म्हणतां येईल.

लोहार, सोनार वगैरे वैश्य समजावे. उद्यां इंदूरला जात आहे. २५ ला परत येईन.

ता. १८।४।३५. बापूचे आशीर्वाद.
वर्धा.

—*—

## पत्र....७९

चि.--

......अरविंदबाबूंच्यासंबंधीं कांहींही सांगायला मी असमर्थ आहे. ज्याच्या शरीरांतील चरबी लोंबकळूं लागली आहे त्याला शुद्ध ज्ञान नसेल आणि ज्याचं शरीर नाजूक आहे त्याच्यांत तें असेल हें कुणाला माहीत ? मला आपला माझा मार्ग अनुकूल आहे इतकंच म्हणतां येईल. आपण जगाचे न्यायाधीश बनूं नये. एवढं मात्र कबूल केलं पाहिजे कीं अरविंदबाबूंच्या छायेखालीं राहाणाऱ्या दोनशें मंडळींत असे लोक आहेत कीं ज्यांच्या जीवनांत त्यांच्या सहवासानें मोठे फेरफार झाले आहेत. जो तो आपापल्या स्वभावाप्रमाणं अनुकरण करतो.

पश्चिमेकडे खासगी जीवनाच्या पवित्रतेची आवश्यकता मानीत नाहींत असं म्हणणं सर्वस्वी बरोबर नाहीं. इकडे सर्व लोक तशी आवश्यकता मानतातच असंही नाहीं. आपण त्याची आवश्यकता मानतों इतकंच नव्हे तर असंही मानतों कीं अंतःशुद्धीवांचून केवळ बुद्धीनं झालेलीं कार्यं वाटेल तितकीं चांगलीं भासत असलीं तरी तीं कधींच टिकाऊ असणार नाहींत. तात्कालिक परिणामावरून त्यांच्या कार्याची तुलना करूंच नये. हां, ज्या ठिकाणीं नीतीशीं संबंध नाहीं अशा कार्यांना अंतः शुद्धीची गरज नसते.उदा. एखादा सुतार व्यभिचारी असला तरी तो बरोबर काटकोनांत टेबल बनवून देईल. पण अंतःशुद्धिरहित मनुष्याला अस्पृश्यता नाहीं काढून टाकतां येणार. तो चरख्याकडे लोकांना वळवूं शकणार नाहीं. कारण दोन्ही गोष्टी करण्याला हृदयाची आवश्यकता आहे. अशा कामांच्या बाबतींत काळाचं मोजमाप करणं उपयोगाचं नाहीं. सत्यनिष्ठेनं झालेल्या कामांचा विशिष्ट परिणाम झालाच पाहिजे, याविषयीं शंकाच नसावी. इतका विश्वास नसेल तर आपणाला नीति पाळतांच येणार नाहीं.

ईश्वर कल्पनातीत आहे म्हणून आपण ज्याला भजतों तो आपल्या कल्पनेचा ईश्वर आहे. खऱ्या ईश्वराला कोणीच पाहिलं नाहीं. पाहिलं असेल तर कोणाला वर्णन करतां आलेलं नाहीं. मला कोणतं स्वरूप

विशेष प्रिय आहे हें सांगणं कठीण आहे. पण ज्या स्वरूपाची मी पूजा करतों त्याचं नांव आहे सत्य. तें मूर्त आहे, अमूर्त आहे, अनेक रीतीनीं प्रगट झालेलं आहे. पूर्ण स्वरूप अपूर्णाला दिसणार तरी कोठून ?

खादी येईल तेव्हां तिचा उपयोग करीन. येथून ३१ ला निघून २ ला वर्ध्याला पोंचण्याचा विचार आहे.

ता. २८।५।३५ बापूचे आशीर्वाद.
बोरसद.

—*—

## पत्र...८०

चि.—

तुझ्या सुरेख पत्राचं उत्तर लगेच देतां येण्याजोगं नव्हतं. उजव्या हाताला विश्रांतीची गरज असते तेव्हां काम पुरं होतच नाहीं......

...भूकंपाचा पापाशीं काय संबंध आहे हें मी 'हरिजन'मध्यें लिहून चुकलों आहे. पहा. बिहारमध्यें कोणालाहि राग नव्हता. इतकंच नव्हे तर सर्वांना समजलं होतं कीं हें पापाचं फळ आहे. ऐक्याच्या सिद्धांतामधून हें सर्व निर्माण होतंच. सर्पांविषयीं वगैरेसुद्धां 'हरिजनां'त लिहिलं आहे तें वाच. आजकाल लिहिला जाणारा 'हरिजन' वाचीत नसशील तर तो घेऊन लक्ष्यपूर्वक वाचीत जा अशी माझी शिफारस आहे. तुझ्याकडे येतच असेल ना ?

जो पति आजारानें पीडलेला आहे, जो सेवेनंसुद्धां शांत होऊं शकणार नाहीं त्याच्या मृत्यूची अपेक्षा करण्यांत मला पाप दिसत नाहीं. पण पतीला जर शुद्धी असेल तर त्याला विचारलं पाहिजे. त्याला पीडा होत असतांनासुद्धां जर त्याची जगण्याची इच्छा असेल तर त्याला जगूं दिलं पाहिजे.

मालकांनीं ट्रस्टी [ विश्वस्त ] होणं म्हणजे प्राप्तीचा विशिष्ट हिस्सा ठेवून घेऊन बाकीचं सर्व ग़रीबांना म्हणजेच स्टेटला [ सरकारला ] किंवा अशाच प्रकारच्या लोकोपयोगी संस्थांना देऊन टाकणें. सगळयांनीं

सगळं स्टेटला देऊन टाकलं तर कोणालाहि साहस करण्याची संधि राहणार नाहीं आणि मनुष्यमात्र जड यंत्र बनून जाईल.

धनिक लोकांच्याबरोबर माझा संबंध राहणारच. त्यांना मी दुष्ट मानीत नाहीं आणि गरीबांना कांहीं देवदूत मानीत नाहीं. असे पुष्कळ धनवान् लोक पूर्वपश्चिमेकडे आहेत कीं जे परोपकारार्थच कमवितात. ते पूजनीय आहेत. असे पुष्कळ गरीब मला माहीत आहेत कीं ज्यांचा संग त्याज्य आहे. माझ्या कल्पनेंतील स्वराज्यांत वाघ आणि बकरी एका सरोवरांत एकाच वेळीं पाणी पीत असलीं पाहिजेत. ही एक कल्पनाच राहिली म्हणून काय झालं? मला काय पाहिजे आहे हेंसुद्धां मला जर समजलं नाहीं तर मी प्रयत्न कशासाठीं करावा ?

ही गोष्ट खरीच आहे कीं मी माणसांना बरोबर ओळखीत नाहीं. पण दुसरे जे 'आपण ओळखतों' असं सांगतात ते तरी कुठं ओळखत असतात ? माझ्या अज्ञानाचा मला खेद नाहीं. माणसांना मी ओळखीत नाहीं म्हणून मी त्यांच्यावर विश्वास ठेवतों.

तुला कुणीं विचारलं तर माझ्याविषयीं तुला उत्तर दिलंच पाहिजे, असं कुठं आहे ? " मला उत्तर देतां येणार नाहीं. त्यांचं काम आणि त्यांचे विचार मला आवडतात. जें आवडतं तें आवडण्याचीं कारणं नेहमीं थोडींच देतां येतात ? म्हणून 'काय विचारायचं असेल ते त्यांनाच विचारा.' " असं कां नाहीं सांगत ? असं उत्तर दिलंस तर पुष्कळ जंजाळांतून सुटशील. माझ्याकडून एखादी वस्तू घेतली असलीस तरी जी तूं पचवूं शकली असशील ती जरूर दुसऱ्यांना दे. आणि जें आपण पचवलं तें दुसऱ्याचं नव्हेच मुळीं. तें आपलंच झालं. जें आपलं झालं त्याच्याविषयीं शंका नसावी आणि त्याच्यासंबंधींचीं उत्तरेंहि आपल्याकडे असलींच पाहिजेत.

ता. २१।६।३५ बापूचे आशीर्वाद.
वर्धा

—*—

## पत्र....८१

चि.—

पत्रं पुरीं करण्यासाठीं आज अडीच तासांचं मौन घेतलं आहे. आतांच एकामागून एक पत्रं खलास करतां करतां तुझं ता. ९।७।३५ चं पत्र हातीं आलं आहे.

हिटलरसंबंधीं दुसरं कोणतं पुस्तक आहे ?

आतां तुझा प्रश्न. रशियाचं उदाहरण नमुना म्हणून पुढें ठेवण्यांत भय आहे. एक तर असं कीं आपल्याला प्रत्यक्ष अनुभव नाहीं. दुसरं असं कीं त्याला फार काळ लोटलेला नाहीं आणि तिसरं असं कीं तिथं जें होतं तें बळजबरीनं करविलं जातं; म्हणून आपण रशियाला वगळून विचार करावा. आपण एवढी गोष्ट अनिवार्य ठरविली आहे—हिंसेनं कांहींहि करायचं नाहीं, करून घ्यायचं नाहीं. तेव्हां धनिकांकडून न्याय मिळवण्याचा सर्वांत सोपा मार्ग हा आहे कीं त्यांनीं स्वत: मिळवलेल्या धनाचा चांगल्यांत चांगला उपयोग करावा. यांतून असा परिणाम निष्पन्न होईल खरा कीं तसं केल्या-मुळं ते पुष्कळ धनोपार्जन करण्याचा मोहच सोडून देतील. तसा परिणाम घडला तरी अडचण नाहीं, न घडला तरी ठीकच आहे. उलट इतकं धन सांठवून ठेवण्याची खटपट न करतां तिचा उपयोग करायला मिळतो. पुष्कळसे धनिक जर ट्रस्टी झाले तर आपल्याला कांहीं सांगायचं उरत नाहीं. तुझ्या युक्तिवादापाठीमागें अशी शंका भरलेली आहे कीं धनवान् आपल्या मिळकतीचे ट्रस्टी कधीं होणारच नाहींत. ही शंका खरी असली तरी चिंता नाहीं; कारण अंतीं सत्याचा विजय ठरलेलाच आहे. जो गरजे-पेक्षां अधिक मिळकत सांठवतो तो चोरी करतो आणि चोरीचं धन म्हणजे कच्चा पारा आहे. तो पचूं शकणार नाहीं. शेवटीं तें चोराच्या मालकीचं राहणार नाहीं. असा विश्वास ठेवून आपण आपले अहिंसक उपायच योजीत जावे.

अजून समाधान झालं नसेल तर पुन्हां विचार. तुझा प्रश्न महत्वाचा आहे आणि अहिंसा तुला पूर्ण समजली असेल तर माझं उत्तर तुला पूर्ण वाटलं पाहिजे.

ता. १३।८।३५ बापूचे आशीर्वाद.
वर्धा

—*—

## पत्र....८२

चि.—

राखी वेळेवर मिळाली होती. जुन्नरचे हातकागद मिळाले. चांगले होते... [1]खादी मिळाली. तिचा उपयोग करीन. माझं सूत बरंच जमलं आहे. त्यावर पुष्कळांची नजर पडूं लागली आहे. पण माझं कांतणं कसलं! १६० तार झाले तर त्या दिवशीं दिवाळी! देशी बरू पुष्कळ प्रकारचे येतात असं आजवर मला वाटलं आहे. ज्याबरूनें मी लिहीत आहे तो देशी मानला जातो. तपास करीन.

माझ्या विचारसरणींतील एक गोष्ट लक्षांत ठेविली म्हणजे सर्व कांहीं समजेल. माझी तटस्थता परिणाम केव्हां येईल त्याच्या काळाविषयीं आहे; कार्याविषयीं कदापि नाहीं, खुद्द परिणामाविषयींही नाहीं. 'धनिक धन सोडोत वा न सोडोत' असं म्हणण्यापाठीमागें परिणामाविषयीं बेदरकारी नाहीं; त्याच्याविषयीं निश्चितता आहे. आपण टाकलेलं पाऊल योग्य असेल तर आज ना उद्यां त्याचा परिणाम घडेलच.

वानरापासून मनुष्य निर्माण झाला ही गोष्ट माझ्या गळीं उतरत नाहीं. बाकी मनुष्याचा देह धारण करणाऱ्या जीवानं वानरादिकांचे देह धारण केलेच असले पाहिजेत याविषयीं शंका नाहीं.

आततायीची हत्या करणं ही गोष्ट मला पसंत नाहीं. आततायी कोणाला समजायचं?

खुनी वगैरे लोकांना जेलमध्यें टाकावं लागेल असं आज तरी मला वाटतं आहे. पण ती अहिंसा आहे असं मी कधीं म्हटल्याचं मला स्मरत नाहीं. मी तर तसं मुळींच मानीत नाहीं. मी असं म्हटलं आहे कीं आजच्या परिस्थितींत तें अनिवार्य असेल. याचा अर्थ इतकाच कीं माझी अहिंसा अजून फार अपूर्ण आहे. आणि म्हणून खून वगैरेसारख्या हिंसेवर तोडगा मला सांपडलेला नाहीं. पतनाला पतन म्हणून पाहण्यांतच सत्य आहे.

---

१ स्थानिक स्त्रियांनीं कांतलेल्या सुताची खादी भेट म्हणून महात्माजींस पाठवण्यांत आली होती.

अहिंसेवांचून मिळविलेल्या सत्तेंत दरिद्रनारायणाचें स्वराज्य असणारच नाहीं. स्वराज्यप्राप्तीमध्यें जितक्या प्रमाणांत अहिंसा असेल तितक्या प्रमाणांत दरिद्र्याचें दारिद्र्य फिटेल. पूर्ण अहिंसा माझ्यांत नाहीं, तुझ्यांत नाहीं कीं कोणाहिमध्यें नाहीं. पण अहिंसा मानणारे रोज अधिकाधिक अहिंसक होत जातील व त्यामुळं त्यांचं सेवाक्षेत्र वाढत जाईल. हिंसेचे पुजारी असतील त्यांचं क्षेत्र संकुचित होत जाईल व शेवटीं तें त्यांच्यापुरतंच राहील.

ता. १०।९।३५ बापूचे आशीर्वाद.
वर्धा

—*—

## पत्र....८३

चि.—

आज तुला पत्र लिहिलंच पाहिजे. उजवा हात फक्त सोमवारीं 'हरिजन' लिहिण्यासाठीं वापरतों. इतर दिवशीं डाव्या हातानं लिहितों. तसं करण्यांत वेळ पुष्कळ जातो खरा. त्यांत तुझ्या पत्राचं उत्तर ताबडतोब दिलं पाहिजे.* १६ तारखेच्या आसपास जरूर ये. थोडा थोडा करून तुला हवा तितका वेळ देईन. फिरावयास जात असतांना दिला तर चालेल ना ? येथें येतांना राहावयाचे दिवस मुक्रर करून न आलीस तर चांगलं. दोन दिवस जास्ती गेले तर खुशाल जावोत. येथें पसरलेलीं सर्व कामं सावकाशीनं पहाशील तर चांगलं आणि आपल्या गोष्टीदेखील सवडीनं सवडीनं होतील तर चांगलं.

...तुझ्या प्रेरणेनं हिटलरचं पुस्तक वाचीत आहे. लेनिनचं देखील Maxtonनं लिहिलेलं वाचलं. हिटलरविषयीं दुसरं पुस्तक मागवून ठेविलं आहे.

...झोंपडीचं वर्णन आकर्षक आहे. तुझा हेवा करायला कितीतरी कारणं आहेत.

रक्तपितीसारखे वगैरे रोग ज्यांना झाले आहेत त्यांना जबरदस्तीनं नपुंसक करण्याची प्रथा मान्य करण्यांत पुष्कळ अडचणी येतात. त्या-

* हें पत्र महात्माजींनीं दुसऱ्याच्या हातीं लिहवलें आहे.

मधून पुष्कळ प्रकारचे अनर्थ ओढवण्याचा संभव आहे. शिवाय कोणताही रोग असाध्य मानणं हेंहि बरोबर नाहीं. संयमाचा प्रचार करून जितकं फळ पदरांत पाडून घेतां येईल तेवढ्यानंच संतुष्ट राहावं हेंच मला तरी सहीसलामत वाटतं. पावलोपावलीं मला भ्याडपणाचा वास येतो. भित्रा कांतणारा सुतांत झालेली गुंतागुंत चाकूनं काढील; तर कुशल कांतणारा चिकाटीनं आणि कौशल्यानं ती सोडवील आणि सूत अविच्छिन्न राखील. अशाच प्रकारें कांहींतरी उपाय अहिंसक मनुष्य असाध्य गणल्या गेलेल्या रोगानं पीडित अशा लोकांच्या बाबतींत योजील.

परदेशांत आपलं नियमित प्रचारकार्य हें बैलगाडीची आगगाडीबरोबर लागलेली चढाओढ असं मला तरी वाटतं. आपल्याला प्रचारकार्यांत जर एक हजार खर्च करतां आले तर प्रतिपक्ष्याला एक कोटी खर्चण्याचं सामर्थ्य आहे. म्हणून माझा दृढ विश्वास आहे कीं, आपण आपोआप सहज होणाऱ्या प्रचारकार्यानं संतोष मानावा.

ता. २४।९।३५ बापूचे आशीर्वाद.

वर्धा.

—*—

## पत्र....८४

चि.—

आम्ही आठ तारखेला नंदीदुर्गाला जात आहोंत.

तूं अनुभव चांगले घेतलेस म्हणावयाचे. कॉंग्रेसच्या खर्ड्या-[ फॉर्म ]वर सही करणाऱ्यांबद्दल आपल्या मनांत शंका आली म्हणून त्यांना कांहीं आपण मनाई करूं शकत नाहीं. निरनिराळे बहाणे करून माणसं कॉंग्रेसमध्यें दाखल होतीलच. शेवटीं चांगलीं माणसं अधिक असतील तर सर्व कांहीं कुशलच होईल.

‘महाराष्ट्रीया’च्या पत्राची गोष्ट अगदीं खरी आहे; त्याची कल्पना मात्र साफ खोटी आहे. मुलींच्या खांद्यावर हात ठेवून मी माझी विषयवृत्ति वाढवीत होतों असा त्या लेखकाच्या पत्राचा अर्थ करतां येईल. त्याचं म्हणणं तर निराळंच होतं. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं मुलींच्या

खांद्यावर हात ठेवायचं मी बंद केलं, ह्याच्याशीं माझ्या विषयवासनेचा कांहीं संबंध नाहीं. तिची उत्पत्ति केवळ पडल्या पडल्या निरर्थक खाण्यांत होती. मला स्राव झाला पण मी जागृत होतों आणि मन ताब्यांत होतं. मला कारण समजलं नी तेव्हांपासून डॉक्टरी विश्रांति घ्यायचं बंद केलं. आणि आज तर माझी स्थिति पूर्वी होती त्यापेक्षां जर अधिक चांगल्या स्थितीची कल्पना होऊं शकेल तर ती तशी आहे. यासंबंधीं तुला आणखी विचारायचं असेल तर विचारतां येईल, कारण तुझ्यापासून मीं फार मोठ्या अपेक्षा ठेवल्या आहेत, म्हणून तुला माझ्याकडून जें कांहीं माझ्यासंबंधीं जाणून घ्यायचं असेल तें जाणून घे. नुकतेच जे लेख मी लिहिले आहेत ते चांगले विचार करण्यासारखे आहेत. जर तुला हें समजलं असेल तर ब्रह्मचर्याचा मार्ग सरळ होतो. जननेंद्रिय विषयोपभोगासाठीं नाहींच ही गोष्ट जर स्पष्ट झाली तर सगळी दृष्टिच बदलून जाते. ज्याप्रमाणं एखाद्याला रस्त्यांत क्षयरोग्याच्या रक्ताचा बडका दिसावा आणि त्याबरोबर त्यानं तो रत्न समजून हातीं घेण्यासाठीं उत्सुक व्हावं व मग त्याला हा बडका आहे असं समजतांच त्यानं शांत व्हावं तशीच गोष्ट जननेंद्रियाच्या उपभोगासंबंधीं आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं हें मत इतकं दृढ किंवा स्पष्ट कधींहि नव्हतं आणि आतां तर नवं शिक्षण या मताला विरोध करतं. नवं शिक्षण मर्यादित विषयसेवन हा सद्गुण समजतें व त्याची जरूर आहे असं सुचवितें. या सर्वांचा विचार करून पहा. भगिनींचा जो अनुभव तूं पाठविला आहेस तो छान म्हणतां येईल.

* * *

ता. ६।५।३६ बापूचे आशीर्वाद.

—*—

## पत्र....८५

चि.—

नंदीदुर्गला रोजचं टपाल जवळजवळ रोज संपविलं जातं असं म्हणतां येईल. तुझं ता. १८ चं पत्र काल संध्याकाळीं वाचलं. त्याचं उत्तर आज देत आहे.........

तूं प्रश्न बरोबर विचारला आहेस. अजूनही जास्त स्पष्टपणानं तूं विचारूं शकतेस. मला स्खलन नेहमीं होत आलें आहे. दक्षिण आफ्रिकेंत त्यांत वर्षावर्षाचंहि अंतर पडत असावं. मला नक्की आठवण नाहीं. येथें महिन्या महिन्याचं अंतर पडतं. स्खलन झाल्याचा उल्लेख मी माझ्या दोन–चार लेखांत केला आहे. माझं ब्रह्मचर्य जर स्खलनरहित असतं तर आज मी जगापुढं किती तरी जास्ती गोष्टी ठेवूं शकलों असतों; पण ज्यानं १५ व्या वर्षापासून थेट ३० वर्षांच्या वयापर्यंत आपल्या पत्नीशीं कां होईना पण विषयभोग केला आहे, तो ब्रह्मचारी बनला तरी वीर्याचा सर्वस्वीं अवरोध करूं शकेल हें जवळ जवळ अशक्यच वाटतं. ज्याची संग्राहक शक्ति पंधरा वर्षे रोजच्या रोज क्षीण होत गेली आहे त्याला एकाएकीं ती शक्ति मिळवितां येणार नाहीं. त्याचं मन आणि शरीर दोन्ही दुर्बल झालेलीं असतात. म्हणून मी मला स्वतःला अतिशय अपूर्ण ब्रह्मचारी समजतों; पण ज्याप्रमाणं उजाड प्रदेशांत एरंड वृक्ष तशी माझी स्थिति आहे. ही माझी अपूर्णता जगाला माहित आहे.

मुंबईला मला ज्या अनुभवानं त्रास दिला तो विचित्र आणि फार दुःखदायक होता. मला स्खलनं होत, पण तीं सर्व स्वप्नावस्थेंत; त्यांचा मला संताप आला नाहीं. तीं मी विसरूनहि जात असें; पण मुंबईचा अनुभव म्हणजे जागृत स्थितींत आलेला आणि त्यांत स्त्रीसंगाची एकाएकीं उत्पन्न झालेली इच्छा होती. ही इच्छा पूर्ण करण्याची वृत्ति मुळींच नव्हती. मूढता थोडीसुद्धां नव्हती. शरीरावर पूर्ण ताबा होता. पण प्रयत्न करीत असतांनासुद्धां इंद्रिय जागृत होत होतं. हा अनुभव नवा होता आणि न शोभणारा होता. त्याचं

कारण मी सांगितलंच आहे. तें कारण दूर होतांच इंद्रियजागृति बंदच झाली–अर्थात् जागृतावस्थेंत बंद.

माझ्यांत अपूर्णता असूनसुद्धां एक वस्तु मला सुसाध्य झालेली आहे; ती ही कीं माझ्याजवळ हजारों स्त्रिया सुरक्षित राहिल्या आहेत. असे प्रसंग माझ्या आयुष्यांत आलेले आहेत कीं ज्यावेळीं अमुक स्त्रियांना विषयवासना असतांनासुद्धां त्यांना, किंवा मला म्हण, परमेश्वरानं वांचविलं आहे. ही ईश्वराचीच कृति असं मी शेंकडा शंभर टक्के मानतों. त्यामुळं त्या गोष्टीचा मला यत्किंचित्सुद्धां अभिमान वाटत नाहीं. ही माझी स्थिति मरणान्तापर्यंत कायम राहो अशी ईश्वराजवळ माझी नित्य प्रार्थना असते. शुकदेवाची स्थिति मिळविण्याचा माझा प्रयत्न आहे. ती मला मिळवितां आलेली नाहीं. ती स्थिति प्राप्त झाली तर वीर्यवान् असूनसुद्धां मी नपुंसक होईन आणि स्खलन असंभवित होईल.

पण ब्रह्मचर्याविषयीं आज काल मीं जे विचार प्रदर्शित केले आहेत त्यांत कांहीं न्यूनता नाहीं, अतिशयोक्ति नाहीं. त्या आदर्शाप्रत प्रयत्नांनीं वाटेल त्या स्त्रीपुरुषाला पोंचतां येतं. याचा अर्थ असा नव्हे कीं या आदर्शाला मी जिवंत असतांनाच जग किंवा हजारों माणसं पोंचतील. त्याला हजारों वर्षं लागायचीं असलीं तरी खुशाल लागोत. तरी ही वस्तु खरी आहे, साध्य आहे, सिद्ध झालीच पाहिजे. मनुष्याला अजून पुष्कळ मार्ग कापायचा आहे. अजून त्याची वृत्ति पशूची आहे, आकृति तेवढी माणसाची आहे ! चहूंकडे हिंसा नांदते आहे असं वाटतं, असत्यानं जग भरलं आहे, तरीसुद्धां सत्य–अहिंसाधर्माविषयीं ज्याप्रमाणं शंका नाहीं तसंच ब्रह्मचर्याविषयीं समज.

जे प्रयत्न करीत असतात तरीहि जळत असतात ते प्रयत्न करीत नाहींत. ते आपल्या मनांत विकारांचं पोषण करीत असूनसुद्धां स्खलन होऊं देऊं इच्छित नाहींत; स्त्रीसंग करूं इच्छित नाहींत. अशांना दुसरा अध्याय [गीतेचा] लागू पडतो. ते मिथ्याचारी म्हणायचे. मी आज जें करीत आहे तें म्हणजे विचारशुद्धि. आधुनिक विचार ब्रह्मचर्याला अधर्म समजतो; म्हणून कृत्रिम उपायांनीं संततिनियमन करून विषयसेवनाचा

धर्म (?) पाळूं इच्छितो. याच्याविरुद्ध माझा आत्मा बंड करतो. विषयासक्ति जगांत राहाणारच; पण जगताची प्रतिष्ठा ब्रह्मचर्यावरच आहे व राहील.

ता. २१।५।३६ बापूचे आशीर्वाद.
नंदीदुर्ग

—*—

## पत्र....८६

चि.—

पीठ, तांदूळ, तेल इ. विषयीं चिकाटीनं प्रचार करीत राहावं. या वस्तु महाग असूनसुद्धां सवंग समजाव्या. आपण नवं अर्थशास्त्र रचीत आहोंत. प्रत्येक देशाचं अर्थशास्त्र स्वतंत्र असतं. त्यांत पुनः गरीबाचं आणि श्रीमंताचंही वेगळं आहे. म्हणून तूं निराश होऊं नकोस.

एखाद्या समाधिस्थ मनुष्याच्या जगण्यावर श्रद्धा बसली नाहीं तोंवर तो मृत देह समजून अग्निसंस्कार करायला लागण्याच्या प्रयत्नांत जितकं तथ्य तितकंच ईश्वरावर श्रद्धा बसेपर्यंत नास्तिक होण्यांत आहे. भावना आणि श्रद्धा यांच्यांत भेद असेल तर भावना नसतांनासुद्धां श्रद्धा बसविण्यासाठीं प्रामाणिकपणें प्रार्थनेला बसण्यांत लाभ आहे.

जंगली लोकांत आपण राहात असलों तर आपण आपल्या धर्माचा प्रचार न करतां नीतिधर्माचा प्रचार करावा. जेव्हां त्यांचं हृदयद्वार उघडेल तेव्हां त्यांना पसंती करायची असेल ती ते करतील. आपण आपलं त्यांना सर्व धर्मांचं सामान्य ज्ञान दिलेलं असावं.

ता. २४।६।३६ बापूचे आशीर्वाद.
सेगांव, वर्धा

—*—

## पत्र....८७

चि.—

तुझी राखी मला मिळाली नाहीं. मिळाली असती तर मीं ती जरूर बांधली असती. पण तूं ती पाठविलीस तेव्हां तुला त्याचें सुख किंवा पुण्य मिळालंच.

'सेगांवच्या अनुभवांत*' भर टाकतां येईल, पण आतांच नाहीं. फुरसदही नाहीं व इच्छाहि नाहीं. कोणाला सांगण्याजोगे अनुभव आहेत असं वाटत नाहीं.

जी भाषा माणसं वापरतात तिचा रूढ अर्थ तर असणारच; पण भाषा वापरणाऱ्याचा स्वतःचा अर्थ तींत असणार. तो मागच्या पुढच्या संदर्भावरून काढतां येतो. सत्याला संपूर्णपणें कोणींच जाणलेलं नाहीं म्हणून ज्या ज्या वस्तूला मनुष्य जसा पाहील तशीच जर ती त्यानं सांगितली तर तें त्याच्या बाबतींत सत्य आहे. मग वस्तुतः तें खुशाल असत्य असो. तसंच युगायुगामध्यें एकाच वस्तूसंबंधींचे विचार बदलतील व तेच त्या युगापुरते सत्यरूप मानतां येतील. हा अर्थ किंवा विचार 'असतो मा सद्गमय'मध्यें सामावला आहे.

जेथें उच्चनीचपणाचा भाव उडून जातो तेथें शूद्रानं तीन वर्णांची सेवा केली तर त्यांत मला दोष दिसत नाहीं. शूद्र बनविणारा एखादा परिचर्याधर्म जर असेल तर तो बदलण्याचं प्रयोजन काय? ब्राह्मण आणि भंगी पोटापुरतंच मिळवीत असतील तर दोघांमध्यें भेद काय? भंग्याला ज्ञानी व्हायला कसलीहि हरकत नाहीं. माझ्या कल्पनेंत असणाऱ्या वर्णांत ज्ञानाचा मक्ता कोणालाही नाहीं. स्त्रियांच्या आपल्या प्रार्थनेंतील श्लोकांचा विचार कर. त्यांत चार वर्णांतील सामान्य धर्म काय आहेत? ज्ञानदेवादिकांच्या वचनांत उच्चनीच भावनेचं समर्थन करणारीं वचनं खुशाल सांपडोत. चार दोन वचनांनीं एखाद्याचा योग्य न्याय करतां येणार नाहीं. रामदासाविषयीं तूं सांगूं इच्छितेस तें मला माहीत

---

* 'हरीजन'मधील लेख.

आहे. हीं उदाहरणं अयोग्य आहेत असं सिद्ध झालं तरी माझ्या युक्तिवादाला हरकत येत नाहीं. तुझ्या विनंतीचा[1] मला स्वीकार करतां येत नाहीं. कारण तूं त्या विनंतीच्या योग्यतेचा पुरा विचारच केलेला नाहींस. वाहत्या पुरांत वाहात गेली आहेस. तूं, मी व सारे आपापल्या आई-बापांच्या चौकटींतच राहिलों आहोंत. हें विसरून जाऊन नवें म्हणवून घेण्यांत जितका अर्थ किंवा अनर्थ आहे तितकाच जुन्या चौकटीच्या त्यागांत आहे. आपल्याला त्या चौकटींत राहून अनेक फेरफार करतां येतील. याचं नांव प्रगति किंवा उन्नति. अगदीं नवं दिसणं म्हणजे उल्कापात किंवा नवा धर्म. हिंदुधर्माला कुठेंतरी चौकट असेल कीं नाहीं? मुलं पाण्यावर रोज नवीं अक्षरं काढतात अन् काढलीं कीं तीं नाहींशीं होतात. यांतहि त्यांच्यापुरती गंमत असतेच. अशी गंमत तुला करायची आहे वाटतं? पण जुन्या चौकटींत ६७ वर्षं वाढलेल्याला मला तूं पाण्यांत कुंडाळीं करण्यासाठीं कशी ओढूं शकणार? मी आपला कांटावर उभा राहून तुझा व तुझ्यासारख्यांचा खेळ पहात आहें.......

...माझं अज्ञान[2] बरं तुला गवसलं! अजून जास्त शोध करशील तर याहूनहि घोर अज्ञान तुला सांपडेल. पण माझं पूर्ण अज्ञान जेव्हां तुला समजून येईल तेव्हां तूं पळून तर जाणार नाहींस ना? तेवढं वचन देत असलीस तर मी आपलं सांगूनच टाकीन कीं, मला कांहींसुद्धां समजत नाहीं. कारण त्याचा अभ्यास मीं केला नाहीं. साम्यवादाविषयीं माझ्या समाधानापुरतं वाचलं आहे. स्वराज्यांत कशाची जरूर पडेल हें स्वराज्य दिसेल तेव्हां सांगेन. माझा विरोध तुला दिसेल तिथं सत्यासत्य, हिंसा–अहिंसा यांच्या अनुषंगानंच तो असेल.

ता. १०।८।३६ बापूचे आशीर्वाद

—*—

१ नवीन युगधर्म बनविण्याविषयीं.

२ समाजवादाच्या साहित्याबाबत.

## पत्र....८८

चि.—

* * *

तुझी चांगलीच कसोटी होत आहेसं दिसतं. खेडेगांवच्या लोकांच्या खिशांत पैसे टाकण्याची गोष्ट सोपी आहे व नाहीं. ते जर आपण सांगितलेलं ऐकतील तर भांडवलावांचून, किंवा थोड्या भांडवलानं म्हणा, समस्त खेड्यांची प्राप्ति दुप्पट वाढवितां येईल. या ठिकाणीं खेड्यांना शोषणाऱ्यांची खेडेगांवांतून होणारी प्राप्ति धरलेली नाहीं. पण आपण सांगतों तें त्यांनीं केलं नाहीं तर-म्हणजे आपण सांगूं तितकी मेहेनतच त्यांनीं केली नाहीं, शिकवूं तो उद्योग ते शिकले नाहींत तर प्राप्ति वाढविणं हें कठिण आहे; इतकंच नव्हे तर अशक्य आहे. दुसरी एक मोठी अडचण ही आहे. फक्त मूठभर माणसंच खेड्यांत जातात. तींहि बिन अनुभवी. त्यांचीं शरीरं खेड्यांत राहाण्याइतकीं कसलेलीं नसतात. खेडवळ लोकांचा स्वभाव त्यांना माहीत असत नाहीं. त्यांच्या गरजांविषयीं पूर्ण अज्ञान, त्यांचा स्वतःचा हात चालत नाहीं व बुद्धिही त्यांना चालवितां येत नाहीं. शाळा कॉलेजांत मिळालेलं ज्ञान खेडेगांवांत अगदीं निरुपयोगी. अशा स्थितींत धीर धरण्याची आवश्यकता असते; आत्मविश्वास लागतो; शरीरसंपत्ति असेल तर शेवटीं खेडेगांवांची आर्थिक स्थिति सरकारी मदत न घेतां पुष्कळ प्रमाणांत-५० टक्के म्हणा-सुधारतां येते. ५० टक्के मी कमींत कमी म्हणतों. माझी समजूत अशी आहे कीं ९० टक्के सुधारतां येते. शरीरसुधारणा, समाजसुधारणा, नैतिक सुधारणा या तीन मुख्य गोष्टी आहेत. यांत सरकारी मदतीची कांहींच आवश्यकता नाहीं. आर्थिक सुधारणेच्या कामांतच सरकारची थोडी मदत झाली तर काम सरळ होतें. पण वरील तीन वस्तूंखेरीज सरकारी मदत कांहींच करूं शकणार नाहीं. तेव्हां तूं जर खादीशास्त्रांत खरोखर निष्णात झालीस आणि वाटेल तीं प्रलोभनं असलीं तरी खेड्यांतून हलली नाहींस तर तूं लिहिलंस त्या सर्वांचा तुला प्रत्यक्ष अनुभव येईल.

गाईच्या दुधाचा आग्रह ठेवीत नाहींस हें बरोबर नाहीं. प्रवासांत जाशील तेव्हां आपल्याबरोबर तुला गाईचं तूप व पेढे ठेवतां येतील. पेढे साखर न घातलेले असावेत, म्हणजे नुसत्या खव्याचे. त्याच्याबरोबर गूळ खावासा वाटला तर खावा. असं केल्यानं खर्च वाढत नाहीं आणि दुधाची गरज संपूर्णपणें भागवतां येते. पेढे सुकेच खाण्याऐवजीं त्यांची पूड करून गरम पाण्यांत मिसळून त्यांचं दूध बनवितां येतं. त्यांत उणीव फक्त विटॅमिन्( जीवनसत्त्वा )ची असते. पण थोडे दिवस विटॅमिन मिळालं नाहीं तर त्यानं कांहीं नुकसान होत नाहीं.

......सगळेच ब्रह्मचारी राहाणार नाहींत ही एक गोष्ट समजण्याजोगी आहे. इंद्रियनिग्रह ज्याला करतां येत नाहीं त्यानं खुशाल लग्न करावं. पण विषयाचं गुप्त सेवन करणं ही गोष्ट मला असह्य वाटते. मनुष्याचं पतन विषयाच्या गुप्त सेवनांत आहे. असं करण्यानं मर्यादा राहात नाहीं. मला गृहस्थाश्रमाविषयीं मुळींच द्वेष नाहीं. ती आवश्यक स्थिति आहे, सुंदर आहे. पण आश्रम म्हणजे त्याच्या गर्भात धर्म आला. गृहस्थधर्म स्तुत्य आहे. स्वच्छंद निंद्य आहे. माझा सगळा विरोध स्वच्छंदाच्या बाबतींत आहे.

आणि ब्रह्मचर्यपालनाच्या बाबतींत खरा हिस्सा तर शेवटीं स्त्रीचाच असला पाहिजे. ब्रह्मचर्याचं महत्त्व आणि त्याची आवश्यकता सिद्ध करण्याचा बोजा एकट्या पुरुषावर नसावाच. आजपर्यंत बव्हंशीं हा बोजा पुरुषानंच उचलला आहे. त्यामुळें या बोजाला अधिकाराचं रूप आलं आहे. त्यामुळं ब्रह्मचर्याची निंदा झाली आहे. इतकंच नव्हे तर तें सोपं असायला पाहिजे होतं; पण कठिण होऊन बसलं आहे. इतकं कीं पुष्कळांना ते अशक्यच वाटतं आहे. यांतही मला पुष्कळसा दोष पुरुषाचाच दिसतो. त्यानं स्त्रीला वाटेल तें करून खालींच ठेवली आहे. हें करण्यांत खुशामत आणि पशुबळ या दोहोंचा चांगलाच उपयोग केला गेला आहे. वाटेल तें असो, मनुष्यजातीचं अर्धं अंग निर्बळ झालं आणि राहिलं; त्याचा परिणाम असा झाला कीं पुरुष आपल्या अनेक कार्यांत निष्फळ ठरला आहे. आणि तें योग्यच झालं म्हणतां येईल. आज स्त्रियांत थोडीशी जागृति आली आहे. तरीसुद्धां या जागृतीला आज निदान विकृत

स्वरूप येऊं लागलं आहे. पुरुष स्वतंत्रतेच्या नांवानं तिचे लाड करतो आहे. तिच्या अहंकाराला वाढवितो आहे. स्त्री स्वतंत्रता म्हणजे स्वेच्छाचार समजून बसली आहे. यांतून जे स्त्री–पुरुष वर निघतील ते निघोत. तूं नीघ.

ता. ५।२।३७
सेगांव

बापूचे आशीर्वाद.

—※—

## पत्र....८९

चि.—

माझ्याकडून तुम्हीं चौघांनीं वेळ मागितला असता तर चांगलं झालं असतं. तुमच्या खेडेगांवांतील परिस्थिति जाणल्यावांचून मी काय सांगूं शकलों असतों हा तुझा मुद्दा मला मान्य आहे. तुझं हेंहि म्हणणं खरं आहे कीं, खेडेगांवांतील अनुभवाच्या बाबतींत माझा अजून आरंभकाळच आहे. अर्थात् आपण सगळे सारखेच आहोंत; तरी पण माझ्या विचारांत कांहीं मौलिकता आहे आणि या सर्वांचं कारण अहिंसा होय. तेव्हां तुम्हां चौघांना कांहीं जाणण्याजोगं मिळालं असतं.

तूं विचार करण्याची कला मिळवूं लागली आहेस हें मला चांगलं वाटतं. कारण ※ ✱ ※ च्या तुझ्या भाषणांत मला विचारशून्यता दिसली होती. ते विचार मला डोक्यांतून निघणाऱ्या धुरासारखे भासले होते. ते हृदयाचे उद्गार नव्हते. मला वेळांत वेळ काढून तुझ्याशीं त्याबाबत बोलावयाचं होतं आणि दोन आणि दोन चार होतात त्याप्रमाणं त्या विचाराची शून्यता सप्रमाण सिद्ध करून द्यावयाची होती. पण तूं लौकर चालती झालीस. आणि मला वेळच मिळाला नाहीं. मला तुझी विचारशून्यता सिद्ध करून द्यायची घाई नव्हती, म्हणून मी तुला रोकलें नाहीं. मला इतका विश्वास आहे कीं तुझी ही उणीव केव्हांतरी तूं आपोआपच पहाशील. इतक्यांत तुझ्या पत्रांतच त्याचा स्वीकार मला मिळाला. त्या भाषणांतील विचारांत तुला तो दोष कदाचित् दिसणार नाहीं, पण जर खरोखर विचार

करायला शिकणार असलीस तर त्या भाषणांतील विचारांत असलेल्या उणीवा दिसल्यावांचून राहाणार नाहींत.

म्हणून सिद्धांतावरील माझे अभिप्राय मागविण्याचें तूं तहकूब केलंस तें मला आवडलं. आणि जोंवर विचार करण्याची कला हस्तगत झाली नाहीं तोंपर्यंत तूं भाषण करण्याचं बंद ठेवलंस तर मला त्याहून अधिक आवडेल. विचार करण्याची कला लौकर प्राप्त करून घे.

ता. १३।५।३७ **बापूचे तुम्हां सगळ्यांना आशीर्वाद.**

तीथल–वलसाड

---

## पत्र...९०

चि.—

तुझ्या पत्राचं पूर्ण उत्तर कदाचित् मी देऊं शकणार नाहीं. प्रयत्न करीन. भाषणं न करण्याचा हुकूम मीं तुला केलाच नव्हता, पण जर केला असेल तर तो परत खेंचून घेतों. मला कोणावर हुकूम चालवावयाचा नाहीं. तुझ्या विचारांत फेरफार झाले तरीदेखील मला त्याचं काय ? तूं स्वतःच्या स्वभावाला अनुसरशील. सर्वांनींच तसं करावयाचं आहे.

शुद्ध प्रेमाला शरीरस्पर्श करण्याची गरज नसते. त्याचा अर्थ असा थोडाच आहे कीं स्पर्श तेवढा सगळा अपवित्र असतो ? मला माझ्या आईबद्दल शुद्ध प्रेम वाटत होतं. पण तिचे पाय दुखत असत तेव्हां मी चेपीत असें, त्यांत अपवित्रता कांहींच नव्हती. विकारी स्पर्श हा दूषित आहे. म्हणून मी असं म्हणेन कीं शरीरस्पर्शावांचून शुद्ध प्रेम अशक्य आहे, असं म्हणणाऱ्याला शुद्ध प्रेमच समजलं नाहीं.

* * विषयीं तूं जें मानून घेतलं आहेस तें बरोबर नाहीं. तुला जो पुरावा मिळाला आहे त्याची कांहीं किंमत नाहीं. असल्या गोष्टी खऱ्या मानण्यापूर्वी त्या त्या व्यक्तींना विचारलं पाहिजे. मी असं नाहीं म्हणत कीं असत्याचं आचरण झालं नसेल, पण त्याची चौकशी झाली पाहिजे. मला जर कोणीं सांगितलं कीं तूं अमुक अमुक केलंस तर तुला विचारल्यावांचूनच मीं तें खरं मानावं का ?

तुझ्या त्या भाषणांत तुझ्या हृदयाचे उद्गार असतील, असोत. पण तूं आतां जें लिहीत आहेस त्याहून तुझं भाषण निराळं होतं इतकं तूं कबूल करशील ना ? तें कसंही असो. मी तुला कळवलं आहे कीं माझा अनुभव तुझ्या अनुमानाहून निराळा होता. माझ्या अनुभवापेक्षां तुझ्या अनुमानाची किंमत तुला अधिक धरितां येईल; पण मीं काय करावं ?

ता. २९।५।३७ बापूचे आशीर्वाद.

तीथल-बलसाड.

—*—

# सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणें २.

## राष्ट्रीय विचारांचा सोप्या भाषेंत प्रचार करणारी अखिल महाराष्ट्रांतील एकच स्वस्त माला

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते। —गीता

सामाजिक दौर्बल्य आणि अवनति यांतून सुटका होण्यासाटीं समाज-धर्माचें निश्चित ज्ञान समाजांतील सर्व घटकांत पसरलें पाहिजे. आजच्या जागृतीच्या काळांत समाजांतील सर्व स्त्री–पुरुषांना आपल्या स्थितीचें स्वरूप आणि उन्नतीचा मार्ग दाखविणारे विचार सुलभतेनें उपलब्ध झाले पाहिजेत. मार्गाचा बोध झाल्यावर उत्साहानें व आशावादानें अचूक यत्न करण्याची स्फूर्ति झाल्याशिवाय राहणार नाहीं. राष्ट्रांत चाललेल्या अनेकविध चळवळींना जोर यावा, यासाटीं सामान्य जनसमाज अधिक शिक्षित झाला पाहिजे. सुलभ आणि स्वस्त अशा ग्रंथांच्या प्रसारानें हें कार्य लवकर होईल अशी खात्री असल्यानें ही माला चालविण्यांत आली असून समाजविकासाच्या विविध अंगांची सांगोपांग माहिती देऊन महाराष्ट्रांतील ‘सकळ जन शहाणे’ करून सोडण्याचा उद्देश आहे.

**१ रुपया प्रवेश-फी भरून कायम ग्राहक होणारांस प्रत्येक पुस्तक पाऊणपट किंमतीस मिळेल. ट. ख. निराळा. प्रसिद्ध होणारीं सर्व पुस्तकें कायम ग्राहकांस घ्यावी लागतील.**

# प्रकाशित झालेले ग्रंथ

*** १, २ सत्याचे प्रयोग** अथवा **महात्मा गांधींचें आत्मचरित्र**

महात्मा गांधींनीं स्वतः लिहिलेल्या आत्मचरित्रावरून त्यांचें जीवन-रहस्य, सत्याग्रहस्वरूप आणि त्यांनीं दक्षिण आफ्रिकेंत व चंपारण्यांत केलेल्या मोहिमांचें तत्त्व स्पष्ट होतें. या ग्रंथाचा सर्व जगांत मोठा गौरव झाला आहे. अनेक देशीविदेशी पंडितांनीं याचा पुरस्कार केला आहे.

कि. प्रत्येक भागास १ रु.

**३ खादी-मीमांसा—** कि. १२ आणे.

**४ स्वराज्य शिष्टाई—**

महात्मा गांधींचीं गोलमेजपरिषदेपुढील भाषणें आणि विलायतेंतील इतर मुलाखती वगैरे. कि. ६ आणे.

**५ संयम कीं स्वैराचार—**

महात्मा गांधींच्या ब्रह्मचर्य आणि संततिनियमनावरील लेखांचें सुबोध भाषांतर. कि. ८ आणे.

**६ हिंडलग्याचा प्रसाद**—काका कालेलकरकृत

ग्रामसंघटनेंतील सर्व प्रश्नांची तात्त्विक आणि व्यावहारिक चर्चा करून काकांनीं महाराष्ट्रवाचकांना कायमचें ऋणी करून ठेविलें आहे. गांधी-वादाचें निर्मळ स्वरूप यांतून समजून घ्या. कि. ९ आणे.

*** ७ हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें व पुनर्घटना—**

प्रख्यात तत्त्वज्ञ सर राधाकृष्णन् यांच्या 'Hindu View of Life' या अत्यंत नांवाजलेल्या ग्रंथाचें सुबोध भाषांतर वाचून हिंदुधर्माचे सिद्धान्त जाणून घ्या. कि. १ रु.

*** ८ उपनिषदांतील दहा गोष्टी**—( पुनर्मुद्रण ) ले.—शंकर दत्तात्रय देव.

उपनिषदांतील गूढ रहस्यांचा सुबोधतेनें परिचय व्हावा म्हणून मुळांतील ठळक कथांचा यांत अनुवाद करण्यांत आला आहे. कि. ६ आणे.

***९ विद्यार्थिजीवन**—ले. श्रीपाद सदाशिव महाजन.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक उन्नतीला पोषक अशा विविध विषयांचें या पुस्तकांत सोप्या भाषेंत विवेचन केलेलें आहे. किं. ८ आणे

***१० फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास**—ले.—त्र्यं. र. देवगिरीकर.

३५० वर्षांच्या पारतंत्र्यांत फिलिपिनोजनीं बंडें केलीं, परक्या राष्ट्रांच्या मदतीकरितां याचना केली, कौन्सिलें लढविलीं, राष्ट्रसंघापुढें गाऱ्हाणीं मांडलीं, पण व्यर्थ गेलें. जोसे रिझालचें चरित्र म्हणजे स्फूर्तीचा अखंड झरा आहे. स्पेनच्या ताब्यांतून सुटून अमेरिकेच्या ताब्यांत हीं बेटें कशीं गेलीं याचा संतापजनक इतिहास या पुस्तकांत आढळतो. स्वतंत्र होऊं इच्छिणाऱ्या प्रत्येक तरुणानें हा इतिहास एकदां तरी अवश्य वाचावा. किं. १ रु.

**११ कॉंग्रेसचा इतिहास**—(आवृत्ति दुसरी)

कॉंग्रेसच्या गेल्या पन्नास वर्षांचा इतिहास म्हणजेच भारतवर्षानें आतांपर्यंत स्वातंत्र्याप्रीत्यर्थ केलेल्या चळवळींचा संपूर्ण इतिहास ह्या पुस्तकांत दिलेला आहे. प्रत्येक स्वातंत्र्येच्छु मनुष्यास हें पुस्तक संग्रहीं ठेवतां यावें म्हणून ह्या साडेआठशें पानाच्या पुस्तकाची किं. २ रुपयेच ठेवली आहे.

**१२ समाजवादच कां?**—ले.जयप्रकाश नारायण.

समाजवादच कां प्रस्थापित झाला पाहिजे, समाजवाद म्हणजे काय, समाजवाद प्रस्थापित झाला म्हणजे समाज कसा सुखी होईल, याचें अगदीं सोप्या भाषेंत या पुस्तकांत वर्णन केलें आहे. किं. १० आणे

**१३ खानबंधूंचा अल्प परिचय**—अनुवादक प्रेमा कंटक.

अबदुल गफूरखान व डॉ. खान ह्या बंधुद्वयांचें अल्पचरित्र किं. ९ आणे.

या पुस्तकांत सदरहू प्रांतांतील लोकांवर काय काय जुलूम, जबर दस्ती व छळ होत आहे आणि तेथील लोक किती अज्ञानांत व गुलामगिरींत ठेवले आहेत याचें हृदयद्रावक वर्णन सरकारी कागदपत्रांच्या आधारेंच दिलेलें आहे. तरी प्रत्येक हिंदवासी स्त्री-पुरुषानें हें पुस्तक एकवार तरी अवश्य वाचावें.

---

* हीं पुस्तकें मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाड सरकार विद्याखात्यांनीं शाळांकरितां मंजूर केलीं आहेत.

## १५ जवाहरलाल नेहरू ( आत्मचरित्र )

अनुवादकः—श्री. ना. ग. गोरे, बी. ए., एल्एल्. बी.

या ग्रंथांत जवाहरलाल नेहरू यांनीं आपल्या जीवनांत बाळपणापासून कसें परिवर्तन होत गेलें याचें अतिशय जिव्हाळ्यानें वर्णन केलें आहे.

"...मूळचें आत्मचरित्र इंग्रजींत असून त्याचें मराठी रूपांतर श्री. नारायण गणेश गोरे यांनीं केलें आहे. हें रूपांतर इतक्या सफाईनें लिहिलें आहे कीं जणूं काय त्याची रचना प्रथमपासून मराठींत झाली आहे असा भास होतो."

—केसरी ता. २३।२।३७ मूल्य ५ रुपये

## *१५ विश्राम—ले—साने गुरुजी.

चार स्वतंत्र गोष्टींचा हा एक स्वतंत्र संग्रह आहे. इंग्रजी शिक्षणाचा परिणाम; अधिकारमदानें मनुष्य आईबापांसहि कशी ओळख देत नाहीं; आई-बापांची वत्सलता; शेवटीं हृदयच कसें थोर ठरतें; स्त्रीजीवनांतील अपत्य-भावनेची हृदयस्पर्शी ओळख; लहान मुलांच्या मनोवृत्ति घरीं, दारीं, शाळेंत कशा मारल्या जातात; त्यांना संकुचितपणाचें शिक्षण कसें देण्यांत येतें; हिंदु—मुसलमान प्रश्न; श्रमजीवी लोकांची कशी स्थिति असते; ऐदी श्रीमंत कशी सत्ता गाजवितात; गरिबांच्या जीवनांत सत्याची, चारित्र्याची, प्रेमाची कशी वृत्ति दिसते; मूक त्यागानें जीवनें कशीं बदलतात, वगैरे अनेक गोष्टींचें दर्शन 'विश्राम' तुम्हांला घडवील. किं. १० आणे

## १६ भारतीय संस्कृति—ले. साने गुरुजी.

भारतीय संस्कृति हा शब्द लाखों लोकांच्या तोंडीं असतो, परंतु भारतीय संस्कृतीची अल्पस्वल्पहि स्पष्ट कल्पना पुष्कळांना नसते. प्रस्तुत छोट्या पुस्तकांत सरळ सुंदर रीतीनें भारतीय संस्कृतीचा मोठेपणा दाखविण्यांत आलेला आहे. भारतीय संस्कृतीच्या अभिमान्यांनीं व भारताची भूतकालीन ध्येयें काय होतीं हें समजून घेऊं इच्छिणाऱ्यांनीं हें पुस्तक वाचल्याशिवाय राहूं नये. आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना समजेल अशा सोप्या हृदयंगम भाषेंत हें पुस्तक लिहिलेलें आहे. **मूल्य १॥ रुपया.** (टपालखर्चासह एक रुपया दहा आणे.)

साने गुरुजी यांचीं सर्व पुस्तकें आमचेकडे मिळतील.

**सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, ३७३ शनिवार पुणें नं. २**

## –महाराष्ट्र ग्रंथ भांडार, महाद्वार रोड–
### कोल्हापूर
( सर्व प्रकारचीं पुस्तकें मिळण्याचें ठिकाण )

| | | | रु. आ. |
|---|---|---|---|
| १ | पूजन | वि. स. खांडेकर | १—८ |
| २ | काम आणि कामिनी | कु. प्रेमा कंटक | २—८ |
| ३ | आजचें स्वराज्य | वा. वा. जोशी | ०—६ |
| ४ | सीता–स्वयंवर ( बी. ए. टेक्स्ट ) | प्रो. द. सी. पंगू | २—८ |
| ५ | जीवन प्रकाशन ( मोठ्यांच्या छोट्या गोष्टी ) | साने गुरुजी | ०—२ |
| ६ | मावळता चंद्र | बा. भ. बोरकर | १—४ |
| ७ | पुष्प–पराग | कुमुदिनी प्रभावळकर | १—४ |
| ८ | करवीरच्या कळ्या ( प्रातिनिधिक कथासंग्रह ) | | १—४ |
| ९ | सांजवात | | ०–१० |
| १० | हिंदूंचा आजचा कायदा | | ०—८ |
| ११ | चौपाटीवर | | १—४ |

—०—

# काम आणि कामिनी
किंमत २॥ रुपये

### प्रो. ना. के. बेहरे यांचा अभिप्राय

“ मराठी भाषेंत अलीकडे प्रसिद्ध झालेल्या या कादंबरीची जेवढी स्तुति करावी तेवढी थोडीच होईल. ...

“ कोणतीहि कादंबरी कथालेखकाच्या शास्त्रीय तंत्राच्या चौकटींत बसते कीं नाहीं हें पाहण्यापेक्षां ती किती मनोरंजक झाली आहे हें पाहणेंच अधिक उचित ठरेल. कारण मनोरंजन करण्याची शक्ति हीच काद-

बरीच्या प्रभावाची मुख्य कसोटी होय. मी तरी ही कादंबरी एका बैठकींत वाचून संपविली व मगच ती हातावेगळी करून तिच्या विषयींच्या विचारांत गुंग झालों. इतकें माझें मन त्या कथासूत्रांत तल्लीन झालें. तो अद्वितीय नायक मुकुंद, त्याची लावण्यमयी पत्नी वृंदा, आणि वृंदेचा एकुलता एक पुत्र सत्यकाम यांचीं चित्रें माझ्या दृष्टीसमोर सारखीं खेळूं लागलीं व बाह्य व्यवहारी पण कठोर कटु सृष्टीचा क्षणभर मला विसर पडला; इतका मी त्या काल्पनिक ध्येयसृष्टींत रंगून गेलों. कादंबरीची उभारणी स्वतंत्रबुद्धीनें करण्यांत आली असल्यामुळें ती खरीखुरी महाराष्ट्रकन्या भासते.

स्त्रियांचें यथातथ्य स्वभावचित्र स्त्रिया पुरुषांपेक्षां किती सहृदयतेनें व मार्मिकतेनें रेखाटूं शकतात हें या पुस्तकांत अनुभवास येतें.

भारतीय तत्त्वज्ञान, महात्मा गांधींचें राजकारण, हिंदी संस्कृति, आधुनिक आर्यमहिलांची महनीयता, आत्मोद्धार व देशोद्धार करणारा स्वातंत्र्य-गिरीवर चढण्याचा मार्ग, यांचें मनोहर चित्रण करणारी ही स्वतंत्र कादंबरी मराठी वाङ्मयक्षेत्रांत अपूर्व तेजानें सदैव झळकत राहील. ही कथा एका पदवीधर व त्यागी, आश्रमवासिनी व ब्रह्मचारिणी भारतकन्येनें लिहिली आहे. खेड्यांतील अनाथ, अपंग व अशिक्षित स्त्रिया आणि मुलें यांच्या सहवासांत स्वर्गसौख्य मानून त्यांच्या कल्याणासाठीं व उद्धारासाठीं सतत अहर्निश झटणाऱ्या एका आदर्श कॉंग्रेस स्वयंसेविकेनें आत्मानुभवावरून व अंतस्थ प्रतिभेवर विसंबून ही मनोरम पवित्र व स्फूर्तिदायक कथा निर्माण केली आहे. हिच्या प्रत्येक पृष्ठांत पावित्र्य व दिव्य सौंदर्य भरलें आहे. हिंदुस्थानांतील नवयुगाच्या मांगल्यसूचक प्रभातकालाचें चित्र या कादंबरींत रेखाटलेलें आहे. ही सुंदर कादंबरी वाचतांना मनाला क्षणभर भोंवतालच्या शुष्क दुष्ट जगाचा विसर पडला व तें शांति आणि पावित्र्य यांच्या स्वर्गीय वातावरणांत विहरूं लागलें. तेव्हां ही मनोहर व पवित्र कादंबरी प्रत्येक आबाल–वृद्ध स्त्री–पुरुषानें अवश्य वाचावी अशी मी आनंदानें शिफारस करतों. ”